संवादिनी २०००

अ अऽऽ इ इऽऽ

अुं हू प आई

ओ औच् अहं अहा!

केशव गोरे स्मारक ट्रस्ट संदर्भ ग्रंथालय

आरे रोड, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० ०६२.

(महाराष्ट्र शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालय)

दा.क्र.:

वर्गांक :

कृपया खाली दिलेल्या तारखेच्या अगोदर पुस्तक आणून द्यावे

19 NOV 2010

891.46
Sam/2K
17 JAN 2006
5430

*जगाच्या पाठीवर*
*कुठेही असला तरी*
*महाराष्ट्राच्या मातीला,*
*मराठी मायबोलीला*
*जो विसरला नाही,*
*त्या मराठी*
*माणसाच्या 'मम'त्वाचे*
*हे सुचिन्ह !*

**महाराष्ट्र फाउण्डेशन**
मराठी साहित्य पुरस्कार योजनेसाठी
चित्रकार शांताराम पवार यांनी तयार केलेले बोधचिन्ह

**संपादक**
दिगंबर पाध्ये

**संपादन साहाय्य**
अरुणा दुभाषी

**मुखपृष्ठ**
शांताराम पवार

**मुखपृष्ठ संकल्पना**
अपघाताने मन:पटलावर दिसलेली
मराठी आद्याक्षरांची रूपसंकल्पना

**आतील अक्षरे**
गुंजन मोहिते

**मांडणी**
सुहास मोरे

**छायाचित्रे**
विठोबा पांचाळ

ग्रंथमोजणी
2001-2: ६.३.2002
२००२-३: २०/३/२००३
२००३-४: २८.३.४
२००४-५: २१/३/५
२००५-६: ५.३.६
२००६-७
२००८-९
२०१०-११
२०१२-१३
२०१४-१५
२०१६-१७

**मुद्रक**
प्रकाश विश्वासराव
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५

**प्रकाशक**
कृष्णनाथ नेवरेकर
केशव गोरे स्मारक ट्रस्ट
'स्मृती', आरे रोड
गोरेगाव (पश्चिम), मुंबई - ४०० ०६२

केशव गोरे स्मारक ट्रस्ट ग्रंथालय व संशोधन 5430


केशव गोरे स्मारक ट्रस्ट
आयोजित
**महाराष्ट्र फाउण्डेशन**
**मराठी साहित्य**
**पुरस्कार वितरण सोहळा**

अध्यक्ष : **प्रा. नलिनी पंडित**
प्रमुख पाहुणे : **डॉ. चंद्रशेखर कंबार**
सूत्र संचालन : **श्री. दत्ता बाळसराफ**

गुरुवार दिनांक २८ डिसेंबर २०००
सायंकाळी ५.३० वाजता । कर्नाटक संघ, मुंबई

समारंभाचे प्रमुख पाहुणे

# डॉ. चंद्रशेखर कंबार



891.46
Sam/2K

डॉ. चंद्रशेखर बी. कंबार हे कन्नडमधील एक महत्त्वाचे नाटककार, कवी, कादंबरीकार आणि लोकसाहित्यकार म्हणून प्रसिद्ध आहेत. बावीस नाटके, आठ काव्यसंग्रह, एक महाकाव्य आणि तीन कादंबऱ्या अशी त्यांची साहित्यसंपदा आहे. या शिवाय लोकसाहित्य, साहित्य, रंगभूमी, शिक्षण इत्यादी विषयांवरील संशोधनपर असे तेरा ग्रंथही त्यांनी लिहिले आहेत. अनेक देशी-विदेशी विद्यापीठांनी आणि मान्यवर संस्थांनी आयोजित केलेल्या चर्चासत्र-परिसंवादांमधून त्यांनी भारतीय लोकसाहित्य आणि लोकरंगभूमी या विषयांवर आपले विचार मांडले आहेत. १९८४ साली त्यांनी कन्नड साहित्य परिषदेकरिता कन्नड लोकसाहित्याचा कोश सिद्ध केला आहे. लोकसाहित्य आणि आधुनिक रंगभूमी यांच्या क्षेत्रातील त्यांच्या कामगिरीकरिता त्यांना फोर्ड फाउण्डेशनकडून दोन वर्षांकरिता फेलोशिपही मिळाली होती.

विविध भारतीय भाषांत आणि इंग्रजीत त्यांच्या नाटकांची व कवितांची भाषांतरे झाली आहेत. भारतातील मान्यवर दिग्दर्शकांनी त्यांच्या नाटकाचे प्रयोग आपापल्या भाषिक रंगभूमीवर सादर केले आहेत.

डॉ. चंद्रशेखर कंबार यांना राज्यस्तरावरील अनेक पुरस्कार मिळाले आहेतच. शिवाय कमलादेवी चटोपाध्याय पुरस्कार, साहित्य अकादमी पुरस्कार, नंदीकार पुरस्कार, संगीत नाटक अकादमी पुरस्कार असे राष्ट्रीय स्तरावरील अनेक सन्मान्य पुरस्कारही त्यांना प्राप्त झाले आहेत.

डॉ. कंबार यांनी १० चित्रपटांची आणि १३ लघुपटांची निर्मिती केली असून चित्रपट निर्मिती क्षेत्रातील दिग्दर्शन, संगीत-दिग्दर्शन, पटकथालेखन, संवादलेखन यांकरिता त्यांना अनेक महत्त्वाचे पुरस्कार मिळाले आहेत.

चीन, फ्रान्स इ. देशांमधील विविध उपक्रमांमध्ये तसेच जागतिक कविता महोत्सवामध्ये त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले आहे.

कर्नाटक नाटक अकादमी, कर्नाटक जानपद व यक्षगान अकादमी, राष्ट्रीय नाट्य विद्यालय (NSD) संगीत नाटक अकादमी, साहित्य अकादमी, फोर्ड फाउण्डेशन, भारतभवन इ. मान्यवर संस्थांशी ते जवळून संबंधित असून सध्या ते 'राष्ट्रीय नाट्य विद्यालया'चे अध्यक्ष आहेत.


महाराष्ट्र फाउण्डेशन साहित्य पुरस्कारांचे हे सातवे वर्ष. १९९४ चे पुरस्कार १९९५ मध्ये जाहीर झाले होते. तेव्हापासून आजपर्यंत या पुरस्कारांचे मराठी साहित्यक्षेत्रात जे स्वागत झाले ते पाहता मराठी समाजाच्या साहित्याभिरुचीशी सुसंगत असेच हे कार्य झाले आहे असे म्हणता येते.

साहित्याच्या क्षेत्रात निर्विवाद असे काही करणे ही गोष्ट तशी अवघडच असते. एक तर साहित्याच्या स्वरूपामुळे त्याच्या श्रेष्ठ कनिष्ठतेविषयी काटेकोर आणि निर्विवाद असे निकष देता येत नाहीत. आणि त्यातच जीवनविषयक दृष्टिकोन, व व्यक्तिगत आवडीनिवडी यामुळेही मतभिन्नतेत सतत भर पडत असते. म्हणूनच सर्वांचे पूर्ण एकमत होईल असे पुरस्कार ही गोष्ट जवळजवळ अशक्यप्रायच आहे. अशा परिस्थितीत आजवरच्या पुरस्कारांविषयी फार मोठे मतभेद व्यक्त झाले नाहीत, एवढेच नव्हे, तर अनेक मान्यवरांनी आजपर्यंतच्या पुरस्कारांविषयी समाधान व्यक्त केले ही बाब निश्चितच समाधान देणारी आहे.

महाराष्ट्र फाउण्डेशन पुरस्कारांची घोषणा होण्यापूर्वीच पुरस्कारांसाठी योग्य नावांची निवड कशी करता येईल या संबंधी विचार करण्यात आला होता. मराठी साहित्यक्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, त्यांचे कार्य, यासंबंधीची साहित्याविषयी आस्था असणारांची मत-मतांतरे तसेच दरवर्षी प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांची संख्या व त्यांच्या गुणवत्तेविषयीची अनेक प्रकारची मते लक्षात घेता चार पांच तज्ञांच्या समितीने हे काम करणे योग्य ठरणार नाही असे आम्हाला वाटले. म्हणूनच साहित्यक्षेत्राशी संबंधित व्यक्तींकडून त्यासंबंधी शिफारशी मागवाव्यात, असे ठरविण्यात आले. या शिफारशी मागवित असताना साहित्यक्षेत्राशी संबंध, वयोगट, साहित्यक्षेत्रातील भिन्न भिन्न अभिरूची व मते या सर्वांचा विचार करून व्यक्तींची निवड करण्याचा निर्णय घेण्यात आला. गेली सात वर्षे लेखक, समीक्षक, मराठीचे प्राध्यापक व सुजाण वाचक अशा दोनशे व्यक्तींकडून शिफारशी मागविण्याची पद्धत ठेवली आहे.

अशा शिफारशींमधून काही व्यक्ती व ग्रंथ यांची निवड करणे ही या प्रक्रियेतील दुसरी पायरी. या टप्प्यांवर अशी निवड करण्यासाठी साहित्याविषयी उदार आस्था व साहित्यक्षेत्राशी व्यापक संबंध असणाऱ्या व्यक्तींची एक समिती निर्माण करण्याची दक्षता सुरुवातीपासून घेतली गेली आहे. सुरुवातीच्या काळात डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर, डॉ. अरुण टिकेकर, श्री. दया पवार, श्री. सतीश काळसेकर, डॉ. सुधीर पानसे या व्यक्तींनी या समितीवर काम केले. पुढील काळात काही बदल होऊन कविवर्य नारायण सुर्वे, प्रा. वसंत आबाजी डहाके, प्रा. नागनाथ कोतापले व डॉ. विजया राजाध्यक्ष यांनी या समितीवर काम करून सहकार्य केले. या सर्वांचे मराठी साहित्यसंस्कृतीविषयीचे भान, व त्यांची मराठी साहित्यक्षेत्राविषयीची उदार आस्था यांचे प्रतिबिंबच आजवरच्या पुरस्कारांमध्ये पडले आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

गेल्या सात वर्षातील केवळ गौरव पुरस्कारांची निवड पाहिली तरी ती किती वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींची आहे हे लक्षात आल्यावाचून




सं।वा।दि।नी २०००

राहणार नाही. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील मान्यवर प्रा. मे. पुं. रेगे, अलिकडच्या काळातील इतिहास क्षेत्रातील संशोधक य. दि. फडके महानुभाव साहित्याचे गाढे संशोधक डॉ. वि.भि. कोलते, सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्राविषयी विचार करणारे विचारवंत श्री. वसंत पळशीकर, सौंदर्यशास्त्राविषयीचे विचार पद्धतशीरपणे मराठीत आणणारे डॉ. रा.भा. पाटणकर आणि या वर्षी लोकसाहित्य व संत साहित्याच्या क्षेत्रात मन:पूर्वक व मोलाचे कार्य करणारे डॉ. रा.चिं. ढेरे.

ललित साहित्याच्या क्षेत्रातील पु. ल. देशपांडे, विंदा करंदीकर, विजय तेंडुलकर ही नावे तर निर्विवाद

आहेतच पण त्याचबरोबर मराठी समाजातील स्त्रियांचे प्रश्न धीटपणे मांडून मराठी साहित्यविश्वात खळबळ निर्माण करणाऱ्या द्रष्ट्या लेखिका श्रीमती मालतीबाई बेडेकर व १९५० नंतरचे महत्वाचे मराठी कादंबरीकार श्री. श्री. ना. पेंडसे ही निवडही वैशिष्ट्यपूर्ण व निर्विवाद होती असेच म्हणावे लागेल. या गौरव पुरस्कारांच्या निमित्ताने मराठी साहित्य-क्षेत्रातील किती मान्यवरांचा सन्मान करण्याची आम्हाला संधी मिळाली हे पाहून खरोखरच धन्यता वाटते.

या पुरस्कार योजनेतील ग्रंथपुरस्कार ही सर्वात धोक्याची जागा. पण येथेही किती विविध प्रकारच्या ग्रंथांना हे पुरस्कार मिळाले आहेत, हे पाहण्यासारखे आहे. 'दिवसे-दिवस' 'ताम्रपट' 'भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा' 'एकूण कविता : दोन' यासारखी पुस्तके एका प्रकारच्या अभिरुचीची दर्शक आहेत असे म्हणावे तर त्याचबरोबर 'उदकाचिया आर्ती' 'वनवास' यासारख्या पुस्तकांची निवडही पुरस्कारांसाठी केली गेली आहे. त्याचबरोबर 'शुभ्र काही जीव घेणे' 'कार्यरत' यासारखी पुस्तकेही पुरस्कारासाठी निवडली गेली आहेत.

वैचरिक ग्रंथ पाहिले तर तेथेही 'आस्तिक शिरोमणी चार्वाक' 'हिंदू-मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद' अशा ग्रंथांबरोबरच 'जाळ्यातील चंद्र', 'तुकारामदर्शन' यासारख्या ग्रंथांचाही पुरस्कारासाठी विचार करण्यात आला आहे. अ-पारंपरिक विषयावरील म्हणून 'जिहाद' 'आक्रोश' 'दशक्रिया' 'लॉरीबेकर' 'विमुक्तायन' यासारख्या पुस्तकांचा पुरस्कारांसाठी केलेला विचार हे तर ग्रंथ पुरस्कारांच्या संदर्भातील एक वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. गेल्या सात वर्षांतील हे ग्रंथ पुरस्कार म्हणजे भारतातील सल्लागार समितीची उदार साहित्याभिरुची व साहित्यविषयक व्यापक आस्था यांचेच दर्शक आहेत असे आम्हास वाटते.

त्या त्या वर्षातील हे पुरस्कार म्हणजे मराठी साहित्यातील सर्वश्रेष्ठ व्यक्ती व सर्वोत्कृष्ट पुस्तके आहेत असा कोणताही भ्रम या पुरस्काराशी संबंधित कोणाच्याही मनात कधीच नव्हता. असे पुरस्कार म्हणजे साहित्यिकांची स्पर्धा नसते. साहित्याविषयी आस्था असणाऱ्या, त्यासंबंधी विचार करणाऱ्या अभ्यासकांचे व रसिकांचे एक मत एवढाच अशा पुरस्कारांचा अर्थ असतो. आपल्या मताशी अनेकांनी नव्हे तर सर्वांनी सहमत असावे असे कोणालाही वाटणे स्वाभाविक असते. तो मानवी स्वभाव आहे. परंतु साहित्यपुरस्कारांच्या संदर्भात असे घडवून आणणे ही अशक्यप्राय गोष्ट आहे हे भान या पुरस्काराशी संबंधित असणाऱ्या सर्वांनाच आहे. म्हणूनच गेल्या सात वर्षातील या पुरस्कारांचे मराठी साहित्यविश्वातील सर्व स्तरांतून स्वागत झाले यातच आमचे समाधान आहे.

या आमच्या प्रयत्नात ज्यांनी मनापासून सहकार्य केले त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

**दिगंबर पाध्ये**
निमंत्रक
मराठी साहित्य पुरस्कार निवड समिती (भारत)

5430

# महाराष्ट्र फाउण्डेशन
# मराठी साहित्य पुरस्कार योजना
# २००० चे मानकरी



**महाराष्ट्र फाउण्डेशन गौरव पुरस्कार**
रा. चिं. ढेरे

विशेष पुरस्कार
मराठीतून विज्ञानप्रसार
**रा. वि. सोवनी**





विज्ञानविषयक
नियतकालिक
**'सृष्टिज्ञान'**

**ग्रंथ**


**तणकट** । राजन गवस
**आतंक** । विलास सारंग
**कर्मयोगी संन्यासी** । नरेंद्र चपळगावकर
**शोकात्म विश्वरूप दर्शन : जीवन आणि साहित्य** । स. रा. गाडगीळ
**नवरात्र** । अशोक चौसाळकर















# डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे

## रसिक कविदृष्टीचा संशोधक



महाराष्ट्रातील मराठी साहित्य, लोकसंस्कृती, दैवते यांचे थोर अभ्यासक आणि अग्रगण्य संशोधक डॉ. रा. चिं. ढेरे यांनी आता आपल्या संशोधन कार्याची पन्नास वर्षे पूर्ण केली आहेत. आजही त्यांचे संशोधनकार्य अव्याहतपणे चालू आहे. अनेक ग्रंथांच्या लेखनाचे संकल्प त्यांच्या डोक्यात आहेत. काहींची पूर्वतयारीही झालेली आहे. त्यांचा हा लेखनप्रवास अत्यंत खडतर होता. त्यांचा जन्म २१ जुलै १९३० रोजी झाला. पाच वर्षांचे असतानाच आई-वडील निधन पावले. आजोळच्या खेड्यात पुढील ७-८ वर्षांचे बालपण गेले. आजोळीही परिस्थिती बेताचीच असल्यामुळे 'दुःख, दारिद्र्य आणि दुखणी' या तीन दकारांच्या संगतीतच हे दिवस गेले, पण त्या गावातील सांस्कृतिक समृद्धीमुळे त्यांचे ते दिवस त्यांना सुसह्य झाले. तेथील वासुदेव, पिंगळा, जोशी इत्यादी लोकसंस्कृतीच्या उपासकांची गाणी, स्त्रियांच्या ओव्या आणि गाणी, मंदिरातील भजनं, कीर्तनं, मंदिरापुढील आवारात शे-दोनशे श्रोत्यांसमोर केलेलं पोथीवाचन यांचे त्यांच्या बालमनावर दृढ संस्कार झाले आणि भावी आयुष्यात तेच त्यांच्या अभ्यासाचे, संशोधनाचे विषय झाले. त्यानंतर शिक्षणासाठी ते पुण्याला आले. कधी दिवसशाळा, कधी रात्रशाळा असं करत करत एस.एस.सी. पर्यंतचं शिक्षण पूर्ण केलं. तेव्हा अपरिहार्य झालं म्हणून नोकरी पत्करली. पण प्रखर ज्ञानलालसेमुळे व्यासंग चालू ठेवला. वयाच्या विसाव्या वर्षी त्यांचे पहिले पुस्तक प्रसिद्ध झाले. तेव्हापासून आजतागायत ही ग्रंथनिर्मिती अव्याहतपणे चालू आहे. आपल्या ज्ञानसाधनेत नोकरीचा अडसर नको म्हणून त्यांनी १९५९ साली नोकरीचा पाश तोडला आणि लेखनोपजीवी म्हणून राहण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या संशोधनाला सर्वत्र मान्यता मिळत गेली आहे. हे कार्य चालू असतानाच ढेरे १९६३ साली बी.ए. झाले. त्यानंतर एम.ए. न करता १९७५ साली पीएच.डी. झाले. प्रबंधाचा विषय होता 'षट्स्थल : एक अध्ययन' (विसोबा खेचरविरचित या नवोपलब्ध ग्रंथाच्या निमित्ताने यादवकालीन वाङ्मयाच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीचे पुनरवलोकन) हाच प्रबंध पुढे 'चक्रपाणि : आद्य मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी' या नावाने प्रसिद्ध झाला. (१९७७). त्यानंतर १९८० साली ते डी.लिट्. झाले. ते पुणे विद्यापीठाचे



महाराष्ट्र फाउण्डेशन गौरव पुरस्कार
**डॉ. रा. चिं. ढेरे**
संतसाहित्य व लोकसाहित्याचे अभ्यासक

पहिले डी.लिट्. होत. या पदवीसाठी त्यांनी आपले १) 'लज्जागौरी', २) 'संत साहित्य आणि लोकसाहित्य : काही अनुबंध', ३) 'महाराष्ट्राचा देव्हारा' (संतांच्या दृष्टिकोणातून घडविलेले महाराष्ट्रातील देवतांचे नवदर्शन) आणि ४) 'चक्रपाणि' (आद्य मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी) हे ग्रंथ विद्यापीठाला सादर केले होते. आजपर्यंत त्यांच्या ग्रंथांची संख्या शंभरपर्यंत गेली आहे. संकीर्ण शोधलेखांची संख्या दीडशेच्या आसपास गेली आहे. या एकलव्यनिष्ठेने केलेल्या ज्ञानसाधनेबद्दल वेळोवेळी त्यांना अनेक पुरस्कारही मिळत गेले आहेत. त्यांच्या 'दत्त संप्रदायाचा इतिहास' (१९५९), 'नाथ संप्रदायाचा इतिहास' (१९५९), 'प्रवासी पंडित' (१९६१), 'मुसलमान मराठी संतकवी' (१९६९), 'श्रीनामदेव : एक विजययात्रा' (१९७१), 'मुरारिमल्लविरचित बाळक्रीडा' (१९७८), 'चक्रपाणि' (१९८०), 'लज्जागौरी' (१९७८), 'श्रीविठ्ठल : एक महासमन्वय' (१९८४) या ग्रंथांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळाले आहेत. 'मुसलमान मराठी संतकवी' आणि 'चक्रपाणि' या ग्रंथांना पुणे विद्यापीठाचे तर 'मुरारिमल्लविरचित बाळक्रीडा' आणि 'लोकसाहित्य : शोध आणि समीक्षा' (१९९०) या ग्रंथांना महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पुरस्कार लाभले आहेत.

'श्रीविठ्ठल : एक महासमन्वय' (१९८४) या ग्रंथाला केसरी-मराठा संस्थेचा साहित्यसम्राट न. चिं. केळकर पुरस्कार, इचलकरंजी एज्युकेशन अँड चॅरिटेबल ट्रस्टचा आणि १९८७चा साहित्य अकादमी पुरस्कार हे विद्वन्मान्य पुरस्कार लाभले आहेत. त्यांच्या एकंदर् साहित्यसेवेबद्दल त्यांना पुणे महानगर पालिका, पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, नामदेव समाजोन्नती परिषद, महाराष्ट्र शासन यांनी विशेष पुरस्कार देऊन गौरव केला आहे. याशिवाय भैरूरतन दमाणी पुरस्कार, सोलापूर (१९९३), दादामहाराज नाटेकर पुरस्कार, श्री. नानासाहेब नारळकर विद्वत् पुरस्कार हे मानाचे पुरस्कारही त्यांना मिळालेले आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची सन्माननीय गौरववृत्तीही त्यांना मिळाली आहे (१९८३). सदानंद साहित्य मंडळ, औदुंबर या संस्थेच्या ४४व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांना लाभलेले आहे. अतिशय खडतर आर्थिक परिस्थिती, सततचे आजार इत्यादी अनेक अडचणींवर मात करून त्यांनी विद्वन्मान्यता, लोकमान्यता आणि राजमान्यता मिळवलेली आहे. त्यामुळे ते आज 'यत्तदग्रे विषमिव परिणामे ऽ मृतोपमम्' अशा सात्त्विक सुखाचा अनुभव घेत आहेत.













गेली चाळीस वर्षे सर्वस्वी लेखनोपजीवी राहून डॉ. ढेरे यांनी विपुल आणि विविध प्रकारचं लेखन केलं आहे. १९५० पूर्वी म. म. चित्रावशास्त्रींच्या 'समर्थ'मधून त्यांनी काही कविता व लेख लिहिले. मुद्रितशोधकाची नोकरी करत असताना 'साधना', 'केसरी'मधून स्फुटलेखन केले; रेडिओसाठी संगीतिका लिहिल्या. १९५८ ते १९६२ या काळात 'कृष्णदयार्णवकृत हरिवरदा' या ग्रंथाच्या ४ ते ८ या खंडांचे संपादन केले. मराठी साहित्य आणि संस्कृती या विषयाला वाहिलेले 'इंद्रायणी' नावाचे नियतकालिक नोव्हेंबर १९६२ ते ऑक्टोबर १९६३ या काळात चालविले. कुमार वाचकांसाठी 'महात्मा चक्रधर' (१९५८) 'नृपनिर्माता चाणक्य' (१९६०) इत्यादी सहा लघुचित्रे लिहिली. देहू, आळंदी, मोरगाव, पैठण इत्यादी महाराष्ट्रातील बारा तीर्थक्षेत्रांचा आणि महाराष्ट्राबाहेरील भुवनेश्वर, जगन्नाथपुरी, उज्जयिनी या तीन पुण्यक्षेत्रांचा परिचय करून देणाऱ्या पंधरा पुस्तिका लिहिल्या. 'अमृतकन्या' (१९५९) 'ही चिरंतनाची वाट' (१९७५), 'विराग आणि अनुराग' (१९७५), 'मानसयात्रा' (१९७७), 'पुण्याई' (१९७९) असे अनेक ललित ग्रंथ लिहिले. 'अमृतवाणी' (१९६३), 'मातृवाणी' (१९६३), 'राष्ट्रचिंतन' (१९७०-८०) अशी अनुवादित पुस्तके लिहिली. अनेक ग्रंथांची संपादने केली. त्यानिमित्ताने लिहिलेल्या प्रस्तावनांची 'कल्पवेल' (१९७६), 'चरित्रप्रभा' (१९९०) अशी पुस्तके निघाली. मराठी विषयांसाठी शालेय आणि महाविद्यालयीन स्तरांवरील क्रमिक पुस्तकं तयार केली, ग्रंथपरीक्षणे लिहिली आणि मान्यताप्राप्त संशोधनपर ग्रंथ लिहिले. त्यांच्या लेखनात अशी भरपूर विविधता असली तरी त्यांचे खरे कार्यक्षेत्र संशोधनपर लेखन हेच आहे. अर्थात वरील इतर प्रकारच्या लेखनातसुद्धा त्यांची संशोधकीय दृष्टी प्रत्ययाला येतेच.

डॉ. ढेरे यांच्या संशोधनाचे क्षेत्र मराठी साहित्य आणि संस्कृती हे असून त्याच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील धार्मिक संप्रदाय, तेथील दैवते, तेथील लोकसाहित्य, संतसाहित्य हेही त्यांच्या संशोधनाचे विषय आहेत. त्यांच्या संशोधनाची सुरुवात नाथसंप्रदायापासून झाली. भोरच्या शंकराजी नारायण पारितोषिकासाठी त्यांनी १९५२-५३च्या सुमारास नाथसंप्रदायावर एक लघुप्रबंध लिहिला. त्यानंतर




१९५९ साली 'श्रीगुरु गोरक्षनाथ : चरित्र आणि परंपरा' हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. नाथसंप्रदायावरील मराठीतला हा पहिलाच ग्रंथ होय. या संशोधनात त्यांनी डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी यांच्यासारख्या ज्येष्ठ अभ्यासकालाही अज्ञात अशा अनेक बाबींचा उलगडा केला होता. या ग्रंथाच्या द्वारा त्यांनी आपल्या संशोधनाची जी एक उच्च पातळी निश्चित केली तीच त्यांच्या भावी संशोधनातही सातत्याने कायम राहिली.

१९५८ साली त्यांचा 'श्रीनरसिंह सरस्वती : चरित्र आणि परंपरा' हाही ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्याची दुसरी आवृत्ती 'दत्त संप्रदायाचा इतिहास' या नावाने १९६४ साली प्रसिद्ध झाली. दत्त संप्रदायाची माहिती देणारा हा सर्व भारतीय भाषांमधला पहिलाच ग्रंथ होता. याही ग्रंथात त्यांनी दत्तात्रेय या देवतेची उत्पत्ती, स्वरूप आणि विकास यांचा दैवतशास्त्राच्या पद्धतीने शोध घेतला आहे. त्याचप्रमाणे दत्त संप्रदायातील सत्पुरुष, पवित्र क्षेत्रे, अन्य संप्रदायांतील दत्तात्रेयांचे स्थान आणि महत्त्व इत्यादी अंगांनी सादर केलेला अभ्यास मौलिक स्वरूपाचा आहे. यानंतर जैन, वीरशैव, गाणपत्य आणि नागेश या संप्रदायांतील मराठी वाङ्मयाचा परिचय करून देणारा त्यांचा 'प्राचीन मराठीच्या नवधारा' हा ग्रंथ १९७२ साली प्रसिद्ध झाला. याव्यतिरिक्त माध्व, रामानुज, हरिनारायण, आनंद याही संप्रदायातील मराठी वाङ्मयाचा परामर्श घेण्याचा त्यांचा संकल्प आहे.

१९६१ साली प्रसिद्ध झालेल्या 'खंडोबा' या ग्रंथाद्वारे डॉ. ढेरे यांनी दैवतविज्ञान या क्षेत्रात मोलाची भर घातली आहे. खंडोबा हे दैवत कर्नाटकातून महाराष्ट्रात आले असून जवळ जवळ अठराव्या शतकापर्यंत क्षुद्र दैवत मानले जात होते. तो मुळात धनगरांचा देव. पण इंदूरच्या होळकरांमुळे त्याला राजाश्रय मिळाला आणि तेव्हापासून अनेक उच्च कुळातल्या घराण्यांनी त्याचा स्वीकार केला. खंडोबा, मल्हारी, मार्तंड या त्याच्या नावांमागे त्याचे कानडीपण दडलेले आहे, हे त्यांनी फार चांगल्या तऱ्हेने स्पष्ट केले आहे. खंडोबा महाराष्ट्रात आल्यावर तो तेथील भैरवाशी एकरूप झाला. खंडोबाची पत्नी म्हाळसा ही मुळात शिवधर्मी देवता, पण महाराष्ट्रात मोहिनी रूपाने ती वैष्णवरूपातही कशी आढळते याची सुंदर उपपत्ती डॉ. ढेरे यांनी या ग्रंथात मांडली आहे. 'लज्जागौरी' (१९७८) हा त्यांचा दैवतशास्त्रावरील अतिशय सुंदर ग्रंथ आहे. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक या तीन राज्यांमध्ये विशिरा अथवा कमलशीर्ष योनिदेवतांच्या मूर्ती आढळतात. त्या योनिदेवतांच्या उपासनेवर डॉ. ढेरे यांनी प्रकाश टाकला आहे. ही मातृदेवता आहे, असे स्टेला क्रामरिश यांचे मत होते. या देवतेची अपत्यप्राप्तीसाठी पूजा होत असली तरी ती व्यापक प्रमाणावर सर्जनाची, विश्वसर्जनाची देवता आहे, असे डॉ. ढेरे यांचे मत

आहे. या देवतेची मंदिरे सबंध हिंदुस्थानभर आढळतात. डॉ. ढेरे यांनी या नाजूक विषयाचा उलगडा अतिशय हळुवारपणे सौंदर्यपूर्ण शैलीत केला आहे. 'महाराष्ट्राचा देव्हारा' (१९७८) या ग्रंथामध्ये महाराष्ट्रातील अनेक लोकदैवतांचा त्यांच्या गुणवैशिष्ट्यांसह परिचय करून दिलेला आहे. त्यामध्ये लोकधर्मी देवता, तंत्रधर्मी देवता, शक्तिदेवता अशा विविध प्रकारच्या देवतांची आणि त्यांच्या उपासनांची ओळख करून दिली आहे. शेवटच्या दोन प्रकरणांत महाराष्ट्राचे लोकप्रिय दैवत विठोबा याच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेतलेला आहे. विठोबा हे मूळ गोपजनांचे दैवत असून त्याच्या स्वरूपामध्ये पुढे श्रीकृष्ण, शिव, बुद्ध यांच्या व्यक्तिवैशिष्ट्यांचा समन्वय झाला, हे त्यांनी स्पष्ट केले आहे. या ग्रंथातील 'श्रीविठ्ठल : एक महासमन्वय' या लेखातील बीजभूत आशयाचाच पुढे त्यांच्या याच शीर्षकाच्या प्रसिद्ध ग्रंथात विस्तार झाला आहे. 'लोकदैवतांचे विश्व' (२०००) या ग्रंथात त्यांनी बालग्रहादी अनेक क्षुद्र दैवतांच्या स्वरूपावर प्रकाश टाकला आहे.




लोकतत्त्व आणि लोकतत्त्वीय दृष्टीने विविध पुराव्यांचा अभ्यास हे डॉ. ढेरे यांच्या व्यासंगाचे आवडते क्षेत्र आहे. 'संतसाहित्य आणि लोकसाहित्य : काही अनुबंध' (१९७८), 'मराठी लोकसंस्कृतीचे उपासक' (१९६४), 'लोकसंस्कृतीची क्षितिजे' (१९७१), 'लोकसाहित्य : शोध आणि समीक्षा' (१९९०) या त्यांच्या ग्रंथांत त्यांची लोकतत्त्वीय दृष्टी स्पष्टपणे दिसून येते. संतांच्या संप्रेषणाचे लक्ष्य लोक हेच होते, त्यामुळे त्यांची सर्व साहित्यनिर्मिती या लोकतत्त्वीय दृष्टीचाच आविष्कार आहे, हेच त्यांच्या 'संतसाहित्य आणि लोकसाहित्य' या ग्रंथाचे सूत्र आहे. त्यामुळे संतसाहित्य या संज्ञेची कक्षा संतसंस्कृतीच्या अर्थकक्षेशी त्यांनी समरूप मानलेली आहे. या दृष्टिकोणातून त्यांनी संतसाहित्यातील गुरुगौरव, ग्राम्यता, नाममाहात्म्य, संतांनी वापरलेली प्रतीके यांचे विश्लेषण केले आहे. 'लोकसंस्कृतीचे उपासक' या पुस्तकात वासुदेव, गोंधळी, भुत्या, वाघ्या-मुरळी, भराडी, पोतराज इत्यादी अनेक लोकसंस्कृतीच्या उपासकांचा रसाळ परिचय करून दिला आहे. 'लोकसंस्कृतीची क्षितिजे' या ग्रंथात लोकसंस्कृतीच्या अनेक अंगांवर नवा प्रकाश टाकला आहे. श्रीकृष्णचरित्रातील पुतना ही बालग्रह आहे; यमलार्जुन वृक्ष हे चैत्य वृक्ष म्हणजे यक्षनिवासस्थान असलेले वृक्ष होते; कालिया हा जलाशयरक्षक नाग होता; नरसिंह हा सिंहमुख प्रकारचा यक्ष असून त्याला विष्णूचा अवतार बनवून त्याचे उन्नयन केले गेले; गोंधळ हा मूलत: भूतमातेच्या पूजनाचा विधी आहे; लोकज्योतिषाची विविध रूपे, बालग्रहांचे स्वरूप, इत्यादी अनेक गूढ प्रश्नांवर त्यांनी प्रकाश टाकला आहे. डॉ. ढेरे यांचा 'लोकसाहित्य : शोध आणि समीक्षा' हा ग्रंथ संस्कृतीचा अभ्यास किती विविध अंगांनी होऊ शकतो याचा वस्तुपाठ आहे. हा निरनिराळ्या विषयांवरील अकरा लेखांचा संग्रह आहे.

त्यामध्ये वि. का. राजवाडे आणि साने गुरुजी यांच्या लोकसाहित्यविषयक कार्याचा ऊहापोह आहे. 'अंकुश पुराण' या कथाकाव्याच्या परिचयाच्या अनुषंगाने पुरुषप्रधान संस्कृतीतील केवळ रावणच सीतेची अप्रतिष्ठा करतो, असे नसून रामही तिची तेवढीच अप्रतिष्ठा करतो, या दारुण सत्यावर प्रकाश टाकला आहे. 'महानिर्वाण' या सतीश आळेकरांच्या विरुपिकेचे लोकधर्मीय विश्लेषण त्यांनी केले आहे.

डॉ. ढेरे यांच्या संशोधनाचे आणखी एक क्षेत्र म्हणजे मध्ययुगीन मराठी साहित्य हे होय. मध्ययुगीन मराठी साहित्यातील 'नरेंद्रविरचित रुक्मिणीस्वयंवर' (१९६५), 'निरंजनमाधवविरचित सुभद्रास्वयंवर' (१९६७), 'संतांच्या चरित्रकथा' (१९६७), 'संतांच्या आत्मकथा' (१९६९), श्रीचक्रधरनिरूपित श्रीकृष्णचरित्र' (१९७३), 'महिकावतीची बखर' (१९७३), 'श्रीशिवदिग्विजय' (१९७५) इत्यादी

*शोधदृष्टीप्रमाणेच त्यांच्या शोधप्रतिभेची यंत्रणाही आणखी एका प्रकारच्या संकलनातून स्पष्ट होईल. अकल्पनीय जुळणी करून सिद्धान्ताकडे वळणारी त्यांची शोधप्रतिभा अत्यंत तरल आहे. तिच्या आश्चर्यकारक विलासाची स्थळे त्यांच्या लेखनात सर्वत्र आहेत. अशा स्थळांचे संकलन करून त्यांचे निरीक्षण/विश्लेषण केले, तर त्यांच्या शोधप्रतिभेच्या संचाराची रीत स्पष्ट होईल. त्यातून शोधविषयाकडे कसे जावे, याच्या वाटा पुढिलांना उमगतील.*

*— डॉ. र. बा. मंचरकर*

अनेक ग्रंथांचे संपादन डॉ.ढेरे यांनी केले आहे. या ग्रंथांच्या प्रस्तावनांतून त्यांचा व्यासंग आणि साक्षेप यांचे दर्शन होते. 'विविधा' (१९६७), 'गंगाजळी' (१९७२), 'शोधशिल्प' (१९७७), 'कल्पद्रुमाचिये तळी' (१९९०), 'प्राचीन मराठी वाङ्मय : शोध आणि संहिता' (१९९१) हे त्यांच्या मध्ययुगीन मराठी वाङ्मयासंबंधीच्या स्फुटलेखांचे संग्रह आहेत. 'चक्रपाणि' (१९७७) हा त्यांचा प्राचीन मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी स्पष्ट करणारा विख्यात प्रबंध आहे. 'विविधा' या संग्रहातील लेखांचे देवदेवताविषयक लेख, संत-साहित्यविषयक आस्वादनपर लेख, संशोधनपर लेख आणि व्यक्तिपर लेख असे चार विभाग होतात. पहिल्या विभागात गणेशोपासक, शिवोपासक, रामोपासक आणि त्यांचे वाङ्मय याविषयीचे लेख आहेत. 'नेपाळातील तुळजाभवानी' या लेखात नेपाळातील भाटगाव येथील तुळजाभवानीच्या मंदिराचा इतिहास सांगितला असून तुळजाभवानीच्या प्राचीनतेवर प्रकाश टाकला आहे. दुसऱ्या विभागात नामदेव, एकनाथ, रामदास, तुकाराम यांच्यासंबंधीचे लेख आहेत. तिसऱ्या विभागात मध्ययुगीन काळातील ज्ञानेश्वरांच्या अभ्यासकांचा परिचय, नामदेवांच्या ज्ञानेश्वरचरित्राची चिकित्सा, एकनाथांच्या निमित्ताने संतचरित्र लेखनाची संशोधकीय भूमिका आणि मध्ययुगीन वाङ्मयाच्या इतिहासातील विवेकनिष्ठ पुरोगामी विचारसरणी व्यक्त करणारी संत बहिणाबाईंची 'वज्रसूची' या महत्त्वपूर्ण निबंधाचा समावेश आहे. चौथ्या विभागात मोरोपंत, विवेकानंद, आगरकर, डॉ. वासुदेवशरण आगरवाल या निरनिराळ्या क्षेत्रांतील व्यक्तींचा परिचय करून दिला आहे. 'गंगाजळी'मध्ये विठा रेणुकानंदन, जनी जनार्दन, हरिबुवा भोंडवे, मध्वमुनीश्वर, रामा जनार्दन, रे. जस्टिन ॲबट इत्यादी वाङ्मयसेवकांचा परिचय करून दिला आहे. 'संतसाहित्यातील हरिहरैक्य', 'नामदेवगाथ्याची संहिताशुद्धी', 'महाराष्ट्रातील मुद्रणपूर्व ग्रंथव्यवहार' इत्यादी महत्त्वाचे लेखही यात आहेत. 'शोधशिल्प' या संग्रहात ज्ञानदेव आणि ज्ञानदेवोत्तर आणि मुकुंदराज आणि मुकुंदराजोत्तर असे दोन विभाग आहेत. पहिल्या विभागात अनेक महत्त्वाच्या विषयांवरील संशोधन आढळते. श्रीज्ञानेश्वरांची कुलस्वामिनी म्हणजे सप्तशृंगी भगवती होय. ज्ञानेश्वरीतील 'धर्मकीर्तन' आणि 'धर्मनिधान' या शब्दप्रयोगांचा वास्तुशिल्पपर अर्थ, ज्ञानदेवांच्या गीतारत्नप्रासाद या रूपकातील उपमान वेरूळचे कैलासलेणेच होय इत्यादी प्रकारचे त्यांचे गाजलेले निष्कर्ष या संग्रहातील लेखांमधून आढळतात. दुसऱ्या विभागात मुकुंदराजांच्या चरित्रातील विवाद्य स्थलांचा नवीन साधनसामग्रीच्या संदर्भात उलगडा करण्याचा प्रयत्न आढळतो. 'कल्पद्रुमाचिये तळी' या संग्रहात डॉ. ढेरे यांच्या ज्ञानदेवविषयक संशोधनपर लेखांचे संकलन आहे. त्यात 'शोधशिल्पा'तील वर उल्लेखिलेल्या लेखांचा समावेश आहे. 'ज्ञानदेवांची बोधभूमी' ह्या लेखात 'ज्ञानेश्वरांचा कौलमतातील वामसाधनेशी सांप्रदायिक परिचय होता. त्यामुळेच ज्ञानेश्वरीत अनेक शृंगाररुपके

भेटतात. पण ज्ञानेश्वरांनी कौल तांत्रिकांचा विकृताचार टाळला आणि महाराष्ट्राला एका संकटातून सोडवले', असा नवा विचार मांडलेला आहे. इतरही लेखात याचप्रकारचे नवे संशोधन आहे. 'प्राचीन मराठी वाङ्मय' या संग्रहातही अशाच प्रकारचे मौलिक संशोधन आढळते. नामदेवशिष्या नागरी हिच्या आत्मचरित्राचा एका लेखात परिचय करून दिला आहे. याच संग्रहात डॉ. ढेरे यांचा 'प्राचीन मराठी वाङ्मयाचे संशोधन' हा दीर्घ निबंध आहे. या निबंधात या क्षेत्रातील संशोधकांना किती गोष्टींचे अवधान सांभाळावे लागते, याविषयी अनुभवनिष्ठ मार्गदर्शन आहे. संशोधनाच्या पार्श्वभूमीवरच वाङ्मयेतिहासाची मांडणी करण्यासाठी देशीयता, लेखक वाचक अंत:संबंध इत्यादी वाङ्मयसमीक्षेतील आधुनिक दृष्टिकोणांचाही त्यांनी ऊहापोह केला आहे. 'चक्रपाणि' ह्या प्रबंधातील संशोधनामुळे अनेक रूढ समजुतींना धक्के बसले आहेत. मुकुंदराजांचे आजेगुरू हरिनाथ, महानुभाव संप्रदायाचे संस्थापक श्रीचक्रधर यांचे एकरूपत्व सिद्ध करणारा एक धाडसी विचार त्यांनी मांडला आहे. त्या अनुषंगाने प्राचीन वाङ्मयातील विविध संप्रदाय, त्यांचे अंत:संबंध यांच्यावर एक नवाच प्रकाश पडतो.

डॉ. ढेरे यांच्या लेखनसृष्टीचे हे एक ओझरते विहंगमदर्शन आहे. या लेखनाच्या अफाट पसाऱ्यामुळे त्यातील कृतींचा साधा नामनिर्देशही अशक्यप्राय होतो, तिथे त्यांना न्याय देण्याचा प्रश्नच नाही. डॉ. ढेरे यांनी एकलव्याच्या निष्ठेने केलेली ही ज्ञानसाधना जेवढी अफाट आहे, तेवढीच रमणीय आहे. आपल्या संशोधनासाठी, त्यावरून निघणाऱ्या निष्कर्षाच्या सिद्धीसाठी ते केवढी साधनसामग्री हाताळतात, किती पुराव्यांचे ढीग उपसतात, ते पाहूनच मन विस्मयचकित होते. जातिवंत संशोधकाला साजेल अशा वस्तुनिष्ठ वृत्तीने ते निर्णय घेतात. आपल्या वैयक्तिक धारणांचा ते संबंध येऊ देत नाहीत. ते म्हणतात, "देवाचा शोध अन् देवविषयक मानवी धारणांचा शोध या दोन वेगळ्या बाबी आहेत, जिज्ञासेच्या दोन वेगळ्या पातळ्या आहेत. देवाचा शोध हा व्यक्तिविशिष्ट आंतरिक साधनेचा विषय आहे; तर देवविषयक मानवी धारणांचा शोध हा सामाजिक-सांस्कृतिक इतिहासाच्या आकलनाचा विषय आहे." (महाराष्ट्राचा देव्हारा, पृ. १४).

त्यामुळेच 'रामराज्याची स्फूर्तिकेंद्रे'मध्ये रामगौरव गाथा गाऊन रामाबद्दलचा आपला आदरभाव भरभरून व्यक्त करणारे डॉ. ढेरे रामाच्या सीतात्यागाबद्दल मात्र तितक्याच आवेशाने आपला राग व्यक्त करतात. "पण सीतेची शोकांतिका ही भारतीय स्त्रीजीवनाचीच प्रातिनिधिक शोकांतिका असल्यामुळे ती घडविण्याचे पुरेपूर 'श्रेय' त्यांच्या पदरात टाकताना आपल्या पारंपरिक श्रद्धांचा अडसर दूर करायला हवा, असे मी माझ्या श्रद्धाशील मनाला कठोरपणाने बजावले आहे." (लोकसाहित्य : शोध आणि समीक्षा, शोधाच्या वाटेवर, पृ. अकरा). त्यांची ही भावनाप्रधानता आणि वस्तुनिष्ठता त्यांच्या लेखनाला जिवंतपणा प्राप्त करून देते. डॉ. ढेरे यांनी आपला व्यासंग जोपासत असतानाच अंत:करणात एक रसिक कविदृष्टीही जोपासली आहे. त्यामुळे त्यांच्या विचारांची अभिव्यक्ती काव्यमय होते. ते म्हणतात, "परंतु माझी वृत्ती रसिकाची अन् पिंड श्रद्धेच्या वातावरणात पोसलेला असल्यामुळं प्रमेयाचं कोरडेपण मला रुचत नाही, पचत नाही. भावानं भिजलेला शब्द मला मोह पाडतो. या मोहामुळं आपला आशय शबल होऊ नये, याविषयी जास्तीतजास्त दक्षता घेण्याचा प्रयत्न मी केला आहे." (महाराष्ट्राचा देव्हारा, नंदादीपाच्या प्रकाशात, पृ. ११) त्यांच्या या काव्यमय शैलीचा प्रत्यय समग्र ढेरे वाङ्मयात पावलोपावली येत जातो.

**– डॉ. कल्याण काळे**

*संतसाहित्य हा ढेऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय. पण त्यांनी तो वाङ्मयीन अंगाने क्वचित अवलोकिला आहे. त्यांची वाङ्मयसमीक्षा शास्त्रीय चिकित्सेपेक्षा भावाकूल रसिकतेने भरलेली आहे. तिच्यात आकलन-आस्वाद अधिक आहे. मूल्यमापन कमी आहे. पण या साहित्याच्या अभ्यासाला पूरक असा अभ्यास मात्र त्यांनी विपुल प्रमाणात मांडलेला आहे. मध्ययुगीन मूल्यव्यूहात जन्मूनही संतसाहित्य आजच्या सामाजिक व्यथा-वेदनांशी, विचारांशी कसे सहकंप पावते, हे त्यांनी आवर्जून दाखविले आहे. आजच्या युगाशी गतकालीन साहित्याचा रेलेव्हन्स स्पष्ट करून त्यांनी त्याची उपयुक्तता दाखवून दिली आहे आणि आजच्या वाचकाला त्याकडे सन्मुख केले आहे.*


*- डॉ. र. बा. मंचरकर*

अगदी लहानपणातील काही दृश्यं, काही आवाज, काही रंग आणि काही प्रसंग आठवणीत राहून गेले आहेत -

सकाळी झोपेतून डोळे उघडले की समोर भिंतीला ओळीनं लावलेल्या शेल्फांवरून छताला भिडलेली पुस्तकं. चारही बाजूंच्या भिंतींना पुस्तकंच. नजर त्यांच्यावरून फिरत रहायची. अर्थ कळो न कळो, त्या पुस्तकांची नावं, त्या नावांची अक्षरं आणि त्यांचे रंग मनात उतरत रहायचे. 'अवधूती मस्ती', 'दिव्यावदान में संस्कृतिका स्वरूप', 'सार्थवाह', 'प्राचीन भारतीय लोकधर्म', 'योग-दर्शन' अशी काही नावं अजूनही आठवतात.

'कोवळे आकाश', 'स्तोत्र रत्नावली', 'चित्रवीणा' ही पुस्तकं त्यांच्या नावांमुळे इतकी आवडलेली की केव्हाही ती नुसती बाहेर काढावीत, हाताळावीत, त्यांचा वास घ्यावा ही माझ्या आवडीची गोष्ट झालेली.

# पुस्तकांत रमणारे



घरात अपरंपार पुस्तकं होती. मोठमोठ्या कोनाड्यांमधून, जिन्याखालच्या पेट्यांवरून, कॉटखालच्या जागेमधून पुस्तकंच भरलेली. एकच एक कपाट. सुरेख आरशाचं, गोदरेजचं. ते उघडलं की आत लाल रुमालात बांधलेल्या रंगीत चित्रांच्या पोथ्या. आतलं ते जग अद्भुतच वाटायचं.

अशा आपल्या घराविषयी, त्याच्या वेगळेपणाविषयी तेव्हापासूनच मनात एक प्रकारचा अभिमान आणि आनंद भरून गेलेला होता. 'कोणकोण आहे गं तुमच्या घरी?' असा प्रश्न कुणी विचारला तर, 'आमच्या घरात ना पुस्तकं राहतात आणि आम्ही सगळे सहाजण त्यांना सांभाळतो' असं उत्तर द्यावंसं वाटायचं.

'तुझे वडील काय करतात?' हा आणखी एक प्रश्न असा होता की ज्याचं उत्तर म्हणून माझ्या मनात एक खास माझं असं कल्पनाचित्र होतं. कित्येक वर्षं होतं. एक जुनं जुनं असं दगडी देऊळ आहे मोठ्ठंच्या मोठ्ठं. त्याच्यावर खूप शिल्पं आहेत. आत कोरीव खांब आहेत आणि तिथल्या किंचित अंधारात उभं राहून अण्णा ते देऊळ, त्याची घडण, त्यावरच्या शिल्पांचं कोरीव काम हे सगळं मला समजावून देत आहेत - हे काही मी कोणाला सांगायची नाही, पण माझ्या मनात त्यांच्या प्रश्नाचं उत्तर अगदी हेच असायचं.

घरात त्यावेळी एका पलंगापलीकडे इतर काही नव्हतंच. खुर्च्या नव्हत्या, टेबल नव्हतं. रेडिओ नव्हता. कपड्यांसाठी कपाटं नव्हती. काही म्हणजे काहीच नव्हतं. पण त्याचमुळे घर खूप ऐसपैस मोकळं होतं. पुष्कळ माणसं यायची आणि त्यांच्या गप्पांनी घर भरून जायचं. तो एकमेव पलंगसुद्धा घरात ओल होती आणि धाकटा भाऊ बाळ होता म्हणून पुस्तकं गहाण ठेवून अण्णांनी आणला होता म्हणे. ज्यांच्याकडून तो घेतला, त्या भल्या गृहस्थांनी नंतर पुस्तकंही परत दिली आणि पलंगही आम्हालाच देऊन टाकला.

तर मी सांगते आहे त्या मोकळ्या घरातल्या दिवसांची गोष्ट. तेव्हा मधल्या खोलीत सतरंजीचा चौकोनी तुकडा खाली टाकून, भोवताली पुस्तकांचे गठ्ठे ठेवून अण्णा लिहायला बसायचे. कधी भल्या सकाळपासून अगदी संध्याकाळपर्यंत. आई-आत्यांचं खालच्या मजल्यावरून पाणी भरणं, स्वयंपाक, आमचा वावर, दंगा-अण्णांना कशाचाही त्रास व्हायचा नाही. खेळता खेळता मोठ्ठा आरडाओरडा करत आम्ही कुठून तरी धावत यायचो आणि मधल्या खोलीत अण्णांना पाहून एकदम थबकून तोंड मिटायचो. पण मिनिटभरातच त्या गप्प रहाण्याचा विसर पडून पुन्हा आमची धावाधावीला सुरुवात. अण्णा मात्र ओरडण्याइतकंही लक्ष आमच्याकडे देत नसत. म्हणजे ते लिहिण्यात इतके बुडालेले असत की विचारू नका.

मधून मधून चहा मात्र हवाच. तो आई-आत्या येता-जाता आठवणीनं समोर ठेवीत. मग कित्येक वेळ म्हणत, 'मी चहा घेतला का गं मगाशी? की नाहीच?' कधी आमच्याबरोबर जेवणही होऊन जाई त्यांचं आणि मग तासादोनतासानं पुन्हा लिहिण्याची तंद्री मोडली की घड्याळाकडे पहात म्हणत, 'आज जेवायला फारच उशीर झाला. चला, आता जेवून घेऊ.'

आम्ही हसलो की म्हणत, 'तुम्ही मला उपाशी ठेवताय बरं का!'

त्यांचं जेवण प्रमाणानं कमी पण आवडीनिवडीचं पुष्कळच. शिवाय पदार्थांचं वळण खास देशस्थी, ब्राह्मणीच हवं. जेवणाच्या बाबतीत आपण देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असल्याचा त्यांना चक्क अभिमान आहे. अजूनही आहे. रायती, पंचामृत, चिंचगुळाची आमटी, साधं वरण-भात, आळवाची भाजी म्हणजे अगदी अमृताचं जेवण म्हणायचं. शिवाय वाटली डाळ, थालीपीठ, गूळ-पापडीचे लाडू, लाल तिखट घालून केलेली साबुदाण्याची खिचडी हे असे काही पदार्थ म्हणजे जीव की प्राण.

पूर्वी - म्हणजे मी शाळेत असताना - अण्णांबरोबर पुष्कळ खादाडी केलेली आहे. भल्या सकाळी ते कधी मंडईमध्ये नारळाचं पाणी प्यायला न्यायचे किंवा सायसाखर, कलाकंद असं खायला घेऊन जायचे. शाळा सुटल्यावर अप्पा बळवंत चौकात लस्सी प्यायची. सुटीच्या दिवशी कँपात हिंडायचं. स्टेशनजवळची पाणीपुरी आणि कुल्फी खायची. लांब बंड गार्डनला गेलो की त्यावेळी एक प्रौढ बाई आपल्या मुलांबरोबर भज्यांची गाडी तिथे लावायची. तिच्याकडची डाळीची भजी आणि अळूवडी अण्णांना अजूनही आठवते.

जिमखान्यावरचं अप्पांचं कँटिन नेहमीचंच. शिवाय लॉ कॉलेजच्या रस्त्याला तेव्हा करंदीकरांचं हॉटेल होतं. तिथे टोस्ट खायचा. टिळक रोडला बादशाहीमधला बटाटा टोस्ट, शनिवारवाड्यावरची अण्णांची भेळ आणि पत्र्या मारुतीजवळची बेडेकरांची मिसळ या गोष्टींसाठीदेखील अण्णांच्याच घरी जन्माला यायला हवं असं मला निश्चितपणे वाटतं. मिसळवाल्या बेडेकरांना अण्णांचं कौतुक एवढं की त्यांना एम.ए. शिवाय पीएच.डी. मिळाली तेव्हा बेडेकरांनी आपल्या म्हाताऱ्या आईच्या हातून किलोभर पेढे देऊन अण्णांचा दुकानातच सत्कार केला होता.

खाण्यासाठी अण्णा जसे चोखंदळपणे पुणं धुंडायचे तसे पुस्तकांसाठीही. जुन्या पुस्तकांचे सगळे विक्रेते त्यांना माहीत. त्यांच्या धंद्याची रीत, त्यांची वृत्ती, त्यांची सचोटी सगळ्या गोष्टींचे बारकावे ठाऊक. त्यामुळे जुन्या पुस्तकांच्या खरेदी-विक्री व्यवहारातले ते एक श्रेष्ठ तज्ज्ञ आहेत असं मी म्हणेन. काही विक्रेत्यांकडे 'अपूर्व' चीज असल्याखेरीज ते फिरकणारही नाहीत आणि काही विक्रेत्यांच्या घरी जाऊन त्यांच्याकडचा बरा-वाईट घासही जमिनीवर बैठक मारून खातील.

या जमिनीवरच्या बैठकीवरून आठवली आईची एक नेहमीची तक्रार. अण्णा कपडे फार मळवतात असं ती सारखं म्हणते. पूर्वी लहान असताना आम्हाला तिच्या त्या तक्रारीचं फार हसू येई. गंमत वाटे. पण बाहेरून आलेल्या अण्णांचे कपडे खरोखरच फार मळलेले असत. पांढरा स्वच्छ लेंगा आणि फिका पिवळट नेहरू शर्ट त्यांनी कायम वापरला. सकाळी निर्मळ कपडे घालून जात. घरी येईतो ते धुळीनं माखलेले असत. त्यांच्याकडे साभिप्राय पहाणाऱ्या आईला हसतहसत म्हणत, 'अगं माझं कामच धुळीतलं आहे. काय करणार?'

एखाद्या दिवशी, विशेषत: सोमवारी त्यांच्याबरोबर बाहेर पडल्यावर हे धुळीतलं काम आमच्याही लक्षात यायचं. फूटपाथवर मांडलेली पुस्तकं अण्णा चक्क रस्त्यावर बसून पहायचे. एखाद्या कट्ट्यावर बसून गठ्ठे निवडायचे. बांधायचे. तिथेच बसून अमृततुल्यमधून मागवलेला चहा प्यायचे.

एकदा तर कुठल्याशा लग्नाला निघाले. वाटेत एक बाई दिसली. तिच्या डोक्यावर जुन्या कागदांचं भलं थोरलं गाठोडं. ती बिचारी कागद वेचणारी बाई. यांना कुतुहल वाटलं. तिला थांबवलं तर कुठल्यातरी घरातून नव्या मुलांनी रद्दीत काढलेली ती जुनी कागदपत्रं आणि पोथ्यांची पानं होती. अण्णांनी सरळ आहेराचं पाकीट तिच्या हातावर रिकामं केलं आणि ते तसलं कळकट गाठोडं घेऊन ते घरी आले. पाठोपाठ आपलं गाठोड्याचं फडकं न्यायला ती बाई हजर. आई-आत्यांनी त्यांच्यापुढे हातच जोडले. पण ते इतके एक्साइट झालेले. सारखे म्हणत होते, 'पहा. मला दिसली ती बाई म्हणून ठीक. नाहीतर एवढं सगळं साहित्य मातीमोल झालं असतं की नाही?'

अण्णांच्या 'एक्साइट' होण्याची निमित्तंही आता आम्हाला अनुभवानं माहीत झाली आहेत. एकीकडे, कारल्याची भाजी 'अमृतासारखी चवदार' होणं इतकंही त्याचं साधं कारण असेल किंवा 'मी एखादी चांगली कविता लिहिणं, एखादा चांगला लेख लिहिणं' इथपासून तो एखादं दुर्मिळ पुस्तक मिळणं किंवा संशोधनातला एखादा लहानसा दुवा जुळून येणं इथपर्यंतचं ते थोरही असेल.

भल्या सकाळीच ते पुस्तकांच्या पाळतीवर बाहेर पडतात. लवकर उठून, अंघोळ, पूजा करून बाहेर पडण्याची त्यांना इतकी घाई असते की विचारू नका. 'एवढी कसली वेळ गाठायची!' असं आई-आत्यानं म्हणायचं आणि मग चेष्टेनं अण्णांनी उत्तर द्यायचं, 'अहो, गव्हर्नरची भेट चुकेल !' हा संवाद



नेहमीचा. त्यामुळे अण्णांची सकाळची फेरीही नेहमी या संवादानं सुरू व्हायची हे ठरलेलं. बाहेर पडले की पुस्तकांच्या ठराविक अड्ड्यांवर ठराविक वेळी ते जाणारच. तीही माणसं त्यांच्यासाठी खास पुस्तकं राखून ठेवून त्यांची वाट बघत असणार.

अण्णा आणि पुस्तकं ही आता अविभाज्य जोडी आहे. तीस-चाळीस हजार पुस्तकांचा वैयक्तिक ग्रंथसंग्रह फार थोड्यांकडे असेल. अण्णांना बहुतेक पुस्तकं रंगरूपासकट ठाऊक आहेत. अचूक संदर्भ आठवणं हे त्यांच्या विलक्षण मेंदूचं काम.

संशोधक म्हणून राजवाडे-पोतदारांच्या तोलाचे ते आहेत, किंबहुना त्यांचं संशोधन विस्तारण्याचं आणि पुढे नेण्याचं डोंगराएवढं काम अण्णांनी केलं आहे, एकट्या माणसाची संस्था व्हावी एवढं ते नवल आहे, हे सगळं मला माहीत आहे. पण तरी ते पूर्णांशानं 'गृहस्थ' आहेत हेही आम्हा सगळ्यांनाच फार चांगलं माहीत आहे. एकदा कुणा ज्योतिष्यानं त्यांना म्हटलं होतं की 'वयाच्या सत्तावन्नाव्या वर्षी तुम्ही संन्यास घ्याल.' पण तशी वेळ येणार नाही हे आम्ही सगळ्यांनीच चांगलं ओळखल्यामुळे त्यांच्या सत्तावन्नाव्या वर्षीही आम्हाला कुणाला तशी भीती वाटली नाही आणि आज त्यांच्या सत्तराव्या वर्षी तर आम्ही पुरे नि:शंकच झालो आहोत. याचं एक कारण म्हणजे त्यांना सतत वाटत असलेली घरातल्या प्रत्येकाची काळजी अजून जराही कमी झालेली नाही आणि ती कमी नाही म्हणजे संन्यासाला जवळपास फिरकण्याचीही गरज नाही.

त्यांच्या त्या अतिकाळजीची घरात सगळेजण (त्यांचा आदर राखून) चेष्टा करतात, पण ते काही काळजी करायचं सोडत नाहीत. एकदा तर धाकट्या बहिणीला कॉलेजमधून परत यायला नेहमीपेक्षा थोडा उशीर झाला तर अण्णा चक्क फर्ग्युसन कॉलेजमध्ये! अगदी परवा परवा आमची प्राजक्ता, माझी भावजय, ऑफिसमधून उशीरा घरी आली तर त्यांनी तिच्या ऑफिसमध्ये फोन लावण्यासाठी घरच्यांना हैराण केलं. आम्ही भावंडं अजूनही घरी जायला उशीर झाला की म्हणतो, 'आता अण्णा कोपऱ्यावर येऊन वाट बघत उभे असतील हं!'

अतिमाया आणि अतिहट्टीपणा यांची एक गुंतागुंत त्यांच्या स्वभावात आहे आणि माझ्या आईने आणि माझ्या आत्याने ती व्यवस्थित समजून घेतली आहे. किंबहुना त्या दोघी नसत्या तर अण्णांचा व्यासंग आणि संशोधन केवळ अशक्य होतं. हे म्हटलं तर फार रूढ आणि बटबटीत विधान आहे, पण ते इतकं खरं आहे की ते केल्याशिवायही राहवत नाही.

शिवाय त्या दोघींनी अण्णांमध्ये असलेलं एक लहान मूलही चांगलं सांभाळलं आहे. त्रास वाटून न घेता सांभाळलं आहे. आम्हा मुलांच्या अनुभवाला येणारं त्यांचं मूलपण अर्थात फक्त एका गोष्टीसाठी आहे. गावाहून परत घरी येताना आम्हाला खाऊ न्यावा लागतो. अण्णांसाठी काहीतरी गोड खाऊ नेणं ही प्रथा जर पाळली नाही तर अण्णांना ते मुळीच चालत नाही. मग आपण गेलेलो असू ते गाव कुठलं दरिद्री का असेना. 'तिथे काही मिळत नाही चांगलं!' असं म्हटलेलं अण्णांना चालत नाही. 'अगं, मग पुण्यात आल्यावर घ्यायचंस काहीतरी!' असं ते शांतपणे म्हणतील.

शांतपणा, सोशीकपणा आणि स्वीकार हे गुण अण्णांना हवेसे वाटणारे आणि माझ्या आईनं पुरेपूर दाखवलेले. त्यांच्या संसाराची ती कळीची गोष्ट आहे असं मला वाटतं. अण्णांजवळ असलेली समजूत आणि क्षमा आईच्या शांत आणि सोशीक स्वीकाराच्या जोडीला आली आणि आत्याच्या निरासक्त अपरंपार कष्टांची त्यात भर पडली म्हणून आमचं घर, आम्हा मुलांचं आयुष्य आकाराला आलं.

परिस्थितीचा वाईटपणा, अतोनात दारिद्र्य आणि माणसांनी केलेली फसवणूक अपमान या सगळ्याचा फार कडू अनुभव अण्णा आणि आत्या या दोघाही बहीणभावंडांच्या वाट्याला आला खरा, पण कमालीच्या साधेपणाखेरीज त्याचा कसलाही विपरीत परिणाम अण्णांवर झाला नाही याचं आज मला थोडं आश्चर्यच वाटतं.

एक प्रकारची निरिच्छता, शहरी आयुष्याविषयीचा एक प्रकारचा परकेपणा अण्णांच्या स्वभावात आहे. अजूनही मावळातलं त्यांचं खेडंच त्यांच्या मनात वस्तीला आहे आणि तेच त्यांच्या सगळ्या प्रेरणांचं मूलस्थान आहे. खरं म्हणजे वयाच्या दहाव्या वर्षीच त्यांनी आपल्या गावाचा निरोप घेतलेला. आई-वडील तर तेव्हाच मरण पावलेले. पुण्याला ज्या आजीनं आणि मामानं आणलं, ते दोघेही पुण्यात

आल्यावर पाच-सात वर्षांतच मरण पावलेले. एका धाकट्या बहिणीशिवाय जगात दुसरं कोणीही नाही. काही नाती असून त्यांनी जबाबदारीच्या भीतीनं पाठ फिरवलेली.

अशा वेळी पुण्यात जगणं, प्रतिष्ठेनं, नीटनेटकं जगणं हेही दिव्य होतं आणि संशोधन हे तर महाकर्मच होतं. अण्णांनी दोन्ही करून दाखवलं. त्यामागे खूप काही होतं. जिद्द होती, कष्ट होते, त्याग होता. हे सगळं तर कोणाही यशस्वी माणसाजवळ असतंच. दारिद्र्यातून वर आलेली आणि मोठी झालेली पुष्कळ माणसं आपल्याला ठाऊक आहेत. अण्णा त्यातलेच एक आहेत. या गोष्टीचा ढोबळपणा फोडून आत गेलं की मला त्यांच्या गावाकडच्या जगण्याशी त्यांचं असलेलं विलक्षण नातंच लक्षात येतं.




खरोखर नवल करावं अशी ही गोष्ट आहे. एखाद्या माणसाला वयाच्या दहा-बारा वर्षांपर्यंतचं जगणं एवढं बळ देणारं कसं ठरतं, त्याचं व्यक्तिमत्त्व, त्याचे गुण-दोष त्याचं सगळं कार्यक्षेत्र या सगळ्याला त्या तेवढ्या लहानशा बाळपणानं आकार कसा मिळतो, याचं इतकं स्पष्ट उदाहरण दुसरं कुठलं नसेल.

अण्णांच्या संशोधनाचा मूलाधार म्हणजे त्यांचं गाव. ती त्यांच्या मनातली अगदी हळवी अशी जागा आहे. सुदैवानं जगण्याच्या धकाधकीत ती तशीच सुरक्षित राहिली आहे. आम्ही कोणीच तिच्या आसपास फिरकू शकत नाही कारण आम्ही ते काही अनुभवलेलंच नाही.

आम्ही अनुभवले आहेत ते गावाच्या मातीतलं आपलं बाळवय वेळ पडेल तेव्हा सहज उपसणारे अण्णा. दिवाळीला आमच्या किल्ल्याच्या पायथ्याशी खेड्यातलं आपलं घर उभारून दाखवणारे अण्णा. देवळाच्या भिंती रंगवणारा त्यांच्यातला पारंपरिक चित्रकार आमच्या भोंडल्याचे देखणे हत्ती काढून द्यायचा. मामांबरोबर पूजा सांगायला, पोथी वाचायला जाणारा त्यांच्यातला ब्राह्मणाचा मुलगा आम्हाला स्तोत्रं म्हणून दाखवायचा, वडिलांकडून वारशानं आलेलं सुतारकाम शिकलेला त्यांच्यातला कारागीर आम्हाला लहानसहान खेळणी घडवून द्यायचा, अष्टमीचं गोकूळ पाटावर मातीनं उभारून द्यायचा आणि सगळ्या पारंपरिक लोकसंस्कृतीच्या उपासकांचा समरसून अनुभव घेतलेला त्यांच्यातला लहानसा मुलगा आम्हाला मुद्दाम कधी वासुदेवाची, कधी भुत्याची तर कधी पांगुळाची गाणी ऐकवायचा. खरं तर आमचं तरुण वयापर्यंतचं बरचसं जग अण्णांमधल्या गावाकडच्या मुलानं घडवलेलं जग होतं, हे मला आज स्वच्छपणे जाणवतं.

वडील म्हणून अण्णा एकीकडे चांगले पारंपरिकच आहेत आणि दुसरीकडे मजेदारपणे आधुनिक. म्हणजे नवे, नव्या तऱ्हेचे कपडे मुलींनीच काय, मुलानं घातलेलेही त्यांना आवडत नाही. मुलींनी कुंकू लावावं, बांगड्या घालाव्या, मोठ्या माणसांना चांगला वाकून नमस्कार करावा हे त्यांना हवंच असतं.

पण म्हणून त्यांना जुनाट सनातन्यांच्या यादीत टाकावं तर वयाच्या पाचव्या वर्षापासून स्पर्धांच्या निमित्तानं मला बाहेर पाठवणारे अण्णाही तेच. मुलांबरोबर मिसळणं, मित्रांनी घरी येणं, निमित्तानं मुलांबरोबर प्रवासाला जाणं या गोष्टींना कधी ना नाही. किंबहुना मुलगा-मुलगी असा भेद त्यांनी कधी केला नाही म्हणून त्याबाबतीत आम्हालाही कधी तो जाणवला नाही.

श्रद्धा आणि संशोधन यांच्याबाबतही अशीच मजेदार गुंतागुंत. आमच्याकडे देवांचं फारसं प्रस्थ नाही. देशस्थी नवरात्रं नाहीत की वर्षभरातली पारंपरिक धार्मिक व्रतंही नाहीत. पण देवाची पूजा अगदी साधी हळदकुंकू, फुलं वाहून अण्णा रोज अगदी मनापासून करतात. ते खरोखरच सश्रद्ध आहेत. पण कर्मकांड म्हणाल तर अजिबात काही नाही.

आणि संशोधकाचा कडवेपणा पुरेपूर असल्यामुळे तिथे वेळ येईल तेव्हा श्रद्धा, भावना दूर ठेवून काटेकोरपणे सत्याचा पाठपुरावा करतील. 'श्रीविठ्ठल : एक महासमन्वय' या त्यांच्या संशोधनपर ग्रंथाच्या वेळेची आठवण सांगते. विठ्ठलमूर्तीविषयीचा वाद त्यावेळी खूपच गाजला होता. पंढरपूरची विठ्ठलमूर्ती

तिच्या स्थानावरून अनेकदा हलवली गेली आणि ती बदललीही गेली असं अण्णांचं संशोधन. माढे गावात जी विठ्ठलाची मूर्ती आज आहे तशीच मूळची मूर्ती असणार असं त्यांनी म्हटलं-लिहिलं आणि नुसता गदारोळ उठला. वस्तुत: त्यांच्या संशोधनातला तो एक अगदी लहानसा भाग. पण भाविकांना आपला जणू देवच हरवला असं वाटलं. स्वत:ला ज्ञानवंत म्हणवणारे काही दुराग्रही भाविकांच्या विरोधाचं नेतृत्व करू लागले. संशोधनाच्या क्षेत्रातली काही संधीसाधू मंडळी, काही दुय्यम दर्जाचे संशोधक हेही वेगवेगळ्या संशोधनबाह्य कारणांनी पुढे आले आणि एक मोठी विरोधी आघाडीच उघडली गेली. मात्र अत्यंत शांतपणे अण्णांनी त्यावेळच्या वादळाला ठाम सामोरं जात उत्तर दिलं.

पंढरपूरच्या विठ्ठलमूर्तीसमोर उभं राहिल्यावर डोळ्यांत भावावेगानं अश्रू उभे राहतात हे एकीकडे सांगणारे अण्णा आणि या गोष्टीचा मूर्तीच्या इतिहासाशी काही संबंध नाही हे सांगणारे अण्णा एकच होते आणि ते एक होते म्हणूनच तो सगळा धुरळा खाली बसेतो ते निर्धारानं एकटे उभे राहिले. आणि नंतरचे त्या ग्रंथाला मिळालेले 'साहित्य अकादमी'सकट सगळे गौरव त्यांनी शांतपणेच स्वीकारले.

परस्परद्वेषानं भरलेलं, स्पर्धेचं, ईर्षेचं, अहंकाराचं असं आजचं वाङ्मयीन आणि सांस्कृतिक वातावरण आपण अनुभवतो; तेव्हा अण्णांमधल्या संशोधकानं दाखवलेली निष्ठा आणि ज्ञानाच्या जगामध्ये सांभाळलेली मूल्यं, पाळलेली पथ्यं आणि स्वीकारलेली नम्रता किती महत्त्वाची आहे हे माझ्यासारख्या त्यांना जवळून पाहणारीला जास्तच जाणवतं.

लेखक म्हणून मी त्यांच्या 'पुस्तकांच्या घरात' जन्माला आले हे माझं भाग्य, पण मुलगी म्हणून मी त्यांच्यासारख्या वडिलांची लेक झाले हे माझं त्याहून मोठं भाग्य. त्यांच्या कडेवर बसून मी पुष्कळ मोठी होईपर्यंत फिरले. पहाटे शुक्राची चांदणी किती सुंदर दिसते हे त्यांनी मला जागं करून दाखवलं आहे. रस्त्यांची सुंदर वळणं, झाडांचे सुंदर बहर आणि घराचे सुंदर आकार त्यांनी मला दाखवले आहेत. माझ्या मनासारखं मला जगू देणारा अवकाश त्यांनी आमच्या लहानशा घरात निर्माण केला आणि माझ्या विचार-भावनांना व्यक्तवण्याचा एक सुंदर रस्ता त्यांनी मला दाखवला.

आता पुष्कळ वेळा मी आमच्या जुन्या घरातली रात्रीची सुरुवात आठवते. मी अंथरुणावर पडलेली, जागीच आहे आणि अण्णा दिव्याच्या मंद पिवळ्या उजेडात, मला बोरकरांची कविता वाचून दाखवताहेत, 'कोर बिलोरी तुझ्या कपाळी शिर मोत्यांची जाळी गं ! तुझ्या लोचनी मुक्तात्म्यांची शाश्वत नित्य दिवाळी गं ।।'

*चौफेर व्यासंग, दीर्घकालीन चिंतन आणि अनेकनेत्री शोधबुद्धी यामुळे अकल्पनीय सत्याची चाहूल ते घेऊ शकतात. पारंपरिक व दीर्घकालीन धारणांना धक्का देणाऱ्या सत्याला ते निर्भयतेने सामोरे जातात. गेल्या काही वर्षांत प्रस्थापित मतांना सर्वाधिक हादरे त्यांनी दिले आहे. यात विध्वंसक वृत्ती नाही, तर निखळ सत्यनिष्ठा आहे. समाजपरिवर्तन आणि प्रगती यांचा विचार परंपरा उखडून होईल असे त्यांना वाटत नाही. सामाजिक परिवर्तनाची दिशा परंपरेच्या जाणीवपूर्वक अभ्यासातून शोधणे त्यांना श्रेयस्कर वाटते. त्यामुळे विध्वंसकतेपेक्षा विधायकतेचा रमणीय विलास त्यांच्या संशोधनात प्रकटतो. भावक्षोभक विषयाचीही हळुवार व संयत चिकित्सा ते करतात. त्यांची चिकित्सा सहृदय आहे आणि श्रद्धा डोळस आहे. सश्रद्ध तत्त्वचिंतक व चिकित्सक संशोधक या भूमिकांचा संघर्ष न होता प्रसन्न समन्वय त्यांच्या लेखनातून होताना दिसतो.*

*— डॉ र. बा. मंचरकर*

आता वाटतं, तो पिवळा उजेड नसता, ती बोरकरांची कविता नसती आणि अण्णा नसते तर मग मी आता जशी आहे तशी कधी नसतेच. खरंच नसते.

**- अरुणा ढेरे**

# विज्ञान पत्रकार


# रा. वि. सोवनी



प्रा. रा. वि. सोवनी यांना 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने विज्ञानप्रसाराचं बक्षीस दिलं ही चांगली गोष्ट झाली. विज्ञान पाठ्यपुस्तकाच्या बाहेर काढून माणसाच्या जीवनात गुंफणं या गोष्टीला असलेलं महत्त्व या निमित्तानं लोकांच्या मनावर ठसेल. त्या प्रक्रियेला अधिक चालना मिळेल. वेग येईल.

रा. वि. सोवनी मराठी माणसाला परिचित आहेत ते त्यांच्या लिखाणामुळे. जीवशास्त्र या विषयाचे ते प्राध्यापक होते. रुपारेल कॉलेजमध्ये ते शिकवत असत. ते शिक्षकांचेही शिक्षक होते. भाभा संस्थेमध्ये त्यांनी काही काळ शिक्षकांना जीवशास्त्र कसे शिकवायचं ते शिकवलं. परंतु शिकवणं एवढीच एक गोष्ट करत सोवनी बसले नाहीत. वर्गाबाहेर पडून, वर्गामध्ये न जाणाऱ्या लोकांनाही त्यांनी जीवशास्त्र सांगितलं.

१९५४-५५ च्या सुमाराला त्यांनी दैनिक 'चित्रा'त विज्ञान या विषयावर लिहायला सुरुवात केली. तेव्हापासून आजपर्यंत ते सातत्यानं विज्ञान हा पाया धरून त्यावर लेख, सदरं लिहीत आहेत. आज घडीला असं एकही महत्त्वाचं दैनिक किंवा साप्ताहिक मराठीत नाही ज्यात सोवनी यांनी लिहिलं नाही. 'चित्रा'नंतर त्यांनी आचार्य अत्रे यांच्या 'मराठा' आणि 'नवयुग'मध्ये सदरं लिहिली. अत्रे यांनी बोलावून घ्यावं आणि सदर लिहायला सांगावं या घटनेला पत्रकारितेत महत्त्व आहे. अत्रे यांना भाषेची जाण तर होतीच पण त्यांना लोकमानस चांगलं



महाराष्ट्र फाउण्डेशन विशेष पुरस्कार

**डॉ. रा. वि. सोवनी**

मराठी समाजात वैज्ञानिक दृष्टिकोणाचा प्रसार करणारे विज्ञानलेखक

समजत होतं. लोकांची नाडी त्यांना कळत होती. त्यांनी सोवनींना विज्ञानपर सदर लिहायला सांगितलं. त्यासाठी हवी तशी सामुग्री गोळा करायची परवानगी दिली आणि मोकळेपणानं लिहा असं सांगितलं. नुसतं सांगितलं असं नव्हे तर सोवनी यांचं सदर कित्येक वर्ष चाललं. अत्रे यांनी ते चालू दिलं यातच सोवनी यांच्या लेखणीचं यश आहे.

सोवनी वर्गात शिकवतांनाही पाठ्यपुस्तकाची चौकट म्हणजे लोढणं आहे असे मानत नव्हते. जीवशास्त्र हा विषय त्यांच्या काळात (म्हणजे १९५० ते १९७०) त्यांनी मुलांना मोकळा करून शिकवला, मुलांचं लैंगिक विषयाबद्दलचं आकर्षण व त्या विषयीची वाच्यता टाळण्याची समाजाची वृत्ती या गोष्टी लक्षात घेऊन त्यांनी जीवशास्त्र हा विषय विद्यार्थ्यांना मोकळा करून आवडेल अशा रूपात शिकविला. आणि हीच खरी गंमत आहे. पुस्तक हे ज्ञानाचे गोदाम असते. अनेक माणसं या गोदामात ज्ञानाचे गठ्ठे नुसते भरून ठेवतात. गोदामात गठ्ठे साचतात, त्यावर धुळ साचते. माणसं गोदामात आनंदाने जायला तयार नसतात. फार थोडी माणसं पुस्तकं गोदामासारखी न वापरता गोष्टीसारखी वापरतात, ज्ञान आनंददायी करतात. बहुसंख्य ज्ञान हे गोदामासारखंच राहतं. अशा वेळी सोवनी ते ज्ञान आकर्षक करतात, रंगतदार करतात, ते जीवनाशी जोडतात. शिक्षकाचं तेच खरं कौशल्य व काम असतं. शिक्षकाला केवळ माहिती असून चालत नाही, तर ती माहिती किंवा ज्ञान त्याला आनंददायक, आकर्षक, पचवण्यागत करायचं असतं. शिक्षकाकडे संवादाचं अंग ही असावं लागतं. सोवनींकडे ते आहे. सोवनी वर्गातही विषय सोपा करत आणि वर्गाबाहेरही नियतकालिक नावाच्या एक भिंती नसलेल्या शाळेत विज्ञान हा विषय शिकवत, आज वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षीही शिकवतात.

संवाद म्हणजे आपल्याला समजलेल्या गोष्टी समोरच्या माणसाला समजेल अशा रीतीने सांगायच्या. समजून घेणं आणि समजून देणं या दोन्ही वेगळ्या गोष्टी आहेत. दोन्ही जमल्या तरच संवाद जमतो. एखाद्याची समजूत उत्तम असेल पण त्याला नीट बोलता आलं नाही तर संवाद होत नाही. एखादा बोलघेवडा माणूस असतो, तो भरपूर बोलतो पण त्याची समजूत चांगली नसेल तर त्याच्या बडबडीतून हाती काहीही लागत नाही. सोवनी लिहितात तेव्हा त्यांना विषय समजलेला असतो आणि त्यांना लिहिताही येतं.




एक संपादक म्हणून माझ्या गाठीशी काही अनुभव आहे. विज्ञान परिषदेच्या पत्रिकेसाठी मजकूर हवा म्हणून मी सडकेवर फिरू लागतो तेव्हा मला विज्ञानाच्या नाना अंगांचा भरपूर अभ्यास असणारी भरपूर माणसं दिसतात. परंतु त्यांना लिहून द्या म्हणून सांगायची सोय नसते. विषय समजलेला असतो पण तो सोपा करून लिहिता येत नाही. माणसं क्लिष्ट लिहितात फार पारिभाषिक शब्द वापरतात. न समजणाऱ्या शब्दांचा अनावश्यक वापर करतात. भरमसाठ लिहितात. लोकांना मोजकं वाचायचं असतं. अलीकडल्या काळात लोकांना एकूणच वेळ कमी असतो. हजार ते दोन हजार शब्दांपेक्षा मजकूर लांबला की लोक वाचायचा कंटाळा करतात. त्यामुळे मुद्देसूद आणि कमीतकमी शब्दांत लिहिलेला मजकूर संपादकाला हवा असतो. शिवाय वेळेवरही पाहिजे. बारशाच्या निमित्ताने मागितलेला मजकूर तेराव्याला मिळून काय उपयोग?




सोवनी मोजकं लिहू शकतात, कमी शब्दांत लिहू शकतात, सांगितल्या वेळी लिहू शकतात. त्यांच्या मजकुरावर फारसा संस्कार करावा लागत नाही. 'मराठी विज्ञान पत्रिके'शी ते माझ्याही आधीपासून संबंधित आहेत. एकेकाळी पत्रिकेतला मजकूर फारच कंटाळवाणा व शाळकरी असे. सोवनी त्याही काळात पत्रिकेत लिहीत. नंतर पत्रिकेने काळाचं भान ठेवलं आणि आपलं रूप बदललं. चटकदार, छोट्या मजकुराचं वळण पत्रिकेत सुरू झालं. सोवनी यांनी स्वत:ची शैली बदलली, 'अवतीभोवती' नावाचं सदर ते लिहू लागले. जगातल्या नाना विषयांवर, विज्ञानाच्या नाना अंगांवर सोवनी त्या सदरातून लिहू लागले, नव्या पद्धतीनं. आज गेली काही वर्षं ते सदर पत्रिकेतलं सर्वात प्रिय सदर आहे. विद्यार्थ्यांपासून वैज्ञानिकांपर्यंत सर्व वाचक ते सदर वाचतात.

संवादामध्ये जुळवून घेणं नावाची गोष्ट असते.


बालगंधर्व प्रेक्षकांना मायबाप असं म्हणायचे. प्रेक्षकांना काय हवंय ते पाहून त्यानुसार त्यांची व एकूणच कोणत्याही कलाकाराची कला आकार घेत असते. सोवनींनी अत्रे यांच्यासाठी लिहिलं, माझ्यासाठी लिहिलं आणि 'महानगर' या अगदी ताज्या सायं दैनिकांसाठीही ते लिहितात. ते केवळ लिहितातच असं नाही. ते भाषण करतात. ते आकाशवाणीवर जातात. ते टिव्हीवर जातात. संवादाच्या त्याही शैली त्यांच्या परिचयाच्या आहेत. त्यांनी त्या वापरल्या आहेत. अलीकडे भाषण हा प्रकार मर्यादित झाला आहे. जी काही भाषणे होतात ती बहुतेक वेळा अगदीच औपचारिक असतात. म्हणजे विद्यार्थ्यांसमोर किंवा परिसंवादात भाषणं होतात. वीस-पंचवीस वर्षांपूर्वी गणेशोत्सव, शारदोत्सव इत्यादी ठिकाणी व्याख्यानमाला होत असत. आणि लोक मुद्दाम वेळ काढून अशा भाषणांना जात असत. त्या काळात टीव्ही व वर्तमानपत्र ही करमणुकीची साधनं हाताशी नसल्यानं आणि सिनेमाही परवडत नसल्यानं लोक भाषणाकडे वळत असावेत. त्या काळातले प्रेक्षकही मजेशीर असत. टवाळक्या करत, उलटसुलट प्रश्न विचारतं आपली नाराजी दर्शवत. अशा प्रेक्षकांना सांभाळून घेत भाषण करणं ही एक स्वतंत्र शैली होती. सोवनी यांनी ती शैली अवगत केली होती. सुदैवाने विज्ञान हा विषय निरुपद्रवी असल्याने प्रेक्षकांच्या रागाचे प्रसंग येत नसत.

सोवनी यांनी विज्ञान लोकांसमोर ठेवलं. दैनंदिन जीवनामध्ये घडणाऱ्या गोष्टी लोकांसमोर ठेवल्या व त्या बाजूने विज्ञान लोकांना सांगितलं. दैनिकं, साप्ताहिकं यामधून चाळीस वर्षांपेक्षा अधिक काळ अखंड लिखाण देत राहणं ही साधी गोष्ट नाही. ज्यांना पत्रकारितेचा धबडगा माहीत आहे त्यांना या कामाचं महत्त्व लक्षात येईल. दररोज घडणाऱ्या घटनांचा माग ठेवणं, त्यातलं मर्म हेरणं आणि त्यावरून मजकूर उभा करणं हे फार कष्टाचं काम असतं. सकाळी उठून वर्तमानपत्रं पाहायची, बातम्या ऐकायच्या नंतर दुपारी पुस्तकालयात जाऊन संदर्भ गोळा करायचे, लगोलग त्यावर लिखाण करून ते संपादकाकडे पोचवायचं हा उद्योग जीवघेणा असतो. अलीकडच्या काळात कॉम्प्युटर आल्याने मजकूर लिहिणं आणि इ-मेल-फॅक्स या साधनांचा वापर करून तो पाठवणं या गोष्टी सोप्या झाल्या आहेत. नव्या साधनांमुळे श्रम वाचतात व लेखकाला वाचनावर अधिक वेळ खर्च करता येतो. सोवनी लिहित होते त्या काळात ही साधनें नव्हती त्यामुळे हाताने लिहिणं, कार्बन घालून त्याच्या प्रती करणं, वाहाणा झिजवीत संपादकांकडे जाणं या गोष्टी त्यांना कराव्या लागत होत्या. आजही पंचाहत्तरी आली तरी सोवनी मजकूर तयार करणं आणि पाठवणं याची धडपड त्याच पद्धतीने करताना दिसतात.

सोवनी हे पगार घेण्याच्या हिशोबात पत्रकार नाहीत. पगाराच्या हिशोबात ते प्राध्यापक. पत्रकार नसल्याने पत्रकाराला ज्या गोष्टी सहज मिळायला पाहिजेत त्या त्यांना मिळत नाहीत. एखादा हौशी होतकरू पत्रकार जसं मरमर करून लिहित राहतो त्याच पद्धतीने त्यांना लिहित राहावं लागतं. खरं म्हणजे त्यांनी तयार केलेला मजकूर हा विज्ञानाच्या बाबतीत बोलायचं झालं तर कोणाही व्यावसायिक पत्रकाराच्या तोडीसतोड किंवा कदाचित अधिक बरा असतो. पण त्याचा दाम त्यांना पुरेसा मिळत नाही. कारण चौकटीत विचार करण्याच्या सवयी लागलेल्या संस्थांना मजकुराचं स्वतंत्र मोल करता येत नाही. व्याख्यानांच्या बाबतीतही तसंच आहे. एक व्याख्यान म्हणजे एखादा लेखच असतो. लेखासाठी करावी लागते ती सारी तयारी व्याख्यानासाठी करावी लागते. लिहिताना होतात त्यापेक्षा जास्त श्रम व्याख्यान देताना होतात. लेखापेक्षा जास्त कॅलऱ्या व्याख्यानात खर्च होतात. व्याख्यान म्हणजे माईकवरून सांगितलेला एक लेखच असतो. पण लोकांच्या लेखी व्याख्यान ही एक मोफत करमणूक असते. लेख लिहिला तर तो व्यवसाय, व्याख्यान दिले तर ती सेवा असते. अलीकडच्या काळातही अगदी मोजक्या ठिकाणी व्याख्यानाचे पैसे दिले जातात. सोवनी अगदी या दिवसापर्यंत व्याख्यानं देत फिरतात, आतबट्ट्याची.

सोवनी लिहितात. 'सोवनी मराठी विज्ञान परिषदे'चे उपाध्यक्ष आहेत, एक कार्यकर्ते आहेत. 'मराठी विज्ञान परिषदे'चे कार्यक्रम ठरविण्यात, ते कार्यक्रम अमलात आणण्यात ते सक्रिय असतात. लिहिण्यासाठी लागणाऱ्या खटपटी करणं, विज्ञान परिषदेच्या कामासाठी परिषदेच्या कार्यालयात किंवा इतर ठिकाणी जाणं, रुपारेल कॉलेजच्या पुस्तकालयात बसणं हा त्यांचा दररोजचा कार्यक्रम असतो. वयाची पंचाहत्तरी गाठली तरी या क्रमात बदल घडलेला नाही. वेग थोडासा कमी झाला असेल तेवढाच.

**-निळू दामले**



# निष्ठावान विज्ञान प्रसारक

जून १९६८ मध्ये मी रुपारेल कॉलेजला विज्ञान शाखेमध्ये प्रवेश घेतला. कॉलेजच्या नव्या नवलाईच्या दिवसातच लेक्चर्स सुरू झाली. प्राणीशास्त्र या विषयाचे पहिलेच लेक्चर होते. प्रा. सोवनी वर्गात प्रवेश करते झाले. वर्गात जवळ जवळ ९५ टक्के उपस्थिती होती. विषयाला सुरुवात झाली आणि पुढील ४५ मिनिटे सगळा वर्ग लेक्चरमध्ये रंगून गेला. माझे बाबा विद्यार्थीप्रिय प्राध्यापक आहेत, त्यांचे शिकवणे सहज सुलभ असते, हे मी ऐकून होते. त्याचा प्रत्यय त्या दिवशी आला. त्यांच्या या विद्यार्थीप्रियतेचा आणि लोकप्रियतेचा प्रत्यय मला अगदी आजतागायत येतोच आहे.

विज्ञान या विषयाला त्यांनी स्वत:ला वाहून घेतले आहे. ते कॉलेजमध्ये प्राणीशास्त्र शिकवीत होते, तरी विज्ञानाच्या इतर शाखांमधूनही (अंतराळ विज्ञान, जीवशास्त्र, वनस्पतीशास्त्र याविषयी) त्यांनी लिखाण केले आहे. ४० वर्षांपूर्वी विज्ञानावर पाठ्यपुस्तक सोडून लिहिणारे हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच होते. त्यात प्रा. सोवनी आघाडीवर होते. विज्ञानात काहीही महत्त्वाची घटना घडली, की त्यावर प्रा. सोवनींचा लेख लगेचच प्रसिद्ध होत असे. 'किर्लोस्कर' मासिकात दर दिवाळी अंकात त्यांचा लेख असे. 'स्त्री' मासिकातही दर महिन्याला एका कुशल डॉक्टरची भेट त्यांनी वर्षभर वाचकांना घडवली. त्यामध्ये एखाद्या कठीण, गुंतागुंतीच्या ऑपरेशनची उकलही सर्वसामान्य वाचकाला समजेल अशा सोप्या शब्दात केलेली असे. 'मानवाची चंद्रावर स्वारी',

'भारताचा अणुस्फोट' इत्यादी विषयांवरील त्यांचे लेख बरेच गाजले. कै. आचार्य अत्रे यांनी त्यावेळी त्यांच्या 'मराठा' या लोकप्रिय दैनिकात विज्ञानात घडणाऱ्या विविध घडामोडींवर त्यांना लिहायला सांगितले आणि त्यांचे लिखाण तेव्हापासून सातत्याने सुरू झाले. दूरदर्शनवर दर महिन्याच्या पहिल्या रविवारी वर्षभर 'आकाशाशी जडले नाते' हा विज्ञानावरचा कार्यक्रम डॉ. जयंत नारळीकरांची मुलाखत घेऊन त्यांनी सादर केला. त्या कार्यक्रमाला बरीच प्रशंसा लाभली.

विज्ञानाचा प्रसार हे त्यांनी आयुष्याचे ध्येय ठेवले. त्यासाठी व्याख्याने देणे, सभा आयोजित करणे, सेमिनार भरवणे, लिखाण करणे यांसारखी त्यांची कामे नेहमीच चालू असत. एखादे व्रत घेतल्याप्रमाणे! मधली काही वर्षे त्यांनी पाठ्यपुस्तक महामंडळाचे क्वॉलिटी कंट्रोलर म्हणून काम केले असले तरी अध्यापन हेच त्यांचे खरे कार्यक्षेत्र आहे. जवळ जवळ २५ वर्षे रुपारेल कॉलेजमध्ये व नंतर टाटा विज्ञान संस्थेच्या 'होमी भाभा विज्ञान संस्थे'त त्यांनी काम केले. त्यांनी आजवर हे जे कार्य केले, त्यासाठी त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले. १९९७ साली त्यांना इचलकरंजीच्या 'फाय' फाउण्डेशनचा बहुमूल्य असा पुरस्कार मिळाला. ते जेव्हा गावोगावी शाळा-कॉलेजात अथवा एखाद्या संस्थेसाठी व्याख्यानाला जातात, तेव्हा त्यांच्याभोवती जमा होऊन ''सर, आम्ही तुमचे लेख आवर्जून वाचतो. त्यातली माहिती सोप्या भाषेमुळे आम्हाला सहज समजते आणि म्हणून तुमचे लेख आम्हाला फार आवडतात.'' असे सांगणारी माणसे भेटतात, तेव्हा लेख लिहिण्याचे खरे समाधान त्यांना मिळते.

अनेक वर्षे अध्यापन केल्यामुळे त्यांचा विद्यार्थीवर्ग सगळीकडे मोठ्या प्रमाणावर पसरला आहे. कुठल्याही कार्यक्रमात, समारंभात त्यांच्या ओळखीची अनेक माणसे भेटतात आणि सांगतात, ''सर, मी अमुक बॅचचा विद्यार्थी.'' अर्थात सगळी नावं त्यांच्या लक्षात नसतात, पण सर समोर दिसल्यावर त्यांचा विद्यार्थी आपणहून त्यांना भेटावयास येतो, तेव्हा त्यांच्याविषयीचा माझा आदर आणि अभिमान अधिकच दुणावतो. माझ्या नोकरीमध्येही मला त्यांचे



अनेक विद्यार्थी भेटतात आणि मी सोवनीसरांची मुलगी आहे असं कळलं की त्यांच्या वागण्यातील फरक लगेचच जाणवतो.

आज त्यांनी पंचाहत्तरी ओलांडली आहे. वयाच्या मानाने त्यांची तब्येत अजूनही चांगली असल्याने ते आजही पूर्वीच्याच उत्साहात विज्ञानप्रसारात कार्यरत आहेत. आजही त्यांचं लिखाण आणि 'मराठी विज्ञान परिषदे'चं काम चालू आहे. बाबा सर्व घरगुती समारंभांना उपस्थित असतात, पण ते जितके विज्ञानविषयक कार्यक्रमात रमतात तेवढे घरगुती कार्यक्रमात रमत नाहीत, असे माझे प्रांजळ मत आहे. त्यांच्या आवडीचा 'विज्ञान' हा विषय सोडला, तर इतर विषयांवर त्यांनी आपली मते आग्रहीपणे मांडली आहेत, असे कधी झालेले नाही. मुळातच ते मृदूभाषी आणि 'आपण बरे की आपले काम बरे' अशीच त्यांची धारणा आहे. त्यामुळेच असेल कदाचित; अजून सरकारकडून त्यांच्या विज्ञानप्रसाराच्या कामाची दखल घेतली गेल्याचे दिसत नाही. मुळातच आमच्या बाबांना प्रसिद्धीची हौस नाही. सर्व सोवनी कुटुंबीयांनाच प्रसिद्धीचे वावडे आहे. माझे सर्वात मोठे काका श्री. नि. वि. सोवनी, जे पुण्याला गोखले इन्स्टिट्यूटचे संचालक होते व अनेक वर्षे युनोचे आर्थिक सल्लागार होते, तेही प्रसिद्धीपासून दूरच आहेत. त्यांचेही विद्यार्थी आज रिझर्व्ह बँकेत, केंद्रीय सरकारात अधिकारपदे भूषवीत आहेत. पण आपल्या विद्यार्थीवर्गाचा उपयोग या बंधूद्वयांनी स्वत:च्या फायद्यासाठी करून घेतल्याचे आठवत नाही.

बाबांच्या या विज्ञानप्रसाराच्या कामात आमच्या आईचाही वाटा मोठा आहे. तिने घरची आघाडी सांभाळून बाबांना मदत केली आहे. तीही तिच्या आवडीच्या कलाक्षेत्रात अधिक काही करू शकली असती. पण तिने त्यांच्या मोठेपणात आपले मोठेपण सामावून घेतले. त्यांच्या वैवाहिक जीवनालाही पन्नासाहून अधिक वर्षे झाली आहेत. बाबा व आई मुलगा-सून आणि नातींच्या सान्निध्यात परिपूर्ण जीवन जगत आहेत. अजूनही बाबांच्या मनामध्ये अनेक संकल्प आहेत. ते त्यांच्या हातून पूर्ण होवोत, एवढीच इच्छा!

**– मेधा सुळे**

*विज्ञानप्रसाराचे अध्यापनबाह्य सर्व उद्योग प्रा. रा. वि. सोवनींनी गेली ४४ वर्षे केले. त्याला १९६६ साली संस्थात्मक रूप आले ते 'मराठी विज्ञान परिषदे'च्या स्थापनेतून. परिषदेच्या स्थापनेच्या सभेपासून सोवनी गेली ३९ वर्षे परिषदेच्या पत्रिकेचे संपादक आहेत. परिषदेचे उपाध्यक्ष आहेत. दर शनिवारी परिषदेत येतात. तरुणांच्या पाठीवर थाप मारून त्यांना उत्साहभरित करतात. कामाच्या नवीन कल्पना सतत पुढे आणतात. महाराष्ट्र शासनाच्या 'राज्य मराठी विकास संस्थे'साठी परिषदेच्या वतीने सध्या ते विज्ञानग्रंथसूची तयार करीत आहेत.*

*१९५२ साली त्यांचा जो उत्साह होता तोच उत्साह प्रा. सोवनींच्यात आजही दिसतो.*

*'रा. वि.'च्या लेखनाच्या प्रारंभाला एक घटना कारणीभूत ठरली. १९५४-५५च्या काळात, त्यावेळी 'चित्रा' नावाचे दैनिक निघत असे. महाविद्यालयात विद्यार्जन करून रात्रौ दैनिक 'चित्रा'मध्ये मुद्रिततपासनीसाचे काम अर्थार्जनासाठी करणारा कुलकर्णी नावाचा 'कोणी-एक' विद्यार्थी 'रा. वि.'च्या संपर्कात आला. 'सर! काही तरी विज्ञानपर लिहून द्या ना आम्हाला' हा तगादा तो काही सोडेना! एवंच 'मासे' या विषयावरील (विज्ञानपर) लेख या पुणेकर शाकाहारी विज्ञानलेखकाने वाचकांसमोर सादर केला!*

# सृष्टिज्ञान


## त्र्याहत्तर वर्षांची वाटचाल




सुबोध मराठी भाषेतून विज्ञान आणि तदनुषंगी तंत्रज्ञान या विषयांची माहिती सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या 'सृष्टिज्ञान' या मासिकाला डिसेंबर २००० मध्ये त्र्याहत्तर वर्षे पूर्ण होत आहेत. १ जानेवारी १९२८ रोजी सृष्टिज्ञानचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. आता १ जानेवारी, २००१ रोजी प्रकाशित होणारा सृष्टिज्ञानचा अंक चौऱ्याहत्तराव्या वर्षातला पहिला अंक असेल. केवळ विज्ञान या एकाच विषयाला वाहिलेले आणि त्यामुळे अत्यंत मर्यादित ग्राहकवर्ग असणारे 'सृष्टिज्ञान' मासिक आजपर्यंत एकाही अंकाचा खंड न पडता सातत्याने त्र्याहत्तर वर्षे टिकून आहे, हा एक चमत्कारच आहे. त्यामागे 'सृष्टिज्ञान'च्या संस्थापकांची आणि त्यानंतरच्या काळात त्यांना मनापासून साथ देणाऱ्या व्यवस्थापकीय मंडळींची तसेच संपादक मंडळींची तळमळ आणि जिद्द आहे. गेली त्र्याहत्तर वर्षे विज्ञानाच्या सर्व अंगोपांगांचा परिचय सुबोध-सोप्या, सर्वांना सहज समजेल अशा मराठी भाषेतून करून देण्याचे अवघड कार्य सृष्टिज्ञान' करीत आले आहे आणि यापुढेही याच जोमाने करीत राहील. 'सृष्टिज्ञान'च्या या गेल्या त्र्याहत्तर वर्षांच्या वाटचालीवर एक धावता दृष्टिक्षेप टाकणे मोठे उद्बोधक आहे.



मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमसमोर असलेल्या रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (आता या संस्थेचे



नारायण निळकंठ मेडदकर



निरंजन घाटे

नामकरण 'इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स' असे झाले आहे.) या संस्थेच्या आवारात १९२७ साली 'सृष्टिज्ञान' मासिक सुरू करण्याची कल्पना निघाली. संस्थेतील प्रा. गो. रा. परांजपे यांच्या पुढाकाराने संस्थेतल्या काही उत्साही अध्यापकांनी 'फिलॉसॉफिकल असोसिएशन' नावाचे एक मंडळ स्थापन करून या मंडळातर्फे दर शनिवारी सायंकाळी सर्वसामान्य श्रोत्यांना समजेल अशा सोप्या भाषेत इंग्रजीतून तसेच मराठीतून विविध शास्त्रीय विषयांवर सप्रयोग व्याख्याने देण्याचा उपक्रम सुरू केला. ही व्याख्याने सर्वांना खुली होती आणि त्यांना उत्तम प्रतिसाद मिळत होता. अनेक श्रोत्यांनी मराठीतून होणाऱ्या व्याख्यानांची विशेष उपयुक्तता आवर्जून बोलून दाखविली. व्याख्यानातील विषय लेखरूपाने वाचावयास मिळाले तर ते अधिक उपयुक्त होतील, व्याख्यानांना उपस्थित राहू न शकणाऱ्या इतरांनाही त्यांचा लाभ घेता येईल, असाही अनेकांचा अभिप्राय पडला. या प्रतिसादातून हुरूप येऊन प्रा. गो. रा. परांजपे आणि त्यांचे सहकारी यांनी 'सोसायटी फॉर दि प्रमोशन ऑफ सायंटिफिक नॉलेज' या नावाने संस्था स्थापन केली. या संस्थेचे पहिले कार्य म्हणून 'सृष्टिज्ञान' या नावाने केवळ विज्ञान विषयांचा सुबोध मराठीतून प्रसार करणे, हे ध्येय असलेले मासिक सुरू करण्याची योजना आखण्यात आली.

१ जानेवारी १९२८ रोजी 'सृष्टिज्ञान'चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. क्राऊन साईजच्या ३२ पानांच्या या अंकाच्या मुखपृष्ठावर पौर्णिमेच्या चांदण्यात खळखळत वाहणाऱ्या अवखळ रुपेरी निर्झराचे रम्य निसर्गदृश्य आहे. आतमध्ये पहिल्याच पानावर 'सागरअश्व' या मत्स्याचे (सी हॉर्स) तीन रंगी चित्र आहे. या अंकात प्रा. गो. रा. परांजपे यांचे संपादकीय, डॉ. दि. धों. कर्वे यांचा 'कृत्रिमरंग', डॉ. भा. ग. वाड यांचा 'लुई पाश्चर' हे लेख आणि त्याशिवाय 'नेपच्यूनचा शोध', 'रासायनिक गप्पा-टप्पा' इत्यादी छोटे स्फुट लेख आहेत. आजच्या कोणत्याही मासिकात अथवा साप्ताहिक विज्ञानपुरवणीत हे लेख जसेच्या तसे छापले तरी ते रंजक आणि माहितीपूर्ण वाटतील, इतके ते सोप्या, सुबोध भाषेत लिहिलेले आहेत. या अंकात सुरुवातीला संपादक मंडळातील सदस्यांची नावे दिली आहेत. प्रा. गो. रा. परांजपे, डॉ. वि. ना. भाजेकर, प्रा. श्री. ल. आजरेकर, प्रा. प्र. रा. आवटी, डॉ. स. बा. हुदलीकर, डॉ. दि. धों. कर्वे आणि श्री. शं. ब. सहस्रबुद्धे अशी सात नावे आहेत. 'सृष्टिज्ञान'ची वार्षिक वर्गणी तीन रुपये आणि किरकोळ अंकाची किंमत चार आणे होती.

पहिल्या अंकातील 'संपादकीय'मध्ये 'सृष्टिज्ञान'च्या ध्येयधोरणांच्या रूपरेषेचे स्पष्ट विवेचन केले आहे.

त्यातील काही भाग असा : "हरघडीस होत असलेली पाश्चात्यांची शास्त्रीय ज्ञानातील प्रगती, आपले त्या विषयांचे गाढ अज्ञान आणि पराङ्मुखता पाहून केवळ दु:ख करीत बसण्याचे अगर कोठेतरी चुकत आहे म्हणून केवळ स्वस्थ राहण्याचे दिवस आता गेले असून ताबडतोब अल्प का होईना, पण कृतीस प्रारंभ करावा, अशा उत्कट प्रेरणेनेच आम्ही आज 'सृष्टिज्ञान'ची मुहूर्तमेढ रोवीत आहोत. आम्ही एवढे आश्वासन देतो की, लहान-थोर स्त्री-पुरुषांना शक्य तितक्या सुलभ व मनोरंजक पद्धतीने शास्त्रीय विषयांची ओळख करून द्यावयाची व अशा रीतीने त्यांच्या विचारशक्तीचा ओघ तिकडे वळवायचा हे 'सृष्टिज्ञान'चे ध्येय आहे."

'सृष्टिज्ञान'चा पहिला अंक श्री. शं. ब. सहस्रबुद्धे यांनी पुण्याच्या आपल्या बालोद्यान मुद्रणालयात छापून प्रसिद्ध केला. पहिले वर्षभर 'सृष्टिज्ञान'चे मुद्रण तिथेच झाले. पण प्रत्येक वेळी मुंबईत सर्व लेखांची जुळवाजुळव करून ते लेख पुण्याला पाठवायचे, त्यांची मुद्रिते मुंबईला मागवून घेऊन किंवा स्वत: पुण्यात जाऊन ती दुरुस्त करावयाची, हे सारे काम जिकिरीचे, खर्चाचे आणि वेळखाऊ होऊ लागल्यामुळे दुसऱ्या वर्षापासून 'सृष्टिज्ञान'च्या मुद्रणाचे काम मुंबईलाच कै. मोरमकी यांच्या 'लक्ष्मीनारायण मुद्रणालया'त होऊ लागले. त्यानंतर पुण्याच्या 'गणेश महादेव आणि कंपनीने मुद्रणाचे काम अधिक स्वस्तात करून देऊ, असे सांगितल्यामुळे पुन्हा हे मुद्रणाचे काम पुण्याला आले. १९३२ पर्यंत 'सृष्टिज्ञान'च्या मुद्रणाचे काम 'गणेश महादेव कंपनी'ने केले. या सर्व काळात 'सृष्टिज्ञान'ची आर्थिक परिस्थिती खूपच ओढग्रस्तीची होती. बऱ्याच वेळा संस्थापक मंडळींना पदरची रक्कम खर्च करून 'सृष्टिज्ञान'चे मुद्रण आणि वितरण करावे लागत होते. ही परिस्थिती पाहून प्रा. गो. रा. परांजपे यांचे ज्येष्ठ बंधू, शिक्षणतज्ज्ञ प्रा. महादेवराव परांजपे यांनी 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी'च्या (भारत सेवक समाज) 'आर्यभूषण मुद्रणालया'ने 'सृष्टिज्ञान'चे व्यवस्थापन स्वीकारावे, अशी खटपट चालवली. आर्यभूषणचे त्यावेळचे व्यवस्थापक श्री. वामनराव पटवर्धन यांनीही 'सृष्टिज्ञान'चे प्रकाशन हा सारा व्यवहार आतबट्ट्याचा आहे, असे असले तरी ही एक आवश्यक प्रकारची समाजसेवाच आहे, हे जाणून दरवर्षी तोटा सोसण्याची तयारी ठेवली आणि 'सृष्टिज्ञान'ला एक प्रकारे दत्तकच घेतले. जानेवारी १९३३ पासून ते डिसेंबर १९७४ पर्यंतच्या ४२ वर्षांच्या प्रदीर्घ काळात 'आर्यभूषण मुद्रणालया'ने 'सृष्टिज्ञान'चे मुद्रण, प्रकाशन, वितरण याबरोबरच मासिकाची संपूर्ण आर्थिक जबाबदारी स्वीकारली आणि ही जबाबदारी अतिशय चोखपणे पार पाडली. मोहोरदार कागदावरचे बहुरंगी मुखपृष्ठ आणि आत भरपूर चित्रे, आकृती असणारे प्रत्येकी ६४ ते ८० पानांचे अनेक खास विशेषांक या कालावधीत काढण्यात आले. ग्राहकांच्या वर्गणीतून या अंकांचा खर्च भागणे शक्यच नव्हते. पण 'आर्यभूषण'च्या संचालकांनी कधीही कुरकूर न करता हा सारा प्रचंड तोटा वर्षानुवर्षे आनंदाने सोसून संपादक मंडळाची हौस पुरवली.

सृष्टिज्ञान मासिकाचें
संपादक मंडळ


डॉ. वि. ना. भाजेकर, F. R. C. S. मुंबई
प्रो. गो. रा. परांजपे, M. Sc., I. E. S. मुंबई
प्रो. प्र. रा. आवटी, M. A., I. E. S. मुंबई
प्रो. श्री. ल. आजेरकर, M. A., I. E. S. मुंबई
रा. स. बा. हुदलीकर, M. A., B Sc. मुंबई
डॉ. दि. धों. कर्वे, M. A., Ph. D. पुणें
रा. शं. ब. सहस्रबुद्धे, B. A. पुणें

'आर्यभूषण मुद्रणालया'च्या विसर्जनानंतर 'सृष्टिज्ञान'चे भवितव्य काय राहणार, ही मोठी चिंता संस्थापक प्रा. गो. रा. परांजपे, 'सृष्टिज्ञान'चे सल्लागार, संपादक मंडळ आणि असंख्य हितचिंतक यांना पडली होती. सुदैवाने 'महात्मा फुले वस्तु-संग्रहालया'च्या संचालकांनी आणि विश्वस्त मंडळाने 'सृष्टिज्ञान'च्या व्यवस्थापनाची सर्व जबाबदारी उचलण्याची तयारी दाखवली आणि जानेवारी १९७५ पासून 'सृष्टिज्ञान' मासिक म. फुले वस्तुसंग्रहालयाच्या व्यवस्थापनाखाली प्रकाशनात खंड न पडता सुरू राहिले.

१९६० या वर्षाअखेरीपर्यंत 'सृष्टिज्ञान'चा आकार लहान म्हणजे क्राऊन (५ इंच" ७ इंच) होता. त्यानंतर हा आकार बदलून क्राऊन अष्टपत्री (७। इंच ९॥ इंच) असा मोठा करण्यात आला. मुखपृष्ठावर कधी एकरंगी, कधी दुरंगी तर कधी बहुरंगी अशी चित्रे असत. गेल्या ७३ वर्षांच्या काळात 'सृष्टिज्ञान'ने वाचकांना सुमारे ३५ हजार पृष्ठांचा विज्ञानविषयक उपयुक्त माहितीपूर्ण वाचनीय मजकूर पुरवला आहे. विज्ञानाच्या बहुविध शाखा-उपशाखांतील माहिती सुबोध, सोप्या मराठी भाषेतून देण्याचे कार्य 'सृष्टिज्ञान'ने केले आहे. भारतातील उद्योगधंदे, नवे शोध, मनोरंजक शास्त्रीय प्रयोग, शास्त्रज्ञांची चरित्रे,

वैज्ञानिक छंद, दैनंदिन व्यवहारातले विज्ञान, बुद्धीला खाद्य पुरविणारे कूट प्रश्न, जिज्ञासा, हे कसे घडते, टपाल तिकिटातून विज्ञान, गणिताच्या गंमती अशा अनेक रंजक प्रकारातून विज्ञानविषयक माहिती नियमितपणे देण्याचे कार्य 'सृष्टिज्ञान' करीत आहे.

१९६० नंतरच्या गेल्या चाळीस वर्षांत 'सृष्टिज्ञान'ने प्रयत्नपूर्वक अनेक विषयांवरचे खास विशेषांक काढले आहेत. त्यातील विशेष उल्लेखनीय अंक म्हणजे पाणी, दूध, कुक्कुटपालन, अग्निबाण, घरगुती सुविधा, पुण्याचे शास्त्रीय दर्शन, गेल्या शतकातील वैज्ञानिक प्रगती, महासागर विज्ञान, सूर्यकूल, स्वातंत्र्योत्तर भारताची वैज्ञानिक प्रगती, इत्यादी. 'सृष्टिज्ञान'चे संस्थापक प्रा. गो. रा. परांजपे यांच्या वयाला ८० वर्षे पूर्ण झाल्याच्या प्रसंगी काढलेला 'गो. रा. परांजपे खास अंक'ही वैशिष्ट्यपूर्ण होता. तसेच ऑगस्ट-सप्टेंबर १९६९ मध्ये काढलेला 'सृष्टिज्ञान'चा ५००वा जोडअंक १७८ पृष्ठांचा असून त्यात विज्ञानातील विविध शाखांचा सविस्तर परामर्श घेणारे खास लेख त्यात्या क्षेत्रातील मान्यवरांकडून मुद्दाम मागवून घेण्यात आले होते. विज्ञानक्षेत्रात नव्याने येऊ पाहणाऱ्या 'विज्ञान रंजन कथा' (सायन्स फिक्शन) या साहित्यप्रकाराला उत्तेजन देण्यासाठी १९७७ पासून गेली २३ वर्षे दरवर्षी दिवाळी अंक हा खास 'विज्ञान रंजन कथा विशेषांक' म्हणून काढला जात आहे.


वर्ष १ ] जानेवारी १९२८ [ अंक १

— अनुक्रमणिका —

मलपृष्ठ–सागराश्व अथवा घोडमासा–तीन रंगी.

| | | | |
|---|---|---|---|
| घोडमासा | .... | .... | पान १ |
| संपादकीय | .... | .... | ,, २ |
| पारदर्शकता–प्रो. परांजपे | | .... | ,, ६ |
| कृत्रिम रंग–प्रो. कर्वे | | .... | ,, १४ |
| लुई पाश्चर–डॉ. वाड | | .... | ,, २१ |
| वस्त्याचा शोध | .... | .... | ,, २८ |
| रासायनिक गप्पा | | .... | ,, ३२ |
| ज्ञानाचे कण | .... | .... | पान १३, १९ |

'सृष्टिज्ञान'च्या व्यवस्थापनाची जबाबदारी 'म. फुले वस्तुसंग्रहालय' या संस्थेने उचललेली असली तरीही अद्याप 'सृष्टिज्ञान'चा आर्थिक पाया सुस्थिर, भरभक्कम झालेला नाही. आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होण्यासाठी 'सृष्टिज्ञान'च्या हितचिंतकांकडून देणग्या मिळवून 'सृष्टिज्ञान निधी' सुरू करण्यात आला आहे. 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'नेही अनुदान देऊन 'सृष्टिज्ञान'साठी एक स्थायी निधी स्थापन केला आहे. नवी दिल्ली येथील 'शास्त्रीय औद्योगिक अनुसंधान मंडळां'कडून 'सृष्टिज्ञान'ला अनुदान मिळते. तरीही सध्याच्या मुद्रण-प्रकाशनाच्या सतत वाढत्या प्रचंड खर्चाच्या तुलनेत ही सारी तरतूद अत्यंत तुटपुंजी ठरते. गेली ७३ वर्षे सातत्याने मराठीतून विज्ञानप्रसार करण्याचे बहुमोलाचे कार्य करणाऱ्या 'सृष्टिज्ञान'ची पुढची वाटचाल सुस्थिर आर्थिक पायावरच अवलंबून राहणार आहे. यासाठी अखिल मराठी भाषिक जनतेने पुढे येऊन 'सृष्टिज्ञान'ला शक्य ते सर्व साहाय्य करण्याची आवश्यकता आहे. स्वत: 'सृष्टिज्ञान'चे वर्गणीदार होणे, आपले स्नेही, परिचित यांना वर्गणीदार होण्यास प्रवृत्त करणे आणि 'सृष्टिज्ञान निधी'ला भरघोस मदत देणे, या मार्गाने जनतेकडून प्रतिसाद मिळाला तर येत्या काळात 'सृष्टिज्ञान'कडून खूप मोठे भरीव कार्य होऊ शकेल.

'सृष्टिज्ञान'च्या गेल्या ७३ वर्षांतील संपादक मंडळात सदस्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्ती :

प्रा. गो. रा. परांजपे, डॉ. वि. ना. भाजेकर, प्रा. श्री. ल. आजरेकर, डॉ. दि. धों. कर्वे, डॉ. स. बा. हुदलीकर, प्रा. प्र. रा. आवटी, डॉ. कृ. श्री. म्हसकर, डॉ. वि. ना. गोखले, श्री. शं. ब. सहस्रबुद्धे, श्री. ग. म. वीरकर, प्रा. क. वा. केळकर, प्रा. मो. ल. चंद्रात्रे, डॉ. मो. वा. चिपळूणकर, डॉ. त्र्यं. शं. महाबळे, डॉ. गो. रा. केळकर, प्रा. ना. ह. फडके, डॉ. श्री. द. लिमये, श्री. आ. मा. लेले, प्रा. भा. वा. केळकर, प्रा. प्र. वि. सोवनी, श्री. मो. ना. गोखले, डॉ. अ. ब. सप्रे, प्रा. य. बा. राजे, श्री. निरंजन घाटे, श्री. गो. बा. सरदेसाई, डॉ. कृ. वि. दिवेकर, डॉ. वा. द. वर्तक, डॉ. र. द. भिडे, श्री. अ. स. जोशी, डॉ. क. कृ. क्षीरसागर, डॉ. अनिल महाबळ, श्री. श्री. वि. केळकर, श्री. अ. ल. देशमुख

विद्यमान संपादक मंडळ :

श्री. ना. नी. मेडदकर, श्री. मुकुंदराव गोडबोले, प्रा. प्र. वि. सोवनी, डॉ. क. कृ. क्षीरसागर, श्री. निरंजन घाटे, श्री. गो. बा. सरदेसाई, श्री. श्री. वि. केळकर, डॉ. वा. द. वर्तक, डॉ. अनिल महाबळ.

**— प्रभाकर सोवनी**




राजन गवस हे आजचे महत्त्वाचे कादंबरीकार आहेत. त्यांच्या 'चौंडकं', 'भंडारभोग', 'कळप' यांसारख्या आधीच्या कादंबऱ्यांतून त्यांनी आपल्या लेखनाचा कस जसा सिद्ध केलेला आहे तसेच आपल्या ग्रामव्यवस्थेतील विविध जातीय आणि आर्थिक गट-उपगटांचे परस्परसंबंध, त्यांच्यातील बरीवाईट नाती, त्यातले ताणतणाव यासंबंधीचे अस्सल भानही प्रकट केलेले आहे. एक कार्यकर्ता म्हणून अनेक सामाजिक चळवळींशी त्यांचा सतत क्रियाशील संबंध आहे. कादंबरीकारासाठी हे महत्त्वाचेच आहे कारण आस्थेच्या वाटणाऱ्या घटनांमध्ये आतून बाहेरून स्वेच्छेने घुसळून निघाल्याखेरीज काही जाणवणे, दिसणे मुष्कीलच असते. अर्थात कार्यकर्ता असणे हे कादंबरी लिहिण्यासाठी पुरेसे मात्र नाही. कारण कादंबरीकाराला घटनांचा अंतर्बाह्य धांडोळा

# तणकट

घेत त्यांची अर्थपूर्ण पुनर्निर्मिती करावी लागते व त्यातूनच तो जीवनासंबंधी, मानवी संबंधासंबंधी काही सत्य शोधायचा प्रयत्न करीत असतो. राजन गवस यांचे महत्त्व या सत्यशोधनाच्या गंभीर व सघन प्रयत्नांसाठी आहे. अशा प्रयत्नांचे एक महत्त्वाचे शिखर 'तणकट' या त्यांच्या नव्या कादंबरीत प्रत्ययाला येते. यातले एक शिखर अशासाठी की श्रेष्ठ लेखकाच्या एकूण रचनेत अशी अनेक शिखरे दिसू शकतात व राजन गवस यांची क्षमता पाहता त्यांच्याकडून ती दिसण्याची भरीव शक्यता खासच आहे. 'चौंडकं'सारख्या त्यांच्या अगदी पहिल्या कादंबरीतही असे एक वेगळे, महत्त्वाचे शिखर आपल्याला दिसते, हे नमूद केले पाहिजे.

सत्तरीच्या दशकाच्या उत्तरार्धात आपल्या भाषेत दलित आणि ग्रामीण साहित्य जोमदारपणे लिहिले जाऊ लागले. अठरापगड जातीतून आलेले लेखक लिहू लागले. उद्धव शेळके यांच्या 'धग'सारखी श्रेष्ठ कादंबरी थोडी आधी लिहिली गेली तशीच



महाराष्ट्र फाउण्डेशन ग्रंथ पुरस्कार
**तणकट**
राजन गवस

बाबुराव बागूलांची 'सूड'ही. भीमराव वाकचौरे यांनी 'रानखळगी' नावाची एक चांगली कादंबरी लिहिली आहे पण ती फार पोहोचली नाही. दलित साहित्यात प्रामुख्याने चांगली आत्मकथने, कविता लिहिल्या गेल्या. थोड्याफार कथाही आल्या, पण चांगली दलित कादंबरी अपवाद म्हणूनच कदाचित दाखवता येईल. ग्रामीण कादंबरीमध्ये प्रामुख्याने गावकारण, काळी व पांढरीचे चित्रण, विविध जाती-उपजातींचे चित्रण, विविध व्यावसायिक गट केंद्राशी ठेवून चित्रण असे सगळे झाले असले तरी गावकुसाबाहेरचे महारामांगांचे जग या कादंबऱ्यांत अभावानेच आलेले आहे व आले तिथेही तोंडी लावण्यापुरते आलेले आहे. वस्तुतः काहीशा रोमँटिक वळणाने लिहिणाऱ्या, तरीही अत्यंत महत्त्वाच्या अण्णा भाऊ साठे यांनी चांगली सुरुवात करून दिलेली होती पण त्या दिशेने विकास जसा ग्रामीण लेखकांनी केला नाही, तसाच दलित लेखकांनीही. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथांमध्ये हे सगळे घटक—गावकुसाच्या आतले व बाहेरचे—स्पष्ट व समजदार ताकदीने विविध धाग्यांनी प्रकट झालेले दिसतात तरीही कथा या वाङ्मयप्रकाराची अंगभूत मर्यादा त्यांना स्वभावत:च येते. दलित लेखकांच्या आधीच्या पिढ्यांना आपल्या वंचनेच्या इतिहासाच्या विराट काळोखात आपली मानवी आस्था खुली करणे तितके शक्य झाले नाही, हे चांगल्या दलित कादंबऱ्या लिहिल्या न जाण्याचे एक कारण आहे. आज आनंद विंगकर, राम दातोंडे यांच्या कवितांमध्ये खुल्या व्यापक आस्थेचे भान प्रकट होताना दिसते, ही लक्षणीय गोष्ट आहे.

राजन गवस यांनी मराठी साहित्यात पहिल्यांदाच गाव, महारवाडा, मांगवाडा या साऱ्यांना आपल्या आस्थेच्या कवेत घेऊन व्यापक उभारणी केली आहे. 'तणकट' या त्यांच्या कादंबरीचे महत्त्व त्यासाठी आहे. महारवाडा हा सुटा नाही, तो गावाचा भागच आहे व त्याला गावाच्या संदर्भातच अस्तित्व आहे व त्यांच्यातील नाते हे केवळ अत्याचारी आणि शोषित या प्रकारचे नसून त्यात अनेकविध पदर आहेत, तसेच काळाच्या प्रवाहात त्यांचे स्वरूपही बदलत आहे, याचे भान आपल्या वाङ्मयीन आकलनाला आणून देण्याचे महत्त्वाचे कार्य राजन गवस यांनी या लेखनातून केले आहे. हे अर्थात या कादंबरीचे अगदी प्रारंभिक सामर्थ्यस्थळ आहे.

आपण ग्रामीण कादंबरी, दलित कादंबरी अशा संज्ञा सोय म्हणून फक्त वापरत असतो, याचे भान अनेकदा आपल्याला राहात नाही व कळत-नकळत अपेक्षांचा दाब व काही मर्यादाही आपण लेखनकृतीवर लादत असतो. अशा मर्यादांची चौकट ही कादंबरी मोडते.

ढोबळमानाने दोन केंद्रांमधून या कादंबरीची सुरुवात होते. त्यातली दोन्ही केंद्रे प्रभावी व शक्तिशाली असली तरी त्याचा वस्तुमानमध्य (center of mass) अखेरी एका केंद्राकडे म्हणजे महारवाड्याकडे सरकतो म्हणून 'तणकट'ला दलित कादंबरी म्हणता येईल. (ती फक्त सोयीसाठी. एरवी दलित जातीत न जन्मलेल्या लेखकाच्या कृतीला दलित कादंबरी म्हणणे आपल्या समीक्षेला मान्य होण्याजोगे नाही—अगदी दलित विचारवंतांच्या बाजूनेही नाही, अशी चमत्कारिक स्थिती.). महारवाड्यात जे केंद्र आहे त्यातील सघन केंद्र वा गाभा कबीर कांबळे हा तरुण मुलगा आहे. त्याचे आईवडील, तो जिथे राहतो तो महारवाडा, तेथील तरणी-म्हातारी माणसे, वेगवेगळ्या स्वभावप्रकृतीचे प्रतिनिधित्व करणारे स्त्री-पुरुष आहेतच. खेरीज कबीर तालुक्याला कॉलेजात शिकतो म्हणून कॉलेज, तिथल्या चळवळी, दलित नेते व कार्यकर्ते यांचे विश्वही आहे. दुसरे केंद्र अर्थातच गावात आहे व त्यात गाभ्याशी शेडबाळे नावाचा चलाख माणूस आहे आणि ग्रामव्यवस्थेचे प्रतिनिधित्व करणारी आक्काबा राणे, सरपंच, लव्हार, परीट, न्हावी अशी सगळी माणसे आहेतच. यातले आक्काबा राणे हे पात्र महत्त्वाचे आहे. या कादंबरीतील ही दोन्ही केंद्रे एकमेकांपासून सुटी नाहीत. ती एखाद्या बायनरी मोलेक्युलसारखी एकमेकांना जोडलेली, स्फुरणशील व परस्परांत विकासमान नात्यांचे उलटे-सुलटे धागे जोडणारी आहेत. म्हणूनच गावातून हाकलला गेलेला शेडबाळे महारवाड्यात राबता ठेवू शकतो व म्हणूनच वतनदार आक्काबा राणे आणि कबीर कांबळे यांच्यात एक अस्फुट व भरीव नाते असू शकते. मराठा जातीमध्ये पंचकुळी, शहाण्णवकुळी, ब्याण्णव कुळी, चौगुले, कडूचे-लेकावळे या प्रकारची भलीमोठी उतरंड असते. तिच्यातल्या अगदी तळाच्या कडूचा किंवा लेकावळा अशा मराठा जातीतला शेडबाळे; त्याच्या तसा असण्याची वेदनाही राजन गवस यांनी चित्रित केलेली

आहे. अगदी जान्या लव्हारसुद्धा शेडबाळेला आपल्या बरोबरीचा मानत नाही.

"... आमाला त्ये कडूचं समजत्यात. ह्या रांडच्यानीच आमाला कडू केलंय आनी वर हेच आमाला कडू म्हणत्यात. हेच्याच बापजाद्यांनी रांडा ठेवल्या आनी आमची वसावळ वाढीवली. तसा तुमच्यात आनी आमच्यात काय फरक?'' असे शेडबाळे जान्या लव्हाराला म्हणतो तेव्हा लव्हार म्हणतो, "छ्याऽऽ छ्याऽऽ आमचं येगळं. आमी लेकावळ्याचं न्हवं बाबाऽऽ. आमी जातिवंत आयगारी... तुमच्यात आमाला घालू नगं.'' (पृ. ९४)


हा शेडबाळे दादू कांबळेला सोबतीला घेऊन दूध सोसायटीत साठ हजारांचं फ्रॉड करतो. त्यात दादूला काही मिळत नाही आणि बाकी कोणालाही. शेडबाळे कायद्यात कुठं सापडत नाही. पण गावातली वजनदार मंडळी शेडबाळ्याच्या विरोधात जातात. आक्काबा राणे हा पंचकुळी वतनदार म्हातारा समजदारीने गावाला हाताळणारा व मुख्य म्हणजे गाव आणि महारवाडा यांच्यातील नात्याची समृद्ध जाण असलेला व प्रसंगी सगळ्यात जास्ती लवचिकता प्रकट करणाराही आहे. गावाने टाकल्यावर शेडबाळे महारवाडा जवळ करतो व तिथल्या लोकांना आशा दाखवतो. तो रामा महाराच्या सुलीला जवळ करतो. दलित पुढाऱ्यांना महारवाड्यात आणतो, त्यांची उठबस करतो. तो अतीव ऊर्जा व हिकमती अंगी असलेला माणूस असंख्य उचापती करीत अखेर साऱ्या महारवाड्याला कर्जाच्या डोंगराखाली चिणून ठेवत पोबारा करतो. तो गावातल्या वतनदारांना फसवतो व तिथून हाकलला गेल्यावर मुळात उघड्या असलेल्या महारांना पुरते नागवतो. या साऱ्यात गाव आणि महारवाडा यांच्या नात्यातही खूप उलथापालथ होते. कबीर कांबळे आपल्या परीने आपल्या लोकांना सावध करायचा प्रयत्न करतो पण ते अयशस्वी होतात. हे स्थूलमानाने या कादंबरीचे कथानक. अर्थात यात आणखी जाड आणि सूक्ष्म असे विपुल पदर आहेत. गावकारण, गावातले वतनदार, बलुतेदार, त्यांच्या मीटिंगा, तालुक्याचे राजकारण, दलित पुढारी, त्यांच्यातले गट-तट आणि मानापमान, महारांचे मांगांविषयीचे अभिप्राय, मांगांचे महारांविषयी आकलन, महारवाडा विरुद्ध मांगवाडा, गावकीची कामे, शिवारातले रस्ते आणि अडवणुकी, बँजो पार्टी आणि झांजपथकं तसेच सुलीचे नवे घर, शेडबाळ्याची बायको व आई, कबीरची आई अशी स्त्रियांची चित्रणे, असे कितीतरी लहान-मोठे पदर एकत्र करीत काहीसे जाडेभरडे व म्हणूनच अस्सल असे नात्यागोत्याचे वस्त्र या कादंबरीत विणले गेलेले आहे.

वेगवेगळ्या स्तरावरील दलित पुढारी आणि कार्यकर्ते, त्यांचे मतलबीपण व सगळ्यांचा संधी मिळेल तेव्हा व तसा कबीर कांबळे याने फाडलेला बुरखा, हे या कादंबरीचे आणखी एक वैशिष्ट्य. एखादासुद्धा चांगला दलित कार्यकर्ता लेखकाला दिसला कसा नाही, या प्रकारचा वाङ्मयबाह्य प्रश्न इथे उपस्थित करता येईल. पण वास्तवाच्या उजेडात तो टिकत नाही. हा वास्तवाचा उजेड जसा वाङ्मयीन आहे तसा वाङ्मयबाह्यही. एकतर माणूस म्हणून अस्सल व नेक असे काही ज्याच्यापाशी आहे ते कबीर नावाचे सगळ्यात महत्त्वाचे पात्र या कादंबरीत आहे व ते लेखकाने निर्माण केलेले आहे. कबीर हा या कादंबरीचा गर्भित लेखकच म्हणावा इतके त्याचे महत्त्व आहे. आजचा दलित तरुण, खेड्यात राहणारा संवेदनाक्षम दलित मुलगा ग्रामव्यवस्थेकडे कसा पाहतो हे आपल्याला जसे इथे दिसते तसेच तो दलित चळवळी, नेते यांच्याकडे कसा पाहतो, त्याला काय दिसते, हे चित्रणही फार महत्त्वाचे आहे व त्याच्याकडे चळवळीला अंजन घालणारे सत्य म्हणूनही बघावे लागेल. कबीर आपल्या भोवतालच्या नासत चाललेल्या वर्तमानाला जी प्रतिक्रिया देतो, तिची रीतही लक्षणीय आहे. त्याला सारे नीट दिसत असते व कळतही असते, तरीही प्रवाहात घुसून त्याचा प्रतिकार तो करीत नाही. तो प्रयत्न करतो पण काहीसा दुरून. त्याचे या प्रकारे दूर राहणे एक प्रकारच्या कुंठेचे, हतबलतेचे लक्षण जसे म्हणता येईल, तसेच ते समकालीन वास्तवाचे करुण दर्शनही म्हणता येईल. भुलवणाऱ्या प्रवाहात सारेच शोषित सामील होत असताना तो फक्त त्याच्या बाहेर स्वतःला ठेवू शकतो. साऱ्याला विरोध करून हाणून पाडण्याची ताकद अजूनही त्याच्यात नाही. ती त्याच्यात दाखवली असती तर ते स्वप्नरंजन ठरले असते. राजन गवस यांनी आपल्या वास्तववादी आकलनात हे स्वप्नरंजन टाळले आहे, किंबहुना स्वभावतःच ते टळले आहे, असे म्हणावे लागेल.

पण म्हणून कबीरला स्वत:ची अशी काही भूमिकाच नाही, असे बिलकूल नाही. तो ती परखडपणे मांडतो. दलित पुढारी (पृ. १९७), (पृ. २००), दलितांच्या प्रवृत्ती (पृ. २१४) यांच्यासंबंधी त्याची निश्चित भूमिका आहे. गावाकडेही तो वेगळ्या, मोकळ्या तरीही संवेदनाक्षम दृष्टीने पाहतो. आक्काबा राणे यांच्या निरोपावरून त्यांना भेटायला जाताना त्याच्या मनात येतं, "...म्हारोड्यात जे काही घडतंय ते त्याला बिल्कूल आवडत नव्हतं हे खरं होतं. पण म्हारांनी आपल्या पायरीनं वागावं ह्या बोलण्यात लपलेला गावातल्या लोकांचा अहंकार त्याला मानवण्यासारखा नव्हता. ही माणसं बदलताहेत हे खरं असलं तरी सगळं अनिच्छेनं चाललंय असंही त्याला लक्षात यायचं..." (पृ. १५८)

ग्रामीण साहित्य किस्सेवजा पद्धतीने लिहिणाऱ्या ग्रामीण व अग्रामीण लेखकांनी मराठा पाटील, सरपंच यांची प्रतिमा बव्हंशी शोषक, इष्कबाज, आडमुठा, भानगडबाज, मग्रूर अशीच उभी केलेली आहे. नंतर ती आनंद यादव, रा. रं. बोराडे, भास्कर चंदनशिव यांनी बरीच नीट व वास्तववादी पद्धतीने मांडली. खरे तर त्रिंबक नारायण आत्रे यांच्या 'गाववाडा' पुस्तकात हे सारे फार चांगले आधीच आलेले आहे. 'तणकट'मध्ये आक्काबा राणे आपल्याजवळची सायकल कबीरला देऊ करतो. कबीरला नको म्हणावंसं वाटतं, पण त्याची जीभ उचलत नाही. आक्काबा म्हणतो, "गाव-म्हारोड्याच्या राजकारणासाठी सायकल दिलीया म्हणशील तर तसं नाही... तुझा आजा आमच्या बांधावर मेला. तुझा पणजा मला पवायला शिकवायचा आणि तुझा बा आमच्यात न्हाणाचा मोठा झालाय. म्हणून ही द्यालीय म्हण वाटलं तर. आनी ह्यावर्षी जोरात आब्यास कर. पुढच्या वर्षी तुझ्या नोकरीचं माझ्याकडं. जा आता." (पृ. १६०).

महारवाड्यावर मोर्चाने जाऊ पाहणाऱ्या गावातल्या अठरापगड मोर्चाला सामोरा जाताना आक्काबा म्हणतो, "कुणाविरुद्ध न्हेणार तुम्ही मोर्चा? गावच्या म्हारांच्या विरुद्ध? त्यांनी काय वाईट केलंय तुमचं?... आगाड करणारा न्हाला बाजूला आणि उगच सापसाप



म्हणून... सगळं करणार त्यो बाळ्या शेडबाळ्या. त्यो करतोय आन त्या म्हारांच्या नावावर जातंय. त्यास्नी गरीबास्नी काय कळतंय गाऽऽ? आनी कळालं आस्तं तर त्येच्यापाठीमागनं गेली अस्ती?... किती केलं तरी ती आपलीच हायीत...'' (पृ. २११)

राजन गवस सारी पात्रे, जाती व प्रवृत्ती यांच्याकडे आस्थेने पाहतात. ते कशाचेही समर्थन करीत नाहीत व काही टाळतही नाहीत. फार तर शोषित समूहाकडे ते जास्त आस्थेने पाहतात, असा आरोप त्यांच्यावर करता येईल. पण ते तर कोणताही जाणता लेखक करतोच. साऱ्याच निर्मितीच्या मुळाशी काही एका वेदनेसंबंधीची प्रगाढ आस्था ही असतेच. राजन गवस हे माणूस फक्त काळ्या-पांढऱ्या रंगात चित्रित करत नाहीत. मानवी स्वभावाच्या वर्णपटातील साऱ्या रंगछटांचे अस्सल भान त्यांच्या ठायी आहे.

गावाकडून शहराकडे स्थलांतर आणि हिंदू धर्माच्या उतरंडीतील तळाच्या जागेवरून सन्मान देणाऱ्या बौद्ध धर्मात धर्मांतर हा मार्ग दलितांनी; प्रामुख्याने महार जातीने स्वीकारलेला होता. सुरुवातीच्या काळात ते योग्य आणि आवश्यकच होते. पण ते काही दलित समस्येचे अंतिम उत्तर नाही. या दोन्ही मौलिक कृतींमधून मिळालेले बळ घेऊन ग्रामव्यवस्थेत सन्मानाची व न्यायोचित जागा मिळवणे व ती तिथे आहेच, याचे भान ग्रामव्यवस्थेला देणे आज महत्त्वाचे आहे. आजही खूप मोठा दलित समूह खेड्यातच राहतो. त्यांचे जगण्यातले हितसंबंध तिथेच गुंतलेले आहेत याचे भान नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी बाळगले पाहिजे. राजन गवस यांच्या आकलनात हे भान प्रभावाने दिसते. ग्रामस्तरावर बदलत चाललेल्या दलितांसंबंधीच्या धारणांचे त्यांनी केलेले चित्रण त्याची साक्ष देतेच खेरीज मुळातही ती प्रकट-अप्रकटपणे काहीशा रांगड्या आस्थेच्या रूपात होती, हेही त्यांनी मांडले आहे.

राजन गवस यांनी आपल्या लेखनातून दक्षिण महाराष्ट्राच्या सीमाभागातील अस्सल मराठी भाषेला आपल्याशी जोडले आहे. 'तणकट' कादंबरीतील कितीतरी प्रसंग, शब्द व प्रतिमा त्याची साक्ष आहेत. नुसते शब्द म्हटले तरी डुबार, वडावणं, सलपं, दांडगेसूर, तेगार, खासगल, मेसकाटीची टोणकी असे कितीतरी. आपल्याच भाषेतले. आपल्या साहित्याला समृद्ध करणारे. कादंबरीच्या सुरुवातीला एक गडद काळा ढग चावडीवर येतो व सरकत सरकत म्हारोड्यावर स्थिर होतो. एकदम अंधार. हवेत उष्मा नाही. पावसाची शक्यता नाही. ढग जागच्या जागी स्थिर. कादंबरीच्या अखेरीस दुपारीच कबीर म्हारवाड्यात येतो. अंधारून येतं. त्याला वाटतं, आपल्याच डोळ्यांसमोर अंधार आलाय. तो डोळे चोळतो. उघडतो. पुन्हा जास्तच अंधार. पापणी उचलणंच अशक्य होतं. शरीरातली शक्तीच नाहीशी झाल्यासारखं वाटतं.

एका शोषित समूहावर पसरलेल्या व अंततः अशक्य गडद झालेल्या काळोखाचा शोकात्म प्रत्यय देऊन ही कादंबरी संपते. तरीही या अंधारातून उजेड उगवणारच हे आश्वासनही ती देते. असल्या अनेक अंधारांच्या अनेक अवतारांशी सामना करीत उरण्याचे संचित आपल्या लोकांच्या ठायी आहे, हा घनीभूत अनुभव त्यापाठी असतो.

सामाजिक वास्तवापासून दूर पळत फुटकळ बेगडी प्रयोग करणाऱ्या व डोंगर पोखरून उंदीर काढण्याजोगे काही साधणाऱ्या काही कादंबरीकारांच्या प्रवृत्ती व त्यांना उचलून धरणारा चलाख समीक्षक अजूनही आपल्या भाषेत वजनदार असताना 'तणकट'ची अस्सल देशी महत्ता आश्वासकच म्हटली पाहिजे. ती नव्या वळणाची, व्यापक व समृद्ध जाणिवेची दिशा दाखवणारी व म्हणून अत्यंत महत्त्वाची समकालीन कृती आहे. तिच्यावर उलटसुलट चर्चा नक्कीच होत राहतील व तशा त्या होत राहण्यातच तिची असाधारणता आहे. चांगल्या अर्थाने अस्वस्थ करणे हा जर कलाकृतीचा धर्म असेल तर त्या प्रकारचे समाधान ती खचितच देते, असे खासच म्हणता येईल.

**– रंगनाथ पठारे**




# आतंक

विलास सारंग हे नाव एक सर्जनशील लेखक आणि समीक्षक म्हणून मराठी वाचकांना आता चांगल्यापैकी परिचित आहे. त्यांनी मोजकेच परंतु अर्थगर्भ सर्जनशील लेखन केले आहे. त्यांनी कथा, कादंबरी व कविता हे निखळ सर्जनशील लेखनप्रकार हाताळले आहेत. याबरोबरीनेच त्यांनी लक्षणीय स्वरूपाचे समीक्षालेखनही केले आहे. इंग्रजीतून मराठीत आणि मराठीतून इंग्रजीत असे काही अनुवादही त्यांनी केले आहेत. सारंगांच्या लेखनामध्ये अशी विविधता असली तरी त्यांची ओळख मूलतः नव्या दृष्टीचा कथाकार अशी आहे. मराठीमध्ये त्यांचे 'सोलेदाद' (१९७५) व 'आतंक' (१९९९) हे दोन कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत.

विलास सारंग यांच्या कथा वाचताना प्रथमदर्शनीच तिचे रूढ मराठी कथेपेक्षा असलेले वेगळेपण ठाशीवपणे लक्षात येते. हे वेगळेपण या कथांची आशयसूत्रे, तिच्यातील एकूण जीवनचित्रण, तिच्यातील स्थल-काल, तिच्यातील तंत्रे, तिची भाषा या सर्वच गोष्टींबाबत दिसून येते. मुख्य म्हणजे या कथेतील जीवनदृष्टी व कलादृष्टी रूढ मराठी कथेपेक्षा मोठ्या प्रमाणात वेगळी आहे. गंगाधर गाडगीळ प्रभृतींची नवकथा किंवा त्यालगतच्या काळातील जी.ए. कुलकर्णी प्रभृतींची नवकथा यांनी पारंपरिक मराठी कथेला अनेक धक्के दिले असले, मराठी कथेच्या कक्षा कमी-अधिक प्रमाणात विस्तारल्या असल्या, तिच्यात लक्षणीय स्वरूपाची भर घातलेली असली तरीही या कथा वाचण्याची, त्यांचे आकलन, विश्लेषण, मूल्यमापन करण्याची पद्धत आत्मसात करायला मराठी वाचकांना फार सायास पडले असे दिसत नाही. आता तर या वळणाची कथा मराठी वाचकांच्या अंगवळणी पडली आहे. सारंग यांची कथा मात्र या रूढ कथेच्या संकेतव्यूहाला मोठ्या प्रमाणात नाकारणारी असल्यामुळे तिचे वाचन, विश्लेषण कसे करायचे, यासंबंधी प्रश्न निर्माण होतात. दुसरे असे की रूढ नवकथेत अर्थाच्या, दृष्टीच्या शक्यता मर्यादित आहेत. सारंगांच्या कथांबाबत तसे होत नाही. अर्थाच्या शक्यतांचे एक व्यामिश्र जाळे या कथा निर्माण करतात.

सारंग यांच्या कथेचे वेगळेपण मूलत: त्यांची जीवनदृष्टी व कलादृष्टी यांत आहे. ही दृष्टी स्थूलमानाने आधुनिकवादी कलापरंपरेतील आहे. ती आत्मनिष्ठ किंवा व्यक्तिनिष्ठ स्वरूपाची आहे. प्रचलित वाङ्मयीन व्यवस्था नाकारणारी आहे. प्रयोगशीलता हा तिचा महत्त्वाचा विशेष आहे. सारंग यांची जीवनदृष्टी मूलत: आधुनिकवादी परंपरेतील असल्यामुळे त्यांना मानवी अस्तित्वलक्ष्यी अंगांमध्ये, प्रश्नांमध्ये अधिक रस आहे. आधुनिक जगातील माणसाला भेडसावणाऱ्या अनेक प्रश्नांचा जिकिरीने शोध घेण्याचा प्रयत्न सारंगांनी आपल्या कथांमधून केला आहे. हे प्रश्न मानवी अस्तित्वाविषयीचे आहेत आणि ते मूलत: अतिभौतिकीय, तात्त्विक स्वरूपाचे आहेत. गाडगीळ प्रभृतींच्या केवळ मनोविश्वातच गुंतलेल्या मराठी नवकथेला सारंगांनी तात्त्विक, अतिभौतिकीय अंगाचे परिमाण मिळवून दिले. सारंगांच्या कथांमध्ये मनोविश्लेषण, मनोगंड यांचे चित्रण आले असले तरी ते त्यांचे लक्ष्य नाही. आधुनिक माणसाचे एकटेपण, त्याला ग्रासणारी चिंता, असुरक्षितता, दहशत, भीती, माणसाचे देहरूप अस्तित्व आणि त्याची देहातीत होण्याची, मुक्ती मिळविण्याची ओढ; स्व-परसंबंध, माणसामाणसांमधील परस्परसंवाद, नात्यांचे स्वरूप, त्यांतील शक्याशक्यता, त्यामुळे निर्माण होणारे ताण, मानवी मूल्यांचे स्वरूप, शासनव्यवस्था व व्यक्ती यांच्या संबंधांचे स्वरूप, माणसाचे स्वत्व, स्वातंत्र्य अशा अनेक अस्तित्वलक्ष्यी आशयसूत्रांची मांडणी सारंगांच्या कथांमधून झाली





महाराष्ट्र फाउण्डेशन ग्रंथ पुरस्कार
**आतंक**
विलास सारंग

आहे. ही आशयसूत्रे सारंगांचे कलासाहित्यक्षेत्रातील आधुनिकवादाशी असलेले नाते स्पष्ट करतात. त्यांच्या लेखनातून व्यक्त होणारी मूल्यदृष्टी आधुनिकवादी परंपरेतीलच आहे.

'आतंक' हा सारंगांचा दुसरा कथासंग्रह आहे. 'सोलेदाद'मधील आशयसूत्रे ही प्रामुख्याने आत्मनिष्ठावादी होती. परंतु 'आतंक'मधील आशयसूत्रे ही कक्षा ओलांडून पलीकडे जातात. 'आतंक'मध्ये आत्मनिष्ठावादी आशयसूत्रांना वस्तुनिष्ठेची जोड मिळते. आत्मनिष्ठावादी वृत्ती कायम राखून वस्तुनिष्ठ अंगांचा त्यात समावेश करण्याचा त्यांचा प्रयत्न या कथासंग्रहात अधिक ठाशीवपणे दिसून येतो.

सारंग यांच्या कथा आधुनिकवादी असल्यामुळे त्या मराठी कथेत प्रभावी असलेली वास्तववादी, अनुकृतिवादी परंपरा नाकारतात. आपल्या आधुनिकवादी आशयसूत्रांची मांडणी करण्यासाठी सारंग जो परिसर व व्यक्तिरेखा निवडतात, जे अनुभवविश्व उभारतात, त्याचे काही प्रमाणात दृश्यमान वास्तवाशी नाते असले तरी वास्तवाची अनुकृती असे त्यांच्या कथांचे स्वरूप नाही. अर्थात, येथे हे आवर्जून सांगायला हवे की या कथा वास्तववादी परंपरेतील नसल्या तरी त्या मानवी वास्तवाविषयीच्याच आहेत. किंबहुना वास्तववादी परंपरेतील वस्तुनिष्ठ वास्तवापेक्षा त्या अधिक वास्तव आहेत. मानवी अस्तित्वाविषयीचे अत्यंत उत्कट व जिव्हाळ्याचे प्रश्न या कथा उपस्थित करत असल्यामुळे त्या लौकिक वास्तवापेक्षा आंतरिक, खऱ्याखुऱ्या वास्तवाला अधिक जवळच्या आहेत. असे म्हणता येईल की सारंगांच्या कथेतील वास्तव हे अधिक मूलगामी स्वरूपाचे आहे.

सारंगांच्या कथा वास्तववादी परंपरेतील नसल्या तरी या कथांमधील घटना, तिच्यातील व्यक्तिरेखा, स्थलकालाचे तपशील अशा रीतीने येतात की आपण खरेखुरे जग अनुभव आहोत, असा वाचकाला प्रत्यय येतो. या कथांमधील फँटसी असेल किंवा एखादा दुःस्वप्नाचा भाग असेल त्या वाचताना जणू काही हे आपल्या समोर घडत आहे, आपण त्या जगाचा भागच आहोत असे वाटते. त्यामुळे सारंगांच्या कथांमधील फँटसीचे चित्रण, काल्पनिक विश्वाचे चित्रण वाचताना आपण कल्पनेतले काही अनुभवत आहोत, असे वाटत नाही. सारंगांना ही किमया साधते, याचे कारण या वेगवेगळ्या जीवनचित्रणांमधून ते जे प्रश्न उभे करतात, ते आजच्या माणसाला भिडणारे खरेखुरे असे प्रश्न आहेत. सारंगांच्या या किमयेमुळेच त्यांच्या कथा प्रयोगशील आधुनिक वळणाच्या आणि तात्त्विक स्वरूपाच्या असूनही कंटाळवाण्या होत नाहीत. या कथा पुढे काय घडणार आहे, याची उत्कंठा सतत जागी ठेवणाऱ्या आहेत. रहस्यकथेप्रमाणे त्या वेधक, वाचनीय आहेत.

'आतंक'मधील कथांसह सारंगांच्या एकूणच कथांमध्ये रूढ मराठी कथेमधील मध्यमवर्गीय, कौटुंबिक वातावरण कटाक्षाने टाळले जाते. या वर्गाच्या संकेतव्यूहातून, मूल्यव्यूहातून बाहेर पडण्याचा एक मार्ग म्हणून असे चित्रण ते टाळतात, हे स्पष्टच आहे. यामुळे मध्यमवर्गीय मूल्यव्यवस्थेला, संवेदनशीलतेला नकारही दिला जातो. त्यांचा कथानायक बहुधा एकटा असतो. कथेत त्याच्या व्यवसायाचे काही संदर्भ आले तरीही त्याच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचे तपशील सारंगांच्या कथांमध्ये क्वचितच येतात. या कथांमधील पात्रांची नावेही मिश्र संस्कृतीतील असतात. अनेकदा कथानायक हा सर्वसामान्य चौकटीत बसणारा नसतो. तो विक्षिप्त, वेडसर असतो. किंवा कोणत्यातरी मानसिक भ्रमाखाली, तणावाखाली असलेला किंवा पछाडलेला असतो. अर्थात, 'सोलेदाद'मध्ये हे ज्या प्रमाणे दिसते तसे ते त्या प्रमाणात 'आतंक'मध्ये दिसत नाही.

सारंग यांची कथा बहुधा एखाद्या शहरात घडते. हे वास्तव प्रामुख्याने शहरातील, अनेकदा मुंबईसारख्या शहरातील आहे. काही वेळा हे वास्तव दुसऱ्या कोणत्यातरी देशातील, बहुधा तिसऱ्या जगातील एखाद्या शहरातील असते. मात्र या वास्तवाचे फारसे तपशील या कथांमध्ये नसतात. तरीही ही कथा विशिष्ट शहरात घडत आहे, असे त्या कथेतील पात्रांच्या कृतिउक्तींवरून जाणवत राहते. काही मोजक्या तपशिलाने किंवा काही संदर्भांनी ही जाणीव अधिक ठाशीव होते. 'आतंक'मधील 'सुखकर्ता दुखकर्ता', 'दगडी पायऱ्यांवर', 'खडकामधील दुपार', 'मरणवृक्ष', 'पुतळा', 'सुटकेसवाला' अशा काही कथांमधील वातावरण हे मुंबईसारख्या शहरातील आहे, हे स्पष्ट होते. काही कथांमध्ये अंशतः वा

पूर्णतः काल्पनिक प्रदेश येतात. उदाहरणार्थ, 'अर्ध्यामुर्ध्या', 'कुरमा-पुलाव' यांसारख्या काही कथा. या कथांमध्येही बहुधा शहरातील वातावरण असते. 'कल्लुरीचा रेडिओ' यासारख्या एखाद्या कथेत दुर्गम भागातील खेड्याचे चित्रण येते. परंतु रेडिओला या कथेत असलेले महत्त्व कथेतील जीवनाला आधुनिक संदर्भ कसे आहेत, ते दाखवते.

सारंगांच्या कथेतील अवकाश या कथा आधुनिक जीवन जगणाऱ्या माणसाविषयी, त्याच्या प्रश्नांविषयी कशा आहेत, ते स्पष्ट करतो. याबरोबरीनेच वेगवेगळ्या कारणांनी एक स्थळ, अवकाश सोडून दुसऱ्या अवकाशात जाण्याचे संदर्भही त्यांच्या कथेत येतात. 'अर्ध्यामुर्ध्या', 'परतलेला', 'सुटकेसवाला', 'क्रूसो', 'खोली सोडणारा' अशा अनेक कथांमध्ये हे दिसून येते. जागा सोडणे हे एका अर्थाने मुक्ती मिळवण्याचेच प्रयत्न आहेत. अवकाशाप्रमाणेच काळामधील बदल हाही या कथांमध्ये महत्त्वाचा आहे. अवकाश-काळामधील हे बदल खरोखरीच आहेत का, हा तात्त्विक प्रश्नही अनेक कथांमधून मांडला जातो. 'रूपांतर'मधील प्रणय देशमुखला त्याचे उत्थापित शिस्नामध्ये रूपांतर होऊनही मुक्ती लाभत नाही.

सारंग यांच्या अनेक कथांमध्ये वास्तवसदृश वातावरण आले तरी मधेच केव्हातरी काहीतरी अघटित घडते, आणि कथा पूर्णपणे वेगळ्या वाटेने जाते. उदाहरणार्थ, 'सुखकर्ता दुखहर्ता' या कथेत विसर्जनाच्या वेळी गणपतींनी आपल्या जागा सोडून जाणे, ही अघटित घटना घडते. या अघटित घटनेमुळे तोवर लौकिक वास्तवाच्या पातळीवर राहणारी ही कथा वेगळ्या विश्वात जाते. या अघटित घटनेचा अर्थ माणसे लावू लागतात. भयाची, चिंतेची जाणीव सगळ्यांच्या मनात घर करून बसते. 'गर्भवती', 'रूपांतर', 'पुतळा' या कथांमध्येही असेच काही अघटित घडत जाते. हे अघटित नेहमीच फँटसीच्या स्वरूपाचे असते असे नाही. उदाहरणार्थ, 'तरुण आईचं स्वगत' या कथेतील अघटित, मनोविकृतीच्या स्वरूपात समोर येते. या प्रकारची अनपेक्षितता सारंग यांच्या कथांमध्ये महत्त्वाची ठरते. ही अनपेक्षितता, अतर्क्यता, अनिश्चितता त्यांच्या जीवनदृष्टीचा जसा भाग आहे, तशीच ती त्यांच्या कथांच्या बांधणीचे महत्त्वाचे तत्त्वही आहे. त्यामुळे त्यांच्या कथांविषयी, विशेषतः त्यांच्या शेवटांविषयी कोणतेही आडाखे बांधता येत नाहीत.

सारंग यांच्या ज्या कथांमध्ये काही अघटित घडत नाही, अशा कथांमध्येही एक वेगळ्या प्रकारची अनपेक्षितता प्रत्ययाला येते. उदाहरणार्थ, 'दगडी पायऱ्यांवर'सारखी त्यांची कथा. वरवर पाहता या कथेत विशेष काही घडत नाही. लहानपणी भिकाऱ्याचे राहिलेले पैसे उचलणे ह्या एका साध्या घटनेची मोठेपणी पुनरावृत्ती होते. त्यातून एक ताण निर्माण होतो. आणि या ताणाचे उत्कंठावर्धक चित्रण या कथेत केले जाते. ही क्षुल्लक, साधी वाटणारी घटना अतिभौतिकीय पातळीवर जाते. मानवी जीवनातील बदलांचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे, याविषयी काही शक्यता येथे सूचित केल्या जातात. 'सिगरेटसह माणूस', 'खोली सोडणारा' या कथांमध्येही अशाच प्रकारचा अनुभव येतो. अघटित असे काही घडले नाही तरीही या कथा त्यांमधील विशिष्ट प्रकारच्या तात्त्विक जीवनाशयामुळे अनपेक्षिततेचा, अतर्क्यतेचा प्रत्यय देत राहतात.

सारंगांच्या कथेतील अनपेक्षितता, अतर्क्यता वेगवेगळ्या पातळ्यांवर प्रकट होताना दिसते. 'गर्भवती'मधील दार बिजागऱ्यांसह चाल करून येणे ही एक फँटसी आहे. परंतु तिच्यातील जीवन हा निवेदक जे सांगतो आहे ते किंवा 'अर्ध्यामुर्ध्या' या कथेतील चाको मुलाखतकाराला जे सांगतो आहे ते कितपत विश्वसनीय आहे, हा प्रश्न निर्माण होतो. तरुण आई आपल्या नवऱ्याच्या मनोविकृतीबद्दल जे सांगते ते खरे आहे का, किंवा 'परतलेला'मधील सुधीरला खरोखरच स्वप्न पडले आहे का, किंवा 'आतंक'मधील विलास खरोखरीच पत्र लिहितो का, असे प्रश्न त्या त्या व्यक्तिरेखांबद्दल निर्माण होतात. व्यक्तिरेखा किंवा घटनाप्रसंग पुढे कोणते वळण घेतील, शेवट काय असेल, याविषयी येथे अनिश्चितता असते. या प्रकारच्या अनपेक्षिततेमुळे या कथांमधून अर्थाच्या शक्यतांचे जाळे निर्माण केले जाते. या कथांमधील मानवी संबंधही असेच अनिश्चित स्वरूपाचे राहतात. विलासला डोलोरेसला पूर्णपणे कधीही पाहता येत नाही. 'अर्ध्यामुर्ध्या' कथेतील अर्ध्या स्त्रीदेहाशी असलेले चाकोचे संबंधही याच स्वरूपाचे आहेत. त्यामुळे त्याला पूर्णस्वरूप स्त्रीशीही संबंध जोडणे शक्य होत नाही. मानवी

संबंधामधील ही अनिश्चितता मानव-वस्तू यांच्या संबंधांतही आहे. व्यक्ती आणि व्यवस्था यांच्यातील संबंधांची अनिश्चितता हे याचे आणखी एक रूप आहे. ही अनिश्चितता या कथांमध्ये अनेकदा आयरनीच्या स्वरूपात समोर येते. उदाहरणार्थ, नेमके आंधळ्या माणसाचे फोटोग्राफ्स गहाळ होणे, किंवा 'क्रूसो' या कथेत बेटावर अडकलेल्या त्याची सोडवणूक करण्यासाठी जहाज त्याच्या दिशेने वळत असताना त्याच्या अंगावर जळता क्रूस पडणे.

राज्यव्यवस्थेच्या, शासनव्यवस्थेच्या संदर्भात व्यक्तीला वाटणारी दहशत, भीती, चिंता, असुरक्षितता हे 'आतंक'मधील प्रभावी आशयसूत्र आहे. 'आतंक' या कथासंग्रहाच्या शीर्षकातूनही ही गोष्ट अधोरेखित केली जाते. 'परतलेला', 'आतंक', 'कल्लुरीचा रेडिओ' यांसारख्या कथांमध्ये या आशयसूत्राचे चित्रण झाले आहे. प्रत्यक्ष शासनव्यवस्थेची दमनकारी यंत्रणा स्पष्ट, प्रत्यक्ष स्वरूपात या कथांमध्ये फारशी दिसत नाही. परंतु तिचे दहशत निर्माण करणारे अस्तित्व आणि त्यामुळे सामान्य माणसाच्या मनात निर्माण होणारी ताणाची, भीतीची, असुरक्षिततेची जाणीव मात्र अनेक सूचक घटकांमधून, घटनांमधून सूचित केली जाते. आपल्या कोणीतरी मागावर आहे, अशी जाणीव व्यक्तीला होत राहते आणि या दहशतीच्या जाणिवेखाली ती दबून जाते. तिची अवस्था अनेकदा दयनीय होते. खालच्या पट्टीत केलेल्या या अवस्थेच्या चित्रणामुळे या कथांमधील अनुभव हे कोठेही स्थूल स्वरूपाचे राहत नाहीत. ते सूक्ष्म व पीळदार होतात. या अनुभवांमधून व्यक्ती आणि व्यवस्था यांच्यातील संबंधांचे स्वरूप काय, मानवी स्वत्व, स्वातंत्र्य यांचा खरोखरीच अर्थ काय यांविषयीचे अतिभौतिकीय प्रश्न उपस्थित केले जातात. शासनव्यवस्थेच्या संदर्भातील आतंकाची, दहशतीची जाणीव जशी सारंगांच्या कथांमधून व्यक्त झाली आहे, तशी ती वेगवेगळ्या अन्य संदर्भातही व्यक्त झाली आहे. 'सुखकर्ता दुखहर्ता' या कथेत गणपती अचानक नाहीसा होणे, या घटनेत दहशतीची जाणीव आहे. 'मरणवृक्ष' या कथेतही ही दहशत आणखी एका व्यवस्थेच्या संदर्भात अवतरते.

सारंगांच्या कथा एक विशिष्ट जीवनदृष्टी व कलादृष्टी व्यक्त करणाऱ्या असल्या तरी त्या एकसुरी होत नाहीत. या कथांमध्ये वेगवेगळ्या प्रकारची विविधता आहे. सारंगांची प्रयोगशील दृष्टी हा या विविधतेमागील मोठा स्रोत आहे. त्यांच्या कथांमध्ये व्यक्तिरेखा, घटनाप्रसंग व एकूणच अनुभव एकसारखे होत आहेत, असे दिसत नाही. येथे वेगवेगळ्या प्रकारची, वेगवेगळ्या स्तरांवरील, वेगवेगळ्या वयोगटातील, वेगवेगळ्या व्यवसायातील माणसे आपल्यासमोर येतात. भिकारी किंवा खेड्यातील माणूस यांपासून ते शास्त्रीपंडित, हुकुमशहा यांपर्यंत अशा मोठ्या कक्षेतील या व्यक्तिरेखा आहेत. वास्तवाबरोबरीने फँटसी, अतिवास्तववादी, दुःस्वप्नसदृश अशा अनुभवांची सरमिसळ सारंग करीत असल्यामुळे हे अनुभवही अनिश्चित, व्यामिश्र स्वरूपाचे होतात. सारंगांची विलक्षण कल्पनाशक्तीही या अनुभवांमधून व्यक्त होते. सारंग आपल्या कथांमध्ये निवेदनाचे, रूपाचे अनेक प्रयोग करत असल्यामुळेही त्यांची कथा विविधतापूर्ण झाली आहे. प्रथमपुरुषी, तृतीयपुरुषी निवेदन हे त्यांच्या कथांत आहेच.

*'सारंग मराठी वाङ्मयाचे किंवा भारतीय इंग्रजी लेखनाचे प्रतिनिधी म्हणून ओळखले जात नाहीत, हे महत्त्वाचे आहे. आपल्या मराठीपणाचे किंवा भारतीयत्वाचे त्यांनी भांडवल केलेले नाही किंवा आपल्या देशीपणाचे त्यांनी वाङ्मयीन किंवा सांस्कृतिक राजकारणही केलेले नाही. विसाव्या शतकात एक जागरूक मराठी लेखक जितपत सहजपणे आधुनिक आणि वैश्विक वातावरणात आपले वेगळेपण सांभाळू शकतो तितपत ते सारंगांनी पेललेले आहे. हीही गोष्ट महत्त्वाची आणि समाधानकारक आहेच.'*

*— दिलीप चित्रे*

त्यांच्या कथेतील निवेदक बहुधा पुरुष असतो. काही वेळा एखादी स्त्रीही निवेदक म्हणून येते किंवा गिधाडासारखा पक्षीही निवेदक म्हणून येऊ शकतो. काही कथांमध्ये एकापेक्षा अधिक व्यक्तिरेखांच्या दृष्टिकोणातून कथा सांगितली जाते. त्यामुळे एकाच दृष्टिकोणाऐवजी अधिक दृष्टिकोण येत असल्याने निश्चिततेला छेद दिला जातो. पत्र, मुलाखत, अतिवास्तववाद, कल्पना साहचर्य अशी विविध प्रकारची तंत्रे यामुळेही कथांत विविधता निर्माण झाली आहे. या विविधतेमुळेच या कथा वाचनीय, वेधक झाल्या आहेत.

सारंगांच्या कथा रूढ मराठी कथेपेक्षा अनेक प्रकारे

वेगळ्या असल्यामुळे, तिथे वाचनसंकेत स्थिरावले नसल्यामुळे, तसेच तिच्यात रूढ, कौटुंबिक संबंधांचे चित्रण नसल्यामुळे त्या मराठी वळणाच्या नाहीत, असे वाटणे स्वाभाविक असले तरी ते योग्य नाही. सारंग आपल्या कथांमधून मूलतः अतिभौतिकीय प्रश्न उभे करतात. या प्रश्नांना आधुनिक जीवनाचे संदर्भ असणे अपरिहार्यच आहे. परंतु अतिभौतिकीय प्रश्नांत रमणे ही एक महत्त्वाची भारतीय वृत्ती आहे. त्यांच्या कथेत दिसून येणारी पात्रांची मुक्ती मिळविण्याची धडपड हा या वृत्तीचाच एक भाग म्हणता येईल. दुसरे म्हणजे, ज्या अद्‌भुततेचा, काल्पनिकाचा आधार सारंग आपल्या अनुभवविश्वाची उभारणी करण्यासाठी घेतात ते भारतीय कथात्म साहित्यात मोठ्या प्रमाणात आहे. या मूलभूत गोष्टी लक्षात घेतल्या तर खरे म्हणजे कथेतील वातावरणाच्या मराठीपणाचा प्रश्नच उपस्थित केला जाऊ नये. परंतु सारंगांच्या कथेतील वातावरणही अमराठी, अभारतीय वाटण्याचे कारण नाही. मुंबईसारख्या शहरात त्यांच्या अनेक कथा घडतात. परंतु याबरोबरीनेच मराठी वातावरणाचे तपशीलही त्यांच्या कथांमध्ये येतात. या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या तर या कथा मराठी नाहीत, हा आक्षेप चमत्कारिक आहे, हे लक्षात यावे. दुसरे असे की, मराठी समाजाचे मराठीपण असे काही सत्त्व पूर्वीपासून आजवर चालत आले आहे, असे मानणेही अडाणीपणाचे आहे. मराठीपणाची कल्पना ही कालौघात सतत बदलत जाणारी आहे, याचे भान ठेवलेले बरे.

**- वसंत पाटणकर**





# कर्मयोगी संन्यासी


न्या. नरेंद्र चपळगावकर हे केवळ कायदेतज्ज्ञच नाहीत तर ते रसिक वाङ्‌मयाभ्यासकही आहेत. कायद्याची पदवी आणि मराठी वाङ्‌मयाची स्नातकोत्तर पदवी त्यांनी प्रथम श्रेणीत मिळवली. वकिली सुरू करण्यापूर्वी त्यांनी एक वर्ष मराठीचे अधिव्याख्याते म्हणूनही कार्य केले. सुरुवातीच्या काळात त्यांनी कविता केल्या, कथा लिहिल्या. 'सत्यकथा', 'किर्लोस्कर', 'प्रतिष्ठान' या मासिकांतून त्यांचे हे लेखन प्रसिद्धही झाले. १९६२ पासून त्यांनी वकिली सुरू केली. १९९० ते १९९९ या काळात त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून काम केले. 'कर्मयोगी संन्यासी' हे चरित्र लिहिण्यापूर्वी त्यांची कायद्यावरची मराठी-इंग्रजी मिळून तीन, ललित गद्यातील एक आणि वाङ्‌मयीन संशोधनपर संपादित एक, अशी पाच पुस्तके प्रसिद्ध झाली.

न्या. नरेंद्र चपळगावकरांचे वडील अॅड. पुरुषोत्तमराव चपळगावकर हे हैदराबाद मुक्तिलढ्यातील एक अग्रगण्य पुढारी व स्वामी रामानंद तीर्थांचे राजकीय सहकारी होते. न्या. चपळगावकरांनी बालपणापासूनच हैदराबाद मुक्तिसंग्राम जवळून पाहिला होता. वडिलांच्या राजकीय जीवनामुळे लागलेली आर्थिक झळही त्यांनी अनुभवली होती. या लढ्याच्या असाधारण वैशिष्ट्यांबद्दल त्यांना प्रेम, आदर आणि अभिमानही होता. स्वाभाविकपणेच ते हैदराबाद मुक्तिलढ्याच्या अभ्यासाकडे ओढले गेले. या लढ्याचे नेतृत्व करणाऱ्या आणि त्यातील सर्व स्वातंत्र्यसैनिकांना श्रद्धास्थानी असलेल्या स्वामी रामानंद तीर्थ ऊर्फ 'स्वामीजी' यांच्या जीवनाचे आणि या लढ्याच्या काळाचे एक चित्र रेखाटावे, असा निर्णय त्यांनी घेतला. या चरित्रलेखनासाठी आवश्यक ती कागदपत्रे मिळविण्यासाठी त्यांनी हैदराबाद, मुंबई, दिल्ली, नागपूर, औरंगाबाद येथील पुराभिलेखागार आणि ग्रंथालये धांडोळली. जुन्या हैदराबाद राज्यातील महत्त्वाची लढ्याची केंद्रे आणि स्थळे यांची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. हयात असलेल्या

स्वातंत्र्यसैनिकांच्या आणि स्वामीजींच्या जीवनाशी संबंधित असलेल्यांच्या प्रदीर्घ मुलाखती नोंदवल्या. या लढ्यावरचे मराठी, इंग्रजी, उर्दू ग्रंथ व साधने त्यांनी अभ्यासिली. या सर्व बौद्धिक (आणि शारीरिक) परिश्रमातून अधिकृत पुराव्यावर आधारलेला एक चरित्रग्रंथ साकार झाला. हा केवळ स्वामी रामानंद तीर्थ यांचे जीवनचरित्र नोंदविणारा ग्रंथ नाही, त्याबरोबरच तो हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा अधिकृत इतिहास सांगणारा ग्रंथही आहे.

भारतीय स्वातंत्र्याचा लढा म्हणजे टिळक-गांधी यांच्या नेतृत्वाखाली इंग्रजी सत्तेविरुद्ध दिलेला लढा, अशी दुर्दैवाने सामान्यांची आणि अभ्यासकांची समजूत आहे. वस्तुतः ह्या लढ्याला इंग्रजी सत्तेच्या छत्राखाली नांदणाऱ्या लहानमोठ्या ५५४ संस्थानांतील सरंजामशाही अंमलाविरुद्ध दिल्या गेलेल्या छोट्यामोठ्या लढ्यांचेही एक अंग आहे. या सर्व संस्थानांत लोकसंख्येने सर्वात मोठ्या असलेल्या (१,६३,३८,५३४ लोकसंख्येच्या) हैदराबाद संस्थानात लढविला गेलेला स्वातंत्र्यसंग्राम हा अनेक कारणांनी महत्त्वाचा असून त्याचा समग्र विचार केल्याशिवाय भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहासच पूर्ण होत नाही. हा लढा ब्रिटिश भारतातील लढ्याप्रमाणे एका परकीय सत्तेविरुद्ध नव्हे तर तो एकाचवेळी एका स्वकीय व एका परकीय अशा दोन्ही सत्तांविरुद्धचा लढा आहे. हैदराबादचा सत्ताधीश धर्माने मुस्लिम होता आणि या संस्थानातील बहुसंख्य मुस्लिम प्रजेचा या सत्तेला पाठिंबा होता. अशांचा निझामाविरुद्धच्या या लढ्याला विरोध असूनही त्याला स्वामीजींनी जातीय रंग येऊ दिला नाही. या लढ्यातील सर्व कार्यकर्त्यांनी तो कटाक्षाने धर्मनिरपेक्ष राखला. या लढ्याला अ. भा. काँग्रेसचे– विशेषतः गांधीजींचे–प्रत्यक्षाप्रत्यक्ष मार्गदर्शन लाभत होते. लढ्याच्या अंतिम पर्वात नाइलाजाने तो सशस्त्र बनवावा लागला. यालाही गांधीजींची संमती होती. प्रामुख्याने कनिष्ठ मध्यमवर्गीयांनी या लढ्याचे नेतृत्व केले. शेतकरी, कारागीर आणि कामगार यांच्या आर्थिक-व्यावसायिक प्रश्नांना या लढ्यात महत्त्वाचे स्थान होते. हैद्राबाद संस्थानचे भाषावार विभाजन





महाराष्ट्र फाउण्डेशन ग्रंथ पुरस्कार
**कर्मयोगी संन्यासी**
नरेंद्र चपळगावकर

करून आणि संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आणून या लढ्याची पूर्ती झाली. अशा अनेक बाबींनी आणि अर्थांनी वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या या लढ्याकडे इतिहासकारांनी, अभ्यासकांनी दुर्लक्ष केलेले दिसते. या लढ्याचे मुख्य नेते मराठवाड्यातील होते. मराठवाड्यात हा लढा तीव्रपणे लढवला गेला. असे असूनही महाराष्ट्रातील जनता, अभ्यासक आणि शासन यांनी या लढ्याची उपेक्षाच केली. न्या. नरेंद्र चपळगावकरांच्या या चरित्रग्रंथातील या लढ्याच्या व त्याचे नेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या चरित्राच्या साधार व चिकित्सक अभ्यासाने या लढ्याला एक न्याय मिळाला, असे म्हणता येईल.

स्वामीजींच्या जीवनातील आणि या मुक्तिसंग्रामातील घटनाप्रसंगांची मांडणी तर या चरित्रग्रंथात केली गेली आहेच, त्याबरोबरच स्वामी रामानंद तीर्थ यांच्या व्यक्तिमत्त्वाचे एक सलग व जिवंत चित्र या चरित्रग्रंथात रेखाटले गेले आहे. स्वामीजींच्या जीवनात आणि व्यक्तिमत्त्वात अनेक अनाकलनीय वाटणारे पेच आणि वळणे आहेत. ना. म. जोश्यांचे चिटणीस म्हणून कामगार चळवळींशी संबंध, नंतर हिप्परग्याच्या आणि अंबाजोगाईच्या राष्ट्रीय शाळांत शिक्षक, मध्यंतरीच्या काळात संन्यासाश्रमाचा अधिकृतपणे स्वीकार, आ. कृ. वाघमारे–आदींच्या आग्रहामुळे राजकीय जीवनात प्रवेश, संन्यासी असूनही अध्यात्मसाधना सोडून राजकारणात महत्त्वाचे कार्य, हैदराबादच्या विलिनीकरणानंतर राजकारणातील विरोधी शक्तींमुळे राजकारणातून शांतपणे निवृत्ती आणि आध्यात्मिक कार्यात प्रवेश, नंतर वाट्याला आलेले काहीसे उपेक्षित, एकाकी जीवन; असे असतानाही मृत्यूपर्यंत जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर सतत निरपेक्षपणे कर्मयोगाचे केलेले पालन; आपल्या नैतिकतेशी प्रामाणिक राहात घेतलेल्या राजकीय निर्णयांची व त्यानुसार केलेल्या कृतींची विनातक्रार चुकवलेली किंमत; अशा अनेक वाटावळणांनी गेलेले, श्रेष्ठ गुणांनी आणि परस्परविरुद्ध वाटणाऱ्या वैशिष्ट्यांनी समृद्ध असलेले स्वामीजींचे जीवन व व्यक्तिमत्त्व उकलणे ही सोपी गोष्ट नव्हती. न्या. चपळगावकरांनी एकाच वेळी सहानुभूतियुक्त आकलनाचा दृष्टिकोण आणि कठोर चिकित्साबुद्धी स्वीकारून ही अवघड गोष्ट सहजसाध्य केली.


न्या. नरेंद्र चपळगावकरांचे आशयानुरूप विविध रूपे धारण करणारे लवचिक कथन हे या ग्रंथाचे विलोभनीय वैशिष्ट्य आहे. घटनाप्रसंगांची, ऐतिहासिक घडामोडींची मांडणी आणि चिकित्सा करताना त्यांची भाषा काटेकोर, वस्तुनिष्ठ, तर्कयुक्त असे रूप स्वीकारते. या घटनाप्रसंगांमागील मनाचा शोध घेताना ती भावयुक्त रूप धारण करून त्या मनाचा जिवंत प्रत्यय घडवते. भाषेच्या एका रूपातून दुसऱ्या रूपात सहजपणे, नकळत प्रवेश केला जातो. त्यामुळे त्यांच्या विधानपर आणि कथनपर भाषेला प्रवाहित्व, सलगत्व प्राप्त झाले आहे.

स्वामीजींचे जीवन ही एका परीने शोकात्मिकाच म्हणावी लागेल. आपल्या परीने, सेवावृत्तीने सामाजिक काम करणारा अचानक लोकनेता बनतो; लोकांच्या हृदयावर आपले स्वामित्व प्रस्थापित करतो; असाधारण कर्तृत्व प्रकट करतो; नंतर निर्माण झालेल्या

> *'हैदराबाद संस्थानच्या स्वातंत्र्यलढ्याचे नेते, संयुक्त महाराष्ट्राचे एक प्रमुख निर्माते, कम्युनिस्ट व शासन या दोघांच्याही दहशतीला तोंड देण्याचा निर्धार आणि निर्भयता तेलंगणच्या जनतेला शिकवण्याचा पहिला प्रयत्न करणारे गांधीवादी, शिक्षणाच्या माध्यमातून चांगले संस्कार करता येतील या श्रद्धेने शिक्षणसंस्था उभारणारे द्रष्टे, मागास भागाच्या विकासाचा आग्रह धरणारे नेते असे स्वामीजींच्या कर्तृत्वाचे अनेक पैलू तर आहेतच, परंतु लोकसेवेसाठी संन्यास घेणारे, आत्मशुद्धी ही जीवनप्रवाहात सतत करावी लागणारी प्रक्रिया आहे असे मनोमन मानणारे, आपद्ध धर्म म्हणून स्वीकारलेल्या राजकारणात व्यक्तिगत स्वार्थाचा स्पर्शही होऊ न देणारे, सहकाऱ्यांच्या न पटणाऱ्या निर्णयाचाही आदर करणारे, मूल्याधिष्ठित जीवनाचा आग्रह धरणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व हा एक मानवी विभूतिमत्वाचा विलोभनीय आविष्कार आहे. या लेखनाच्या निमित्ताने स्वामीजींचे व्यक्तिमत्त्व समजून घेण्याचा मला प्रयत्न करता आला.'*
>
> — नरेंद्र चपळगावकर

सत्ताकांक्षेच्या दलदलीतून बाहेर पडतो; उपेक्षित, एकाकी जीवन जगतो. शेवटी ज्याच्या मृत्यूच्या घटनेचीही आवश्यक तेवढी दखल घेतली जात नाही अशा एका मानवाच्या जीवनातील शोकात्मता न्या. नरेंद्र चपळगावकरांनी अचूक पकडली आहे. या ग्रंथातील 'शांतिपर्व' व 'दोन मृत्यू' ही शेवटची प्रकरणे याची साक्ष देतात.


**- सुधीर रसाळ**




# जीवन आणि साहित्य' शोकात्म विश्वरूप दर्शन

डॉ. स. रा. गाडगीळ यांच्या 'शोकात्म विश्वरूप दर्शन : जीवन आणि साहित्य' या ग्रंथाचा आवाका अतिशय व्यापक आहे. केवळ 'ट्रॅजेडी' (शोकात्म नाट्यकृती) एवढाच येथील विषय नाही, तर 'शोकात्म विश्वरूप' हा येथे मूळ विषय आहे. ग्रंथाच्या नावातच 'जीवन आणि साहित्य' असा शब्दप्रयोग केलेला आहे. मानवी जीवनातील शोकात्मतेचे स्वरूप, तिची कारणे आणि तिची साहित्यात प्रकटलेली कलारूपे असा हा व्यापक आलोक आहे. यामुळे या ग्रंथाने 'ट्रॅजेडी'संबंधी होत असलेल्या साहित्यशास्त्रीय मीमांसेतील दीर्घकालचे अनेक वाद आपोआपच संपुष्टात आले आहेत. 'ट्रॅजेडी श्रेष्ठ की महाकाव्य श्रेष्ठ' हा ॲरिस्टॉटलपासून सुरू झालेला वाद येथे उपस्थितच होत नाही. कारण येथे ग्रीक आणि शेक्सपिअरिअन 'ट्रॅजेडी'बरोबर महाभारत या महाकाव्याचाही विचार झालेला आहे. इडिपस आणि हॅम्लेट यांच्याबरोबर भीष्म आणि गांधारी यांच्या जीवनातील शोकात्मतेच्या विचारालाही येथे महत्त्वपूर्ण स्थान लाभले आहे.


आपणाकडे, म्हणजे भारतीय साहित्यशास्त्राने 'शोकांतिका' ही वर्ज्य मानली आहे. त्यामुळे इंग्रजी वाङ्मयाच्या संपर्काने आलेल्या 'ट्रॅजेडी'चा विचार नव्यानेच करावा लागला. 'ट्रॅजेडी'ने रसिकास येणाऱ्या अनुभूतीचे स्वरूप तपासले जात असताना, भारतीय साहित्यविचारातील संज्ञा-संकल्पनांचा आधार स्वाभाविकपणेच घेतला गेला. हा अनुभव केवळ सुखात्मक, दुःखात्मक की सुख-दुःखात्मक असा वाद होऊन बसला. करुणरसमीमांसेच्या स्वरूपात हे सारे पाहिले जात होते. वस्तुतः करुणरसाचे स्वरूप आणि 'ट्रॅजेडी'ने येणाऱ्या अनुभूतीचे स्वरूप जातितः भिन्न आहे. Pathetic Death आणि Tragic Death यात गुणात्मक भेद आहे. पण हे सारे वादविषय झाले होते. या ग्रंथाने हा वादही मिटवला गेला आहे. महाकाव्यातल्या करुणरसाची मीमांसा येथे वेगळी करावी लागलीच नाही.



महाराष्ट्र फाउण्डेशन ग्रंथ पुरस्कार
**शोकात्म विश्वरूप दर्शन : जीवन आणि साहित्य**
डॉ. स. रा. गाडगीळ

'ट्रॅजेडी'ने सहृदयाच्या ठायी भय आणि करुणा या भावनांचा उद्रेक होतो असे ॲरिस्टॉटलने म्हटले आणि या भावनांचे 'कॅथार्सिस' झाल्याने ट्रॅजेडी'चा आस्वाद घेता येतो असे मत मांडले. 'कॅथार्सिस' म्हणजे नेमके काय? हा पुन्हा दीर्घकाळ चाललेला साहित्यशास्त्रातला वादविषय. 'कॅथार्सिस म्हणजे विरेचन, उन्नयन, उदात्तीकरण, शुद्धीकरण की संतुलन? रिचर्डस्‌च्या 'समधातता' संकल्पनेने हा वाद बराचसा सुटला. डॉ. गाडगीळ यांनी शोकात्म साहित्यकृतीच्या अनुभूतीचे विश्लेषण 'समधातता' तत्त्वाने, पण अभिनव रीतीने केले आहे. त्याला एक भारतीय साहित्यशास्त्राची बैठक त्यांनी दिली आहे. कोणत्याही साहित्यकृतीचा आस्वाद हा 'निर्विघ्न मनोविश्रांतिरूप' असतो. अशी विघ्नरहित मन:शांती मिळायची असेल, तर भय या भावनेचा लय झाला पाहिजे व करुणेने कंपित होऊन जाणे टाळले पाहिजे. या दोन भावनांच्या समधात (well-ballanced) रूपातच हे घडते. गाडगीळ यांनी हे समधातता तत्त्व युधिष्ठिराच्या स्वर्गारोहणक्रियेसही लावून दाखविले आहे.

डॉ. स. रा. गाडगीळ यांच्या ठिकाणी वाङ्‌मयीन समीक्षकास आवश्यक असणारी सर्वगुणसंपन्नता आहे आणि शोकात्म जीवन व साहित्य यांच्या आकलनासाठी व मूल्यमापनासाठी विशेषत्वाने लागणारी तत्त्वजिज्ञासू वृत्ती आणि विविध विद्याशाखांचा अभ्यासही त्यांच्या ठिकाणी आहे. गाडगीळ हे भारतीय साहित्यशास्त्राचे व पाश्चात्त्य साहित्यविचाराचे अभ्यासक आहेत; त्याचबरोबर सामाजिक व सांस्कृतिक जीवन, मानववंशशास्त्र, मंत्र-तंत्र विद्या, वैदिक यज्ञ-धर्म-नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, लोकायत इत्यादींचे त्यांचे अखंड वाचन, मनन आणि चिंतन असते. त्यावर त्यांनी ग्रंथलेखनही केलेले आहे. यामुळे त्यांना एक वस्तुनिष्ठ ऐतिहासिक समीक्षादृष्टी लाभलेली आहे. जीवनातील शोकात्मतेचा संबंध हा जीवनाच्या वरवरच्या घटनांशी नसतो,



तो मूळ तत्त्वांशी असतो. Tragedy deals with the ultimates. यामुळे ट्रॅजेडी केवळ मानसशास्त्र, समाजशास्त्र, नीतिशास्त्र आणि साहित्यशास्त्र यांचा विषय होऊ शकत नाही. ती अखेर 'आध्यात्मिक मूल्यां'शी जाऊन भिडणारी असते. It is a metaphysical Art. डॉ. गाडगीळ यांचे समृद्ध-संपन्न वाङ्मयीन मन शोकात्मतेच्या अंतरंगात यामुळे उतरू शकते.

केवळ मृत्यू या घटनेने 'शोकात्मता' संभवत नसते. ज्या मृत्यूला मूल्य असते, तो मृत्यू 'शोकात्म' असतो. आणि हे मूल्य जितके उच्चतम, तितकी ती शोकात्मता श्रेष्ठ, गंभीर (खोल) आणि चिरंतन रूपाची ठरते. डॉ. गाडगीळ यांनी महाभारताच्या संदर्भात याचा अधिकतेने विचार केला आहे. 'कर्ण हा ट्रॅजेडीचा नायक होऊ शकत नाही', हे त्यांचे स्पष्ट मत आहे. भीष्माचार्यांचीही परीक्षा गाडगीळ यांनी परखडपणे केली आहे. गांधारी, कुंती, द्रौपदी, भीम, प्रत्यक्ष श्रीकृष्ण हेही त्यांच्या परीक्षेचे विषय झाले आहेत. या सर्व संदर्भात युधिष्ठिराच्या स्वर्गारोहणाचा त्यांनी लावलेला अन्वयार्थ विचारवेधी आहे. लियर, इडिपस, हॅम्लेट, प्रॉमिथिअस यांच्या सामर्थ्याचे आणि दु:खभोगाचे जे पृथक्करण त्यांनी केले आहे, तेही नवप्रकाश देणारे आहे. विशेषत: हॅम्लेटच्या दीर्घसूत्री वर्तनाची जी कारणमीमांसा गाडगीळांनी केली आहे, ती `The Chemistry of critcism has evolved no Hamlet formula' हा सर्वस्वीकृत सिद्धान्त पुसून टाकणारी ठरावी! या नव्या कारणमीमांसेने हॅम्लेटच्या शोकात्मतेचे स्वरूप Spiritual suicide सारखे दिसून येते.


डॉ. गाडगीळ यांनी शोकात्मतेचा ग्रीक शोकनाट्यापासून (इ.स. पूर्व ५०० वर्षे) इब्सेन अखेरपर्यंतचा सुदीर्घ कालपट अभ्यासासाठी घेतला आहे. ग्रीक शोकनाट्यातील महामानवाची दैवी शक्तीशी होणारी झुंज, 'नेमिसिस' या कोपिष्ट देवतेचा शाप, देवांना माणसाचे सुख पाहवत नाही म्हणून येणारी जीवनातील भीषणता, यांचा उलगडा ऐतिहासिक, सांस्कृतिक धर्मजीवनाच्या अंगाने गाडगीळ करतात आणि ग्रीक ट्रॅजेडीच्या अभिजात (Classical) रूपाचे मूल्यांकन करतात. ट्रॅजेडीचे स्वत:तून उजळून येणारे मुक्त रूप व तेथील 'नियती व मानव' यांच्यातील संघर्षाची चिकित्सा ते तात्त्विक पातळीवर करतात. ग्रीक ट्रॅजेडीतल्याप्रमाणे शेक्सपिअरिअन नायक हा शापित मानव नाही, तो आपल्याच एखाद्या क्षुल्लक, पण घोर परिणामकारी दोषामुळे (हॅमर्शिया-प्रमादामुळे) दारुण दु:खाचा वाटेकरी होतो. ही शोकात्मता अंतरंगाच्या खोल तळातून उठलेली असते. लियर, मॅकबेथ आणि हॅम्लेट या तीन शोकात्मिकांच्या अनुभूतीतून हे चिंतन रसज्ञतेने अवतरले आहे. इब्सेनची नाटके 'ट्रॅजेडी' या संकल्पनेत तशी बसत नाहीत. ती Problem Plays आहेत. त्या दृष्टीने गाडगीळांनी त्यातील शोकात्मतेचे स्वरूप स्पष्ट केले आहे.

आपणाकडे शोकात्मिकेचा विचार १९४५-५० नंतरच तीव्रतेने झाल्याचे दिसून येते. प्रा. श्री. के. क्षीरसागर यांच्या 'एकच प्याला' या नाटकाची प्रस्तावना वादळविषय झाली व 'ट्रॅजेडी' या नाट्यप्रकाराची व शोकात्म जीवनानुभवाची स्वतंत्रपणे तात्त्विक चिकित्सा होऊ लागली. 'शोकात्मिका' ही 'आध्यात्मिक सत्यदर्शनानजीक नेणारे साहित्य' आहे, हा विचार पुढे आला आणि ट्रॅजेडी या नाट्यरूपाबरोबर महाभारत ह्या महाकाव्यातील शोकात्म अनुभवांच्या चित्रणाचीही समीक्षा होऊ लागली. तरीपण ही समीक्षा पूर्वपरंपरेत बरीचशी गुरफटलेलीच राहिली. डॉ. गाडगीळ यांनी 'शोकात्म जीवन व साहित्य' अशा व्यापक दृष्टीने 'शोकात्मते'ची रूपमीमांसा करून हे समीक्षाक्षेत्र सर्व पूर्वग्रहांतून व वादांतून मोकळे केले आहे.

डॉ. गाडगीळ यांना मराठीतील शोकात्मिकांना या ग्रंथात विस्तारभयास्तव जागा देता आली नाही. किमानपक्षी 'एकच प्याला' व हरिभाऊंची 'वज्राघात' यांचा विमर्श येथे व्हायला हवा होता. तसेच ग्रीक ट्रॅजेडी ज्या डायोनिससच्या पूजाविधीतून जन्माला आली व ज्या संगीताचे व 'कोरस'चे (वृंदभाषणाचे) त्यांना अंगभूत साह्य लाभले, त्यांची कल्पना थोडीफार येथे दिली असती, तर ती ट्रॅजेडीच्या आकलनास व मूल्यमापनास पोषक ठरली असती.

डॉ. गाडगीळ यांचा हा ग्रंथ शोकात्म जीवन व साहित्याचे तत्त्वज्ञान, नाट्येतिहास आणि प्रत्यक्ष नाट्यसमीक्षा या तिन्ही दृष्टींनी अभ्यासकास एक प्रकारचे वरदानच ठरणार आहे.

**- व. दि. कुलकर्णी**




# नवरात्र

प्रा. अशोक चौसाळकर हे नाव मराठीतील सामाजिक-आर्थिक-राजकीय विषयांवरील गंभीर वैचारिक लेखनासाठी वाचकांना एव्हाना चांगलेच परिचयाचे झाले आहे. इचलकरंजीच्या समाजवादी प्रबोधिनीने प्रकाशित केलेल्या तात्कालिक महत्त्वाच्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले सविस्तर लेख आणि विविध परिषदांमधून त्यांनी सादर केलेले शोधनिबंध यातून त्यांच्या अभ्यासू वृत्तीचा व संशोधनाच्या शिस्तीचा प्रत्यय वाचकांना यापूर्वी वारंवार आलेलाच आहे. प्रा. चौसाळकरांची स्पष्ट अशी तत्त्ववैचारिक भूमिका आहे आणि ती त्यांच्या सर्वच लेखनातून व्यक्त होत असते. लेखन प्रासंगिक लेखाच्या स्वरूपाचे असो की चर्चासत्रातील शोधनिबंधाचे असो प्रा. चौसाळकरांच्या व्यासंगी अध्ययनाची साक्ष त्यातून मिळाल्यावाचून राहात नाही.

प्रा. चौसाळकरांच्या नावे विपुल फुटकळ लेखन असूनही पुस्तक स्वरूपात मराठी ग्रंथविश्वात त्यांची परवापर्यंत हजेरी लागली नव्हती. एका दमदार लेखसंग्रहाच्या रूपाने ती नुकतीच लागली. ही बाब स्वागतार्ह आणि खचितच अभिनंदनीय आहे.


मुंबईच्या 'लोकवाङ्मय गृहा'ने प्रकाशित केलेल्या प्रा. अशोक चौसाळकरांच्या 'नवरात्र' नामक एकशे अठ्ठ्याऐंशी पृष्ठसंख्येच्या पुस्तकात प्राचीन भारतातील राजकीय विचारांचा शोध, शिवाजी, गणपती व बळीराजा या मिथकांचा अन्वयार्थ, चिपळूणकर, आगरकर, इतिहासाचार्य राजवाडे, मानवेंद्रनाथ रॉय, आंबेडकर, जावडेकर व नेहरू यांचा राजकीय व सामाजिक विचार असा एक विस्तृत पट व्यापणाऱ्या एकूण पंधरा संशोधनपर लेखांचा अंतर्भाव आहे.

वेगवेगळ्या लेखांच्या स्वरूपात भिन्न काळातील आणि भिन्न विचारप्रवाहांतील विचारवंतांचा हा अभ्यास असला तरी या संपूर्ण लेखनाच्या मुळाशी लेखकाचा तटस्थ, नि:पक्षपाती व निराग्रही दृष्टिकोण आहे. त्यामुळे हे संपूर्ण लेखन निखळ अभ्यासपूर्ण व समतोल झाले आहे. दुसरे असे की भूतकाळावर या संशोधनाचा रोख असला तरी वर्तमानाचे त्याचे भान कुठेही सुटलेले नाही. त्यामुळे प्रत्येक प्रवाहातील आजच्या परिस्थितीत प्रस्तुत असलेला ग्राह्यांश लेखकाने आवर्जून अधोरेखित केला आहे. लेखकाची भूमिका मार्क्सवादी आहे हे त्याने प्रस्तावनेतच

स्पष्ट केले आहे. त्यामुळे त्या त्या काळात कार्यरत असलेल्या सामाजिक व आर्थिक शक्तींची जी द्वंद्वात्मकता संबंधित विचारवंतांच्या लिखाणातून व्यक्त झाली, तिचा शोध घेण्याचा चोख प्रयत्न लेखकाने केला आहे. प्रामुख्याने पारतंत्र्याच्या काळात येथील जातिसंस्था, सरंजामशाही व साम्राज्यसत्ता यांच्याशी तोंड देत ज्या सर्व प्रज्ञावंतांनी आपापल्या परीने राष्ट्रराज्य, नागरी समाज व संस्कृती विकसित करण्याच्या आराखड्यांचे संकल्पन केले त्यांच्या विचारांचे मोल या ग्रंथातून समजते. त्या विचारात प्रसंगी उद्‌भवलेल्या विकृती, त्रुटी व आंतर्विरोधांचेही स्पष्टीकरण लेखकाने स्वत:च्या वैचारिक बांधिलकीशी इमान राखून केले आहे.

प्राचीन भारतीय राजकीय विचार व संस्था यांच्याकडे पाहण्याचा अभ्यासकांचा दृष्टिकोण परिस्थितीनुरूप कसा बदलत गेला याचा आढावा पहिल्या निबंधात घेतला आहे. येथील जाती, भाषा, धर्म, वंश इत्यादी बाबतीतील अफाट विभिन्नता पाहता हुकुमशाही हा एकमेव शासनप्रकार येथे योग्य ठरेल, लोकशाही व स्वातंत्र्य यांच्या येथे पूर्वपरंपरा मुळी संभवतच नाहीत, या मागास जनसमूहाला सुधारणे ही इंग्रजांची इतिहासदत्त जबाबदारी आहे; अशा भूमिकेतून भारताचा विचार करणाऱ्या पाश्चिमात्यांचा प्रतिवाद करण्यासाठी काशीप्रसाद जायस्वाल, राधाकुमुद व राधाकमल मुखर्जी प्रभृतींनी भारतातील प्राचीन लोकशाही गणराज्यात्मक परंपरांचा शोध घेतला. पुढे उदारमतवादी, आदर्शवादी, चैतन्यवादी, मार्क्सवादी अशा भिन्न वैचारिक धारणा असलेल्या अभ्यासकांनी आपल्या राजकीय वारशांकडे कोणत्या दृष्टीने पाहिले हे लेखकाने स्पष्ट केले आहे.

छत्रपती शिवाजीमहाराज यांचा महाराष्ट्राने केलेला अभ्यास केवळ इतिहासविषय म्हणून केलेला नसून वेगवेगळ्या सामाजिक व राजकीय चळवळींना जनमान्यता मिळविण्याचे प्रेरकतत्त्व म्हणून केला आहे. लोकहितवादींपासून सुरू झालेली शिवअभ्यासकांची परंपरा कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्यापर्यंत कशी उभी राहिली याचा आलेख ‘छत्रपती शिवाजी आणि आधुनिक महाराष्ट्र’ या निबंधात





महाराष्ट्र फाउण्डेशन ग्रंथ पुरस्कार
**नवरात्र**
अशोक चौसाळकर

आला आहे. लोकहितवादी, फुले, राजारामशास्त्री भागवत, रानडे, टिळक, राजवाडे प्रभृतींनी शिवाजी या घटिताला आपापल्या परिस्थितीजन्य दृष्टिकोणातून कसे समजून घेतले हे विस्तारपूर्वक सांगून पुढे टिळक-राजवाडे यांच्या शिवाजीविषयक मूल्यमापन परंपरेतून निष्पन्न झालेल्या तीन भिन्न प्रवाहांचे मार्मिक विवेचन लेखकाने केले आहे. ते तीन प्रवाह असे आहेत : शिवाजी महाराजांचे हिंदुत्ववादी दृष्टीने चित्रण करणारा सावरकरांचा प्रवाह, महात्मा गांधींच्या विचाराच्या अनुषंगाने शिवाजीच्या कार्याचा परामर्श घेणारा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा प्रवाह आणि मार्क्सवादी अंगाने त्याचे विश्लेषण करणारा श्रीपाद अमृत डांगे यांचा प्रवाह. या तिन्ही प्रवाहातील तफावती लेखकाने अचूक पकडल्या आहेत.

शिवजयंत्युत्सव, गणेशोत्सव आणि बळीराजाची पूजा या तीन उत्सवांच्या विवेचनाच्या निमित्ताने प्रा. चौसाळकरांनी राजकीय मिथकांची व्याख्या, गरज, निर्मितीप्रक्रिया आणि अन्वयार्थ याबद्दल चर्चा केली आहे. मिथकांतून समाजमनाला एक आश्वासन मिळते, समाजाला सातत्य आणि एकजिनसीपणा लाभतो आणि विशिष्ट अस्मिता प्राप्त होते असे त्यांचे प्रतिपादन आहे. त्यांच्या मते भूतकाळापेक्षा मिथकांचे वर्तमानकालीन संदर्भ अधिक महत्त्वाचे असतात. जुन्या कथानकांमध्ये राजकीय नेते नवा आशय व अर्थ भरतात तेव्हाच राजकीय मिथक तयार होते. त्यातून लोकांच्या आशाआकांक्षांचा आविष्कार होतो असे सांगून टिळकांनी शिवजयंतीचा व गणपती उत्सवाचा असा वापर कसा प्रभावीपणे करून घेतला हे लेखक स्पष्ट करतो. देशाच्या इतरही भागात शिवाजीच्या मिथकाचा प्रसार टिळक युगात कसा झाला होता हेही तो सांगतो. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात ते मिथक वापरून घेण्याचे जे अनेक प्रयत्न झाले त्यांचाही ओझरता उल्लेख करतो. बळीच्या मिथकाचे लेखकाने केलेले विश्लेषण अनेक दृष्टींनी नवे आहे. जोतीराव फुल्यांनी त्या मिथकाद्वारे महाराष्ट्रातील ब्राह्मणेतरांना वेगळेच सांस्कृतिक भान दिले. ते एकात्मताकारी होते. जोतीरावांनी परंपरेचा सर्जनशील वापर करून उभारलेल्या या मिथकाद्वारे त्यांना समकालीन मूल्यांवर अधिष्ठित अशा राज्यव्यवस्थेचा आदर्श समाजापुढे ठेवायचा होता. दुर्दैवाने त्यांच्या पश्चात त्यांच्या चळवळीतून ही दृष्टी अस्तंगत झाली.

या संग्रहातील लेखांचा दुसरा संच ब्रिटिश राजवटीच्या परिणामस्वरूप या देशात सुरू झालेल्या विचारमंथनच्या प्रक्रियेशी संबंधित लेखांचा आहे. त्यात विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर आणि इतिहासाचार्य राजवाडे यांच्या विचारांचा परामर्श आलेला आहे. या गटातील विचारवंत वासाहतिक समाजात नव्याने उदयास आलेल्या मध्यमवर्गाचे प्रतिनिधी होते. ते स्वतः ब्राह्मण होते, त्यांचा वाचकवर्गही ब्राह्मण मध्यमवर्गच होता. त्यांच्या विचारांवर या परिस्थितीमुळे काही गंभीर मर्यादा पडल्या होत्या, किंवा काही आंतर्विरोध व विसंगतीही निर्माण झाल्या होत्या हे खरे आहे. तरीपण या त्याज्य भुशासोबत त्यांच्या विचारातील धान्यकणही उकिरड्यावर फेकून देणे योग्य होणार नाही असा योग्य दृष्टिकोण लेखकाने त्यांच्याबाबत येथे स्वीकारला आहे.

विष्णुशास्त्री उदारमतवादी भांडवली व्यवस्थेचे समर्थक असल्यामुळे एका बाजूने प्रबोधनमूल्यांची व धर्मक्रांतीची भलावण ते करतात, पण प्रत्यक्षात जे त्यासाठी प्रयत्न करत होते त्या सुधारकांवर मात्र ते कठोर, निर्दय व उपहासपूर्ण टीकाही करतात. या द्वैतावर बरोबर बोट ठेवून लेखक त्याचे तर्कसंगत स्पष्टीकरणही देतो. भारतात सरंजामशाही व भांडवलशाही यांच्यात कधीच संघर्ष झाला नाही, उलट इंग्रज राज्यकर्त्यांच्या छत्रछायेखाली त्या दोघी सुखेनैव एकत्र नांदत होत्या. त्यामुळे विष्णुशास्त्र्यां-सारख्यांना इंग्रजांची हकालपट्टी करण्यासाठी सरंजामशाहीचा पाठिंबा असला तर हवाच होता. पण तेवढ्यावरून त्यांना सरंजामशाहीचे प्रतिगामी प्रतिनिधी मात्र ठरवता येणार नाही, ते भांडवली लोकशाहीवर आधारलेल्या उदारमतवादी मूल्यांचे पाठीराखे होते.

इतिहासाचार्य राजवाडे यांच्या विचारांसंबंधी तीन प्रदीर्घ लेख या संग्रहात आहेत. राजवाडे हे चातुर्वर्ण्याचे व जातिव्यवस्थेचे समर्थक, ब्राह्मण श्रेष्ठत्ववादी व सनातन हिंदू धर्माभिमानी संशोधक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या काही विचारांचा हिंदू राष्ट्रवाद्यांनी सढळ हाताने वापर करून घेतला असल्यामुळे अनेकांना ते पुनरुज्जीवनवादी हिंदू राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते वाटतात. त्यांच्या हिंदुपदपादशाहीच्या आणि ब्राह्मणपदपादशाहीच्या

कल्पना त्याकाळी वरचढ असलेल्या ब्राह्मणांच्या राजकीय आकांक्षांना पोषक अशाच होत्या. प्रा. शेजवलकरांनी राजवाड्यांच्या विचारांचा मराठी ब्राह्मणवर्गावर झालेला परिणाम मार्मिक शब्दांत व्यक्त केला आहे. ते म्हणतात : "राजवाड्यांची गाजलेली पहिल्या खंडाची प्रस्तावना महाराष्ट्रीय ब्राह्मणांना चुकीच्या मार्गावर नेण्यात यशस्वी झाली. त्या प्रस्तावनेत काल्पनिक चिद्‌विलास आणि भाषाविलास ध्वनिक्षेपित केले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील ब्राह्मण पिढ्या चुकीच्या मार्गाने वाटचाल करून आपली ढोपरं फोडून बसल्या." वंशशुद्धी व बीजक्षेत्रशुद्धी अशा अचाट कल्पना आणि जात्युन्नतीचे त्यांनी सुचवलेले हास्यास्पद उपाय या कारणांनीही राजवाड्यांच्या विचारांना फारसे गंभीरपणे घेतले गेले नाही. पण हे सगळे दोष व विसंगती मान्य करूनही डॉ. चौसाळकर म्हणतात त्याप्रमाणे संपूर्ण भौतिकवादी, ज्ञानशास्त्रीय व प्रमाणशास्त्रीय भूमिकेतून राजवाड्यांनी इतिहासाचे अन्वेषण केल्यामुळे ते मार्क्सवादाच्या बरेच जवळ जातात हे खरेच आहे. त्यांची विचारपरंपरा चिपळूणकरी असल्यामुळे तिच्या सर्व उणिवा त्यांच्या विचारात अधिकच ठळकपणे प्रादुर्भूत झाल्या आहेत. त्यांचे विलक्षण पूर्वग्रह, असाधारण प्रतिभाशक्ती आणि शास्त्रीय पद्धतींनी संशोधन करून अशास्त्रीय निष्कर्ष काढण्याची हातोटी ध्यानात ठेवून त्यांचा प्रत्येक विचार पारखून घेतल्यास मार्क्सवादी दृष्टिकोणातून राजवाड्यांच्या विचारातील टाकाऊ काय व टिकाऊ काय याचा विवेक करणे शक्य आहे. लेखकाने तसा प्रयत्न येथे केला आहे.

पुस्तकाच्या अखेरीस डॉ. आंबेडकर, मानवेंद्रनाथ रॉय, आचार्य जावडेकर आणि जवाहरलाल नेहरू या चार विचारवंतांच्या विचारांचा ऊहापोह करणारे निबंध आहेत. डॉ. आंबेडकरांचा सामाजिक प्रतिकाराचा सिद्धान्तच आजही दलित चळवळीचे कसे मार्गदर्शन करतो हे लेखकाने स्पष्ट केले आहे. राजकीय क्रांतीबरोबरच सांस्कृतिक क्रांती घडून आली नाही तर सांस्कृतिक परंपराच फॅसिझमला आधारभूत ठरतात हा मानवेंद्रनाथांचा इशारा आज खरा ठरत आहे. जावडेकर-नेहरू प्रभृतींच्या धर्मनिरपेक्ष लोकशाही समाजवादाचा नीट पाठपुरावा न केल्यामुळे देशापुढील जमातवादाचे संकट उग्र होत आहे, हे लेखकाने काढलेले निष्कर्ष वाचकाला नक्कीच अंतर्मुख करणारे आहेत. वाचकाला अंतर्मुख करण्याचे हे सामर्थ्य हे या पुस्तकाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

**- भास्कर लक्ष्मण भोळे**

*या ग्रंथातील विवेचन मार्क्सवादी दृष्टिकोणातून करण्यात आले आहे. त्या काळात कार्यरत असणाऱ्या सामाजिक व आर्थिक शक्तींची द्वंद्वात्मकता या सर्व विचारवंतांच्या लिखाणातून व्यक्त झाली आहे. माझा प्रयत्न या सर्व विचारवंतांच्या विचारांतील विवेक जाणून घेण्याचा, त्या दृष्टीने त्यांच्या विचारांचा अभ्यास करण्याचा होता. भारतातील जातिसंस्था सरंजामशाही व साम्राज्यशाही यांच्याशी तोंड देत भारतात राष्ट्रराज्य, नागरी समाज व संस्कृती यांचा विकास करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यातूनच तिसऱ्या जगातील सबळ व आत्मनिर्भर चळवळी निर्माण होण्याची शक्यता आहे.*

*स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रदीर्घ अंधाऱ्या नवरात्रात अनेक विचारांचे दीप पेटविण्यात आले. नव्या चळवळी सुरू करण्यात आल्या. त्यांचा परामर्श पुस्तकातील लेखात घेतला आहे.*

*- अशोक चौसाळकर*

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सर्व धर्म अध्ययन केंद्र**

१९९३-९४ ह्या प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या अमृत महोत्सववर्षाच्या शुभप्रसंगी कै. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सर्व धर्म अध्ययन केंद्राची १ जानेवारी १९९३ रोजी स्थापना केली.

हिंदू धार्मिक परंपरेचा आणि तत्त्वज्ञानाचा सखोल व व्यापक अभ्यास करण्यासाठी ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती यांनी प्राज्ञपाठशाळा मंडळाची स्थापना ६ ऑक्टोबर १९१६ (विजयादशमी) रोजी केली. 'धर्मकोशा'च्या प्रसिद्ध झालेल्या २२ खंडांच्या आणि संकल्पित २० खंडांच्या स्वरूपात ह्या अभ्यासाचे फलित विद्वानांपुढे आणि सामान्य जनतेपुढे आहे. मंडळाच्या ह्या कार्यक्षेत्राचा विस्तार करून हिंदू परंपरेप्रमाणे बौद्ध, जैन, शीख, ख्रिस्ती, इस्लामी इत्यादी धार्मिक परंपरांचाही शास्त्रशुद्ध अभ्यास करण्यासाठी तर्कतीर्थांनी सर्व धर्म अध्ययन केंद्राची स्थापना केली.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे दिनांक २७ मे १९९४ रोजी अचानक निधन झाले.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे हिंदू धर्माचे प्रख्यात आणि अधिकारी पंडित होते. इतर धर्माचाही त्यांनी व्यासंग केला होता. धर्माचे तत्त्वज्ञान हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता आणि त्यावर त्यांनी महत्त्वाचे लिखाण केले आहे. तेव्हा सर्व धर्म अध्ययन केंद्र हेच त्यांचे स्मारक म्हणून विकसित करावे आणि त्याचे 'कै. लक्ष्मणशास्त्री जोशी सर्व धर्म अध्ययन केंद्र' असे नामकरण करावे असे प्राज्ञपाठ शाळा मंडळाच्या संचालक मंडळाने ठरविले आहे.

**धर्मकोश योजना**

***धर्मकोश***

धर्मकोश हा प्राज्ञपाठशाळा मंडळाचा सर्वात महत्त्वाचा व दीर्घकाळ चाललेला उपक्रम आहे. ब्रह्मीभूत स्वामी केवलानंद सरस्वती यांनी त्याला १९२५ साली प्रारंभ केला. प्रस्तुत वर्ष हे धर्मकोशाचे हीरकमहोत्सवी वर्ष आहे.

***धर्मकोशाचे स्वरूप आणि व्याप्ती***

धर्म ही प्राचीन भारतीय संस्कृतीतील सर्वात मूलभूत, मध्यवर्ती आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रांचे व अंगांचे नियमन करणारी संकल्पना होय. धार्मिक संस्कार, विधी, व्रते, उपासना यांच्याबरोबर कुटुंब, वर्ण व ज्ञाती, व्यवसाय, न्याय व कायदा, राज्यसंस्था इत्यादी सामाजिक संस्था आणि वैयक्तिक जीवनाचे आदर्श या सर्व गोष्टी धर्माच्या व्याप्तीमध्ये मोडतात. धर्मकोशाचा उद्देश म्हणजे धर्माचे हे प्रत्येक अंग घेऊन त्याचे विवरण करणारी सर्व वचने सर्व प्रमाण ग्रंथांतून निवडून व संकलित करून त्यांची कालानुक्रमे मांडणी करणे हा आहे. या प्रमाणे ग्रंथांत सर्व वेद, सूत्रे, स्मृती, महाभारतादी पुराणे, अर्थशास्त्रादी ग्रंथ, ह्या ग्रंथांवरील भाष्ये, निबंध हे सर्व समाविष्ट आहेत. म्हणजे या ग्रंथसंभाराने सुमारे तीन हजार वर्षांचा कालखंड व्यापलेला आहे आणि त्यांची संख्या अदमासे २५० इतकी आहे.

***धर्मकोशाचे सामाजिक महत्त्व***


प्राचीन भारतीय संस्कृती, सामाजिक मानवशास्त्र (सोशल ॲन्थ्रॉपॉलॉजी), धार्मिक संकल्पनांची उत्क्रांती इत्यादी ज्ञानविषयांचा एक मूलभूत साधनग्रंथ म्हणून धर्मकोशाचे अनन्यसाधारण महत्त्व आहेच. जागतिक साहित्यात या ग्रंथासारखा दुसरा ग्रंथ नाही. पण याशिवाय भारतीय समाजाच्या दृष्टीने त्याचे वैशिष्ट्यपूर्ण असे सामाजिक महत्त्व आहे. आधुनिक ज्ञान व सामाजिक समता व समताधिष्ठित न्याय ह्यांच्या अनुरोधाने परंपरागत हिंदू धर्म व समाज यांच्यात सुधारणा करण्याच्या उपक्रमात प्राज्ञपाठशाळा मंडळ नेहमी आघाडीवर होते. या उपक्रमाचे एक साधन म्हणून धर्मकोशाची योजना करण्यात आली आहे. धर्मशास्त्राच्या परंपरेप्रमाणे हिंदू धर्म कधीच बंदिस्त व स्थितिशील नव्हता. तो नेहमीच मोकळा व गतिशील होता आणि कालाच्या ओघात, वैचारिक व नैतिक प्रगतीला अनुसरून, सतत परिवर्तन पावत होता हे सिद्ध करणारा प्रमाण, व्यापक व निर्विवाद पुरावा संग्रहित करणे हे धर्मकोशाचे मुख्य प्रयोजन होते. अस्पृश्यता निवारणाला असलेल्या धर्मशास्त्रातील आधारासाठी म. गांधीजी प्राज्ञपाठशाळेकडे वळले यावरून मंडळाकडून धर्मकोशाद्वारा होत असलेल्या सामाजिक कार्याचे महत्त्व स्पष्ट होते.

## तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सर्व धर्म अध्ययन केंद्राला व धर्मकोश योजनेला महाराष्ट्र फाउण्डेशनचे अनुदान



**कै. तर्कतीर्थ जोशी यांच्या अमेरिकेतील आप्तेष्टांनी ४,४०० डॉलरच्या 'महाराष्ट्र फाउण्डेशन' कडे दिलेल्या देणगीतून हे अनुदान देण्यात येत आहे.**

891.46
Sam/2K
5430



# केशव गोरे स्मारक ट्रस्ट

केशव ऊर्फ बंडू गोरे हे महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीतील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन यातील त्यांच्या सहभागाबरोबरच मुंबईतील कामगार चळवळीतील त्यांचे योगदान मोलाचे आहे. मुंबई महापालिकेतील सफाई कामगार, तसेच असंघटित कष्टकऱ्यांना संघटित करण्यात केशव गोरे आघाडीवर होते. त्यांनी लिहिलेला 'आंतरराष्ट्रीय समाजवाद' हा ग्रंथ त्यांच्या व्यासंगाची झलक दाखवतो. १९५८ साली त्यांचे अल्पवयात निधन झाले. केशव गोरे यांच्या अकाली निधनानंतर चळवळीतील त्यांच्या सहकारी व पत्नी मृणाल गोरे आणि केशव गोरे यांचे चळवळीतील सहकारी व मित्र यांनी 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ची स्थापना केली. 'ट्रस्ट'तर्फे समाजपरिवर्तनाच्या दृष्टिकोणातून प्रबोधनात्मक तसेच रचनात्मक आणि सेवाभावी कार्यक्रम राबविले जातात. 'ट्रस्ट'चे एक संदर्भ ग्रंथालय असून विविध सामाजिकशास्त्रांच्या संदर्भातील सुमारे ४,००० ग्रंथ या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. राजकीय, सामाजिक, अभ्यासू कार्यकर्ते; व संशोधन करणारे व महाविद्यालयीन विद्यार्थी यांना या सोयीचा लाभ मिळत आहे.

'ट्रस्ट'मध्ये एक 'डॉक्युमेंटेशन सेंटर' आहे. या केंद्रात नियतकालिकातील कात्रणे रीतसर जतन केली जातात. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनी तसेच २ फेब्रुवारी या केशव गोरे यांच्या स्मृतिदिनाच्या अनुषंगाने दरवर्षी व्याख्यानमाला आयोजित केली जाते. 'ट्रस्ट'तर्फे वेळोवेळी महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर पुस्तिका प्रकाशित करण्यात येतात. परिसंवाद, चर्चासत्रे, शिबीरे अशा विविध माध्यमांतून विचारमंथनाला चालना देणारे कार्यक्रम 'ट्रस्ट'तर्फे आयोजित करण्यात येतात.

मुंबईतील राहण्याच्या जागांच्या अपुरेपणामुळे होणारी विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन 'ट्रस्ट'तर्फे अभ्यासिका चालविण्यात येते. ४०० विद्यार्थी या अभ्यासिकेचा लाभ घेत आहेत.

मुंबई महानगरपालिकेच्या उन्नतनगर, गोरेगाव (प.) येथील दोन प्राथमिक शाळा, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी 'ट्रस्ट'ने दत्तक घेतल्या असून तीन डोंगरी, गोरेगाव (प.) या झोपडपट्टी विभागात 'कल्याण केंद्र' सुरू केले आहे.

'ट्रस्ट'च्या दोन्ही वास्तूंमध्ये वैद्यकीय चिकित्सा केंद्र, बालविकास केंद्र, बालवाड्या, प्रौढ साक्षरता वर्ग, दैनिके व नियतकालिके यांचे वाचनालय, असे अनेक उपक्रम 'ट्रस्ट'तर्फे चालविले जातात.

स्त्रियांसाठी कायदेशीर सल्ला देण्याचे व आवश्यक तेथे Counselling करण्याचे 'स्वाधार' संस्थेचे कार्य 'ट्रस्ट'च्या वास्तुतूनच केले जाते.


**विश्वस्त मंडळ**

श्री. र. गो. करमरकर, श्रीमती मृणाल गोरे, श्रीमती कुसुम सामंत, श्री. कृष्णनाथ नेवरेकर,
श्री. मधु आडेलकर, श्री. श्रीनिवास प्रभू, श्री. रमाकांत कदम, श्री. चंद्रकांत केळकर

# महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार योजना २०००
## निवड सल्लागार समिती (भारत)




**मृणाल गोरे**
अध्यक्ष
केशव गोरे स्मारक ट्रस्ट



**दिगंबर पाध्ये**
निमंत्रक, साहित्य पुरस्कार समिती
मराठीचे प्राध्यापक व समीक्षक




**डॉ. विजया राजाध्यक्ष**
प्राध्यापिका, मराठी विभाग प्रमुख
एस्.एन्.डी.टी. विद्यापीठ (निवृत्त)
प्रख्यात कथालेखिका व समीक्षिका




**नागनाथ कोतापल्ले**
मराठी विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ
कथाकार आणि समीक्षक



**नारायण सुर्वे**
प्रख्यात कवी



**वसंत आबाजी डहाके**
मराठीचे प्राध्यापक
कवी आणि समीक्षक



**सतीश काळसेकर**
अनियतकालिकांच्या चळवळीतील
कवी व कार्यकर्ते



**डॉ. सुधीर पानसे**
प्राचार्य, साठ्ये महाविद्यालय
पदार्थविज्ञानाचे प्राध्यापक
संशोधक व लेखक

# महाराष्ट्र फाउण्डेशन

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे. १९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निवारण करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली दोन दशके करीत आहे.

आदिवासींमध्ये शिक्षणप्रसार, अपंगांचे पुनर्वसन, गावातील आरोग्यसेवेची सुधारणा, शेतीतील उत्पादनवाढीचे प्रयोग यांसारखे समाजोपयोगी उपक्रम करणाऱ्या ध्येयवादी संस्थांना आर्थिक व श्रमदानाचे साहाय्य 'महाराष्ट्र फाउण्डेशन' या संस्थेद्वारे होत असते.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने आजवर पाचशेहून अधिक गरजू मुलांना साहाय्य केले आहे. पुण्याच्या 'ज्ञानप्रबोधिनी' या संस्थेच्या सहकार्याने पुण्याजवळ एक गाव दत्तक घेतले आहे. जनकल्याण रक्तपेढीमार्फत महाड येथे 'एड्स चिकित्सा प्रयोगशाळा' स्थापन केली आहे. 'पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन'साठी एक रुग्णवाहिका घेऊन दिली आहे. अशा रीतीने गेल्या दोन दशकात भारतातील तीनशेहून अधिक संस्थांना दहा कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या देणग्या या संस्थेने दिल्या आहेत.

*Invest in future*
*of those*
*with no future....*
*So they can reinvest*

हे 'महाराष्ट्र फाउण्डेशन'चे घोषवाक्य आहे.

समाजाच्या सांस्कृतिक विकासात व समाजाच्या घडणीत साहित्य व साहित्यिक यांचा मोठा वाटा असतो. मराठी साहित्यिक व साहित्य यांचे ऋण अल्पांशाने फेडावे, या भावनेने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने ही 'मराठी साहित्य पुरस्कार योजना' सुरू केली आहे.

# निवड / सल्लागार समिती (अमेरिका) २०००



**सुनील देशमुख**



**पद्मजा फाटक (मजेत)**
'गर्भश्रीमंतीचे झाड',
'राही' इत्यादी
पुस्तकांच्या लेखिका.
'बाराला दहा कमी'
या प्रसिद्ध ग्रंथाच्या अनुवादक



**अशोक सबनीस**
न्यूयॉर्क सिटी ट्रांसिट
अॅथॉरिटीमध्ये
डेप्युटी डिव्हिजनल आर्किटेक्ट,
कॅनडामधील
'एकता' मासिकात लेखन.



**दिलीप वि. चित्रे**
वास्तुविशारद, 'हिमगंध' हा
कवितासंग्रह, 'ऐल तीरावर' व
'स्वर हे पश्चिमरंगी' या गीतांच्या
दोन ध्वनिमुद्रिका. 'अलिबाबाची
गुहा' हे दोन अंकी नाटक.
'कुंपणापलीकडले शेत' या
प्रातिनिधिक कथासंग्रहाचे जनक.



**संध्या कर्णिक**
'दिवा कुणाचा तेवत राही' हा
ललित लेखसंग्रह, 'साधना', 'स्त्री',
'एकता', 'नवयुग' इ.
नियतकालिकांतून कथा,
कविता प्रसिद्ध. फिलाडेल्फियात
सामाजिक व सांस्कृतिक
कार्यात सहभाग.



**राजन गडकरी**
'मेरिन् लिंच' या वित्तसंस्थेत
अर्थविश्लेषक,
ललित व वैचारिक
साहित्यात मनापासून रस.



**विद्युल्लेखा अकलूजकर**
प्राध्यापिका, 'मेरा जूता है जापानी',
आणि 'यथा काष्ठं च काष्ठं च' ही
दोन पुस्तके. मराठी कविता व
ललितनिबंध लेखन, इंग्रजी व
हिंदी कथा-कवितांचे मराठी अनुवाद.



**ललिता गंडभीर**
भारतात चार मराठी कथा व
लेखसंग्रह आणि अमेरिकेत
जर्नल्स् व अॅन्थॉलॉजिसमधून
साहित्य प्रकाशित.

# मराठी साहित्य पुरस्कार योजना

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही १९७८ साली अमेरिकेत स्थापन झालेली संस्था आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्या हलक्या करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याच्या निर्धाराने निवडक ध्येयवादी संस्थांतर्फे गरजवंतांना आर्थिक व श्रमदानाची मदत 'महाराष्ट्र फाउण्डेशन' गेली दोन दशके करीत आहे.

श्री. सुनील देशमुख, कनेटिकट् यु.एस.ए ह्यांच्या एक कोटी रुपयांच्या उदार देणगीमधून प्रगतिशील मराठी साहित्याला प्रोत्साहन देण्यासाठी मराठी साहित्य व साहित्यिक यांच्यासाठी प्रतिवर्षी सुमारे दहा लक्ष रुपयांचा विनियोग करण्याची करण्याची एक योजना १९९४ साली कार्यान्वित करण्यात आली. भारताच्या वैचारिक नेतृत्वात मराठी विचारवंतांचा व साहित्यिकांचा सिंहाचा वाटा आहे. तेराव्या शतकातील संतसाहित्यापासून सुरू झालेली ही परंपरा आधुनिक काळात न्यायमूर्ती रानडे, लोकहितवादी, महात्मा फुले, टिळक, आगरकर, राजवाडे, कर्वे, आंबेडकर यांसारख्या विचारवंतांनी टिकविली. ही सामाजिक प्रगतिशील वैचारिक परंपरा साहित्याच्या माध्यमातून अशीच पुढे चालू रहावी आणि तिची कृतज्ञतापूर्वक नोंद घ्यावी, हा या योजनेमागील हेतू आहे.

या योजनेच्या तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**महाराष्ट्र फाउण्डेशन गौरव पुरस्कार**

मराठी ललित किंवा वैचारिक साहित्याच्या क्षेत्रांत आपल्या आयुष्यभराच्या कार्याने मोलाची भर घालणाऱ्या साहित्यिकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्याचा गौरव करण्यासाठी दोन लक्ष रुपयांचा एक गौरव पुरस्कार

या गौरव पुरस्कारासाठी नावांचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातील.

**ललित साहित्यिकाच्या संदर्भात –**

ज्यांच्या साहित्यातून मानवी स्वातंत्र्य, समता, न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाची जाणीव व्यक्त होते.

ज्यांच्या साहित्यातून मानवी जीवनाचे समर्थ दर्शन घडविले जाते.

ज्यांच्या साहित्यातून सार्वकालीन व सार्वत्रिक मानवी मूल्यांचा आविष्कार होतो.

ज्यांच्या साहित्यामुळे मराठी साहित्याच्या संचितात मोलाची भर पडली आहे व त्यामुळे ज्यांचे साहित्य मराठी साहित्याच्या इतिहासात महत्त्वाचे ठरले आहे.

अशा प्रतिभावंत साहित्यिकांचे कार्य या गौरव पुरस्कारासाठी विचारात घेतले जाईल.

**वैचारिक साहित्यिकाच्या संदर्भात –**

इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राजकारण, अर्थशास्त्र, विज्ञान, साहित्य-संशोधन व समीक्षा यांसारख्या वैचारिक क्षेत्रांत ज्यांच्या मराठी लेखनामुळे त्या त्या विषयाच्या संदर्भात महत्त्वाची भर पडली आहे.

त्या त्या क्षेत्रात ज्या साहित्यिकांनी नि:स्पृहवृत्तीने व निर्भयपणे तात्त्विक सत्याचा शोध घेतला आहे.

ज्यांची जाणीव मानवी स्वातंत्र्य, समता व न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाच्या प्रेरणेने उद्युक्त झाली आहे.

मराठी समाजाच्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने ज्यांचे लेखन महत्त्वाचे ठरणारे आहे.

अशा विचारवंतांचे कार्य या गौरव पुरस्कारासाठी विचारात घेतले जाईल.

विशेष पुरस्कार

मराठी साहित्यक्षेत्रातील एखाद्या विभागातील विशेष कामगिरीबद्दल एका व्यक्तीस रु. ५०,०००/- व मानचिन्ह असा एक विशेष पुरस्कार दिला जाईल.

या वर्षी मराठीतून विज्ञानविषयक लेखन करून विज्ञानप्रसाराचे कार्य करणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार दिला जाईल.

**वैचारिक नियतकालिकांसाठी पुरस्कार**

मराठी साहित्यक्षेत्रात वैचारिक नियतकालिकांची प्रभावी परंपरा आहे. विचारांची देवाणघेवाण व वैचारिक जागृती या दृष्टीने आधुनिक जगात नियतकालिकांना विशेष महत्त्व आहे. परंतु आज मराठी नियतकालिकांच्या क्षेत्रात वैचारिक नियतकालिकांची स्थिती समाधानकारक दिसत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत नियतकालिकांचे सांस्कृतिक महत्त्व ध्यानात घेऊन ध्येयनिष्ठ वृत्तीने मराठी नियतकालिके चालविणाऱ्या व्यक्तींच्या कार्यांची नोंद घेऊन त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी व अशा कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी एका नियतकालिकाला रुपये ५०,०००/- व मानचिन्ह असा पुरस्कार देण्यात येईल.

**यासाठी**

जी नियतकालिके पूर्णपणे वैचारिक असतील. (ललित साहित्य प्रकाशित करीत नसतील.)

जी तत्त्वज्ञान, इतिहास, समाजशास्त्र, राजकारण, विज्ञान, साहित्य-संशोधन व समीक्षा यांसारख्या विशेष क्षेत्रांना वाहिलेली असतील.

जी शास्त्रीय दृष्टीने निःस्पृहपणे सत्याचे प्रकटन करण्याचे कार्य करीत असतील.

ज्या नियतकालिकांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात काही विशेष महत्त्व प्राप्त झाले असेल वा त्यांच्या कार्यातून तसे आश्वासन मिळत असेल.

ज्या नियकालिकांच्याद्वारे महाराष्ट्रातील विख्यात व नवोदित विचारवंतांच्या विचारांची देवाणघेवाण होत असेल व त्यामुळे सांस्कृतिकदृष्ट्या जी महत्त्वाची ठरणारी असतील.

अशा नियतकालिकांचा विचार या पुरस्कारासाठी केला जाईल. 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ने नियुक्त केलेली निवड समिती व अमेरिकेतील 'अंतिम निवड समिती' २००० या वर्षासाठी एका नियतकालिकाची निवड करील.

**ग्रंथांसाठी पुरस्कार**

समकालीन मराठी साहित्याला प्रोत्साहन म्हणून पाच मराठी ग्रंथांना प्रत्येकी रु. २५,०००/- व मानचिन्ह असे पाच 'महाराष्ट्र फाउण्डेशन ग्रंथ पुरस्कार' या वर्षी दिले जातील. या पुरस्कारांसाठी अर्ज करावे लागणार नाहीत. पुरस्कार दिल्या जाणाऱ्या वर्षालगतच्या तीन वर्षांतील पुस्तकांचा या पुरस्कारांसाठी विचार केला जाईल. या वर्षी १९९७,१९९८,१९९९ या तीन वर्षांतील पुस्तके विचारात घेतली जातील. यामध्ये संपादित/भाषांतरित ग्रंथांचाही विचार केला जाईल.

गौरव पुरस्कार, विशेष पुरस्कार आणि ग्रंथ पुरस्कार यासाठी महाराष्ट्रातील २०० विचारवंत व सुजाण वाचक यांच्याकडून शिफारशी मागविण्यात येतील.

या शिफारशी विचारात घेऊन 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ने नियुक्त केलेली निवड समिती व अमेरिकेतील अंतिम निवड समिती पुरस्कारांसाठी व्यक्ती व ग्रंथ यांची निवड करतील.

**कृष्णनाथ नेवरेकर**
कार्यकारी विश्वस्त
केशव गोरे स्मारक ट्रस्ट,
'स्मृती', आरे रोड, मुंबई - ४०० ०६२.
दूरध्वनी : ८७२ ४१२३

# सुनील देशमुख




श्री. सुनील देशमुख हे मूळचे सांगलीचे. १९६४ साली एस.एस.सी. परीक्षेत बोर्डात चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यावर शिक्षणासाठी ते मुंबईत आले. १९७० साली मुंबई विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी या विभागातून बी.केम. ही पदवी त्यांनी प्राप्त केली व पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले.

अमेरिकमध्ये एम.एस. (केमिकल इंजिनिअरिंग), एम.बी.ए. या पदव्यांबरोबरच जे.डी. ही कायद्याची पदवीही त्यांनी मिळविली. अमेरिकेत वकिली करण्याचा परवानाही त्यांनी प्राप्त केला.

नंतर अमेरिकेतच कमोडिटी ट्रेडर म्हणून वॉलस्ट्रीटवर त्यांनी अनेक वर्षे यशस्वी व्यवसाय केला.

आज गिरीश, निशा व सुशील या तीन मुलांसह ते व त्यांची पत्नी प्रतिभा (पूर्वाश्रमीची प्रतिभा टिळक) अमेरिकेत स्थायिक झाले आहेत.

व्यवसायात नेत्रदीपक यश मिळविणाऱ्या श्री. सुनील देशमुख यांना साहित्य व समाजसेवा यांविषयी विशेष आस्था आहे.

व्यवसायातून स्वेच्छेने निवृत्त झाल्यापासून आठवड्यातील काही काळ ते सामाजिक कामासाठी आवर्जून देत असतात.

मराठी भाषा, समाज व संस्कृती यांबद्दल त्यांना प्रेम व कळकळ आहे. हे ऋण फेडण्याचा अल्पसा प्रयत्न म्हणून 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला एक कोटी रुपयांची देणगी देऊन १९९४ पासून 'महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार योजना' त्यांनी सुरू केली. 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' आयोजित 'महाराष्ट्र फाउण्डेशन समाजसेवा पुरस्कार योजने'मागेही सुनील देशमुख यांचीच प्रेरणा आहे.

Sunil Deshmukh
1300, Rocrimmon Road
Stamford, C T 06903
**U.S.A.**
Tel. : 203-322-0548
Fax. : 203-322-1936
e-mail : Sunild@aol.com

# महाराष्ट्र फाउण्डेशन साहित्य पुरस्कारांचे मानकरी

## गौरव पुरस्कार

नारायण सुर्वे १९९४
मेघ:शाम पुंडलिक रेगे १९९४
मालतीबाई बेडेकर १९९५
य. दि. फडके १९९५
श्रीपाद नारायण पेंडसे १९९६
विष्णू भिकाजी कोलते १९९६
गो. वि. तथा विंदा करंदीकर १९९७
वसंत पळशीकर १९९७
विजय तेंडुलकर १९९८
रा. भा. पाटणकर १९९८
पु. ल. देशपांडे १९९९
रा. चिं. ढेरे २०००

## विशेष पुरस्कार

भा. रा. भागवत / बाल साहित्य १९९६
उमा कुलकर्णी / भाषांतर १९९७
बाबुराव बागूल / दलित साहित्य १९९८
वसंत दावतर / मराठी भाषा, संशोधन व समीक्षा १९९९
रा. वि. सोवनी २०००

## प्रकाशन संस्था

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९४
कॉण्टिनेण्टल प्रकाशन, पुणे १९९५
देशमुख आणि कंपनी, पुणे १९९६
मौज प्रकाशन गृह, मुंबई १९९७
साधना प्रकाशन, पुणे १९९८

## वैचारिक नियतकालिके

नवभारत, वाई १९९४
आजचा सुधारक, नागपूर १९९४
मराठी संशोधन पत्रिका, मुंबई १९९४
समाज प्रबोधन पत्रिका, पुणे १९९५
भाषा आणि जीवन, पुणे १९९५
विचारशलाका, लातूर १९९५
अर्थसंवाद, कोल्हापूर १९९६
संशोधक, धुळे १९९६
पंचधारा, हैद्राबाद १९९७
परिसर-वार्ता, पुणे १९९७
मराठी विज्ञान परिषद पत्रिका, मुंबई १९९८
पुरोगामी सत्यशोधक, पुणे १९९८
ताज (Thinkers' Academy journal), मुंबई १९९९
सृष्टिज्ञान, पुणे २०००

## ग्रंथ / ललित

ताम्रपट / रंगनाथ पठारे १९९४
दिवसेंदिवस / अनुराधा पाटील १९९४
भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा / भाऊ पाध्ये १९९४
उद्काचिया आर्ती / मिलिंद बोकील १९९५
वनवास / प्रकाश नारायण संत १९९६
एकूण कविता : दोन / दिलिप पुरुषोत्तम चित्रे १९९६
युगान्त / महेश एलकुंचवार १९९७
कार्यरत / अनिल अवचट १९९८
शुभ्र काही जीवघेणे / अंबरीश मिश्र १९९८
अधांतर / जयंत पवार १९९९
कबीर / अनुवाद : मंगेश पाडगावकर १९९९
तणकट / राजन गवस २०००
आतंक / विलास सारंग २०००

## ग्रंथ / वैचारिक

आस्तिक शिरोमणी चार्वाक / आ. ह. साळुंखे १९९४
आधुनिक मराठी वाङ्मयाची
सांस्कृतिक पार्श्वभूमी / गो. म. कुलकर्णी १९९५
हिंदू-मुस्लिम प्रश्न
आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद / रावसाहेब कसबे १९९५
समाजपरिवर्तनाच्या दिशा / जनार्दन वाघमारे १९९६
जाळ्यातील चंद्र / म. वा. धोंड १९९६
नव वसाहतवाद आणि आधुनिक भारत / गोपाळ राणे १९९७
तुकाराम दर्शन / सदानंद मोरे १९९७
नारायण मेघाजी लोखंडे / मनोहर कदम १९९७
आंबेडकर / नलिनी पंडित १९९८
साहित्यविवेक / म. द. हातकणंगलेकर १९९८
काश्मीर प्रश्न / ना. य. डोळे १९९९
दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा
एक आविष्कार / श्री. रं. कुलकर्णी १९९९
ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना /
संपादक : विलास खोले १९९९
शोकात्म विश्वरूप दर्शन :
जीवन आणि साहित्य / स. रा. गाडगीळ २०००
नवरात्र /अशोक चौसाळकर २०००
कर्मयोगी संन्यासी / नरेंद्र चपळगावकर २०००

## ग्रंथ / अ-पारंपरिक

जिहाद / हुसेन जमादार १९९४
आक्रोश / भीमराव गस्ती १९९५
दशक्रिया / बाबा भांड १९९६
लॉरी बेकर / अतुल देऊळगावकर १९९७
विमुक्तायन / लक्ष्मण माने १९९८

891.46
Sam/2K
5430

अ अऽऽ इ इऽऽ

अुं इू ए आई

ओ औच् अहं अहा!